# Dr. Madhukarrao Wasnik

## PWS Arts and Commerce College

### Kamptee Road, Nagpur-26

**Bibliometrics of the Publication During the year 2017-2018**

| Sr. No | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1.** | Stree Aatmacharitrat Aaydaan che Veglepan | Ms. Amruta Dorlikar | **Perspectives**<br>A National Peer Reviewed Interdisciplinary Research Journal<br>Vol-1 Issue- VII<br>ISSN: 2249 - 5134 | Aug-2017 | - | - | - |
| **2.** | Aatmacharitra : ek Rhudaysparshi Wangmay Prakar | Ms. Amruta Dorlikar | Uniresearch Multidisciplinary International E-Research Journal<br>ISSN: 2321- 4953 | Sep- 2017 | - | - | - |

## Bibliometrics of the Publication During the year 2018-2019

| Sr. No | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | Govindgraj Hyanchya Gudhgujanatmak Kavita: Ek Chintan | Ms. Amruta Dorlikar | Uniresearch Multidisciplinary E-Research Journal<br><br>ISSN: 2348-7143 | Dec- 2018 | - | - | - | |

**Bibliometrics of the Publication During the year 2019-20**

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | Vharadi Bolitil Mhaninchi Arthvatta | Dr. Amruta Dorlikar | An International Multidsciplinary Quarterly Research Journal ISSN- 2277-5730 | Oct- Dec 2019 | | | | |
| **2** | Mudrit Prasar Madhyamanmadhe Agralekhache Mahatwa | Dr. Amruta Dorlikar | Uniresearch Multidisciplinary International E-Research Journal ISSN_ 2348-7143 Impact Factor- 6.261 | Dec- 2019 | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **3** | Paryavaran aani Marathi Sahitya: Anyonya Sambandh | Dr. Amruta Dorlikar | Mount Hill Publication Company, Delhi<br><br>ISBN 978-93-87305-37-3 | 2020 | | | | |
| **4** | Vidarbhatil Zadipatti<br><br>Yethil Lok-kala Dandar | Dr. Amruta Dorlikar | TIFAN (Traimasik Lok-kala Visheshank)<br>UGC Care Listed Journal<br><br>ISSN- 2231-573X | July- Dec<br><br>2020 | | | | |
| **5** | Ramdasanche Manache Shlok: Ek<br><br>Vishleshnatmak Chintan | Dr. Amruta Dorlikar | Uniresearch Multidisciplinary<br>International E-Research Journal<br>Peer Refereed & Indexed Journal<br>ISSN_ 2348-7143<br>Peer Reviewed<br><br>Impact Factor- 6.625 | Mar -2020 | | | | |

**Bibliometrics of the Publication During the year 2020-2021**

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 9. | Bhalchandra Nemade Yancha Deshiwad: Sankalpana V Swaroop | Dr. Amruta Dorlikar | Uniresearch Multidisciplinary International E-Research Journal<br>Peer Refereed And Indexed Journal<br>ISSN-2348-7143<br>Impact Factor- 6.625 | May- 2021 | - | Dr. MWPWS Arts, Comm.<br>& Science College Nagpur. | |
| 10. | Samakalin Kavitechya Pravahat Navodattaritil Stree Kaviyatrichya Streewadi Kavita | Dr. Amruta Dorlikar | Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies | June- 2021 | - | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | An International Peer Refereed Journal<br><br>ISSN-2319-4766 | | | | |
| 11. | Shantabai Hublikar Yanchya Aata kashala Udyachi Baat Madhun Vyakta Honaraq Streewad | Dr.Amruta Dorlikar | Unresearch Multidisciplinary International E-Research Journal<br>Peer Refereed and Indexed Journal<br><br>E-ISSN- 2348-7143 | Special Issue<br><br>July-2021 | - | - | - |
| 12. | Lalan Sarang Yanchya Jagle Jashi Ya AatmacharitratunVyakta Honara Streewad | Dr. Amruta Dorlikar | Uniresearch Multidisciplinary International E-Research Journal<br>Peer Refereed and Indexed Journal<br>E-ISSN- 2348-7143<br><br>Impact Factor-6.625 | Aug- 2020 | - | - | - |

**Bibliometrics of the Publication During the year 2021-2022**

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | Samakalin Kavitechya Pravahat Navdottaritil Stree Kaviyatrichya Streewadi Kavita | Dr. Amruta Dorlikar | Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies An International Peer Refereed Research Journal ISSN- 2319- 4766 | June 2021 | - | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 5. | Shantabai Hubalikar yanchya 'Aata Kashala Udyachi Baat' Madhun Vyakta Honara Streewad | Dr. Amruta Dorlikar | Uniresearch Multidisciplinary International E- Research Journal Peer Refereed & Indexed Journal ISSN 2348-7143 | July 2021 | **Impact Factor** **6.625** | **-** | **-** |
| 6. | Vaidarbhiy Samajik Karyakartya Seema Sakhare Yanchya Sangram Aatmacharitrachi Steevadi Angane Chikitsa | Dr. Amruta Dorlikar | B. Aadhar Peer Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal | Dec. 2021 | **Impact Factor** **7.675 (sjif)** | | |

**Bibliometrics of the Publication During the year 2022-2023**

| . No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 14. | Mi vanavasi Aatmakathnachi Vangmayin Pruthgatmta | Dr. Amruta Dorlikar | Research Journey International E-Resaarch journal Peer Reviewed, Refereed & Indexed Journal<br>E-ISSN-2348-7143 | Oct-Nov-Dec 2022 | | | |
| **15.** | Kusumagrajanchya Kavitetil Rashtriya Janiva : Ek Drushtikshep | Dr. Amruta Dorlikar | "**Perspective**"<br>A National Interdisciplinary Annual Research Journal<br>ISSN- 2249-5134 | 2022 | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **16.** | Fakt Sail Zala Dor Ya Kavya Sangrahatun Vyakta Honarya Stree Janiva | Dr. Amruta Dorlikar | Power of Knowledge<br>Special Issue March 2023<br>An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research<br>ISSN-2320-4494 | Mar. 2023 | Impact Factor : 3.7286 | | |

**Principal**

**Dr. Yeshwant Patil**

ISSN - 2249-5134

# Perspectives

A National Interdisciplinary A[illegible] Journal
2017

Peer Reviewed Research Journal for Interdisciplinary Studies in Arts, Commerce & Social Sciences

Vol. I Issue-VII
August-2017

Dr. Madhukarrao Wasnik
PWS Arts and Commerce College
Kamptee Road, Nagpur-26
(Reaccreditated 'B' by NAAC)

**मराठी विभाग-**


| | | | |
|---|---|---|---|
| 15. | भारतातील अन्नसुरक्षा : स्वरुप व उपाय | प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे | 45 |
| 16. | इतिहासलेखनशास्त्र म्हणजे काय ? | प्रा.डॉ.महेंद्र गायकवाड | 70 |
| 17. | फालुन दाफा : शरीर आणि मन यांच्या विकासाकरिता एक प्राचीन प्रभावी उच्च स्तरावरील साधना अभ्यास | डॉ. यशोधरा हाडके | 74 |
| 18. | पंचशीलाचा जागतिक समाज जीवनावर पडलेला प्रभाव : एक अध्ययन | डॉ. कैलाष फुलमाळी | 79 |
| 19. | विदर्भातील अस्पृश्योध्दार आंदोलनात नानासाहेब गवई यांचे योगदान | डॉ. राजु भा. खरडे | 82 |
| 20. | लोकशिक्षणात राजकीय पक्षाची भूमिका" | डॉ. विमल राठोड | 85 |
| 21. | बाबू आवळे यांचे वृत्तपत्रीय लेखन | डॉ. चंद्रशेखर पाटील | 87 |
| 22. | स्त्री आत्मचरित्रात 'आयदान' चे वेगळेपण | प्रा.अमृता डोरलीकर | 91 |
| 23. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विद्यार्थ्यांस संदेश | डॉ. निलीमा चौव्हान | 95 |
| 24. | स्त्रियांचे कैवारी डॉ. भिमराव रामजी आंबेडकर | प्रा. प्रणोती कांबळे | 98 |
| 25. | आधुनिक कृषी व भारतीय कृषी विकासातील प्रमुख योजना व संकल्पना | प्रा. मुरलीधर एस. नाकाडे | 100 |
| 26. | नोकरदारांच्या नुकसान भरपाईचा कायदा 1923 (The Employee's Compensation Act, 1923) | प्रा. विजय जा. पाठक | 103 |
| 27. | समाज प्रबोधक – संत तुकाराम | प्रा. डॉ. राम चौधरी | 106 |
| 28. | डॉ. आंबेडकरांची धम्मदिक्षा एक ऐतिहासीक पर्व | डॉ. रत्नपाल एम. डोहणे | 110 |
| 29. | नोटबंदीचे परिणाम | प्रा. एम. यू. टिपले | 112 |
| 30. | मराठी पौराणिक कादंबरीतील मिथके आणि नवीनता | डॉ. भारती खापेकर | 116 |

# स्त्री आत्मचरित्रात 'आयदान' चे वेगळेपण

**प्रा.अमृता डोरलीकर**

**सारांश** : आयदान हे पश्चिम महाराष्ट्रातल्या कोकणी दलित जिवनाचे दर्शन घडविणारे महत्त्वपूर्ण असे आत्मकथन आहे. 'आयदान'ची भूमिका स्त्रियांकडे वा दलितांकडे केवळ अन्यायपीडित म्हणून नव्हे तर वैचारिकतेच्या बाजूनी असल्याने दिसते. प्रादेशिक भाषेने लोकजीवन व स्वानुभव यांची सांगड घातलेली आत्मकथनातून दिसून येते. त्यातून लेखिकेचे व्यक्तिमत्त्वच अभिव्यक्त होत नाही तर समाजाची सुखदु:खे, आशा–आकांक्षा, ताण–तणाव जातिभेद, अंधश्रध्दा, अज्ञान, रूढीग्रस्तता, पुरूषप्रधान मानसिकता यांचे प्रत्ययकारी दर्शनही घडते. तसेच स्वत:च्या अस्मितेचा शोध, विद्रोहीप्रवृत्ती, आत्मनिष्ठता प्रांजळ निवेदन ही आत्मकथनाची वैशिष्ठ्ये सांगता येतात. या आत्मकथनातून दाहक वास्तवाचा अनुभव वस्तुनिष्ठपणे आणि तेवढ्याच तटस्थपणे निवेदनातून आलेला दिसून येतो. त्यामुळे उर्मिला पवारांच्या 'आयदान' आत्मकथनाला एक वेगळीच उंची प्राप्त झालेली दिसून येते.

**शब्दसंकेत** : आयदान, आत्मचरित्र, कोकाण, स्त्री

**प्रस्तावना** : 'आत्मचरित्र'या वाड्मयप्रकाराला मराठी साहित्यात एक विशिष्ट अशी परंपरा लाभली आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी साहित्यात 'आत्मचरित्र' हा वाड्मयप्रकार विशेषत्वाने लोकप्रिय झाला आहे. आत्मचरित्रात जीवनाचे सिंहावलोकन करावे ही आत्मचरित्रामागील प्रेरणा आहे. पुरूषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रापेक्षा स्त्रियांनी लिहिलेली आत्मचरित्रे जास्त वाचनीय आहेत असे लक्ष्यात येते. कारण स्त्रिया अधिक प्रामाणिक असतात. मनमोकळेपणाने आपल्या भावभावनांचे व सुखदु:खाची चित्रे आत्मचरित्रात त्या उत्कटपणे मांडू शकतात. आत्मगौरवापेक्षा मुक्तविष्काराला स्त्रियांच्या आत्मचरित्रात जास्त वाव असतो.

आत्मचरित्र कशाला म्हणावे? याबाबत चर्चा करताना वेगवेगळया साहित्यीकांनी वेगवेगळया प्रकारे आत्मचरित्राची व्याख्या केली आहे.

**शुमेकर** यांच्यामते, "Autobiography is the professedly truthful record of an Individual Written by himself and composed as a single work".[1] तर

The concise oxford Dictionary of English Literature मध्ये Autobiography ना अर्थ पुढीलप्रमाणे दिला आहे. "The story of ones life written by ones self".[2]

A Dictionary of literary terms मध्ये Autobiography म्हणजे An account of a mans life by himself".[3] असा अर्थ दिला आहे.

**प्रा. वा. ल. कुळकर्णी** आत्मचरित्राविषयी आपले मत मांडताना म्हणतात, ''ज्या अनुभवांची सृष्टी येथे साकार होण्यासाठी धडपडत असतो, तो एका व्यक्तिमनाला जाणवलेला व जाणवणारा एक अनन्य साधारण अनुभव असतो''[4] सरसकट अनुभवापेक्षा आगळयावेगळया अनुभवाची मांडणी वैशिष्टयपूर्ण ठरू शकेल असे त्यांना वाटते.

**प्रा.प्रभा गणोरकर** याबाबत म्हणतात, ''आत्मचरित्रामागची प्रमुख प्रेरणा आत्मशोधाची आहे. काही आत्मचरित्रात हा शोध पुरेशा प्रामाणिकपणाने आणि मन:पुर्वकतेने केले जाण्याऐवजी आपल्या आयुष्यातील संस्मरणीय निवेदनावर अधिक भर दिला जातो, तर काही आत्मचरित्रात हा शोध घेतांना आत्मनिरीक्षण, आपल्या वर्तनामागच्या कारणांची मीमांसा व विश्लेषण आणि काही वेळा आत्मसमर्थन लेखक करताना दिसतो.''[5] आत्मचरित्रातील स्वशोध याठिकाणी महत्वाचा वाटतो.

**डॉ. सदा कऱ्हाडे** यांच्यामते ''स्वत:च्या जीवनाचे दूरस्थपणाने सिंहवलोकनवृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र''[6] होय.

आत्मचरित्राची मीमांसा करताना **आनंद यादव** लेखनाच्या प्रेरणांवर प्रकाश टाकताना म्हणतात,''आत्मचरित लेखनामागे इतिहास लेखनाचीच पण थोडया वेगळया स्वरूपाची प्रेरणा असू शकते.''[7] दुसरी प्रेरणा ते अशी सांगतात की,''आत्मचरित लिहिण्यामागे आत्मशोधनाची प्रेरणा असू शकते.''[8]

आत्मचरित्र लिहिण्यामागे अनेक हेतू असतात त्यातला प्रमुख हेतू आत्मशोध हा होय. आपले आयुष्य आपण कसे जगलो हे मागण्याचा मुख्य उद्देश आत्मचरित्रकाराचा असतो. आत्मगौरव, आत्मसमर्थन हे दोषही अनेक आत्मचरित्रातून दिसून येतात. मराठीतील पहिले आत्मचरित्र म्हणून दादोबा पांडुरंग यांनी 'राव बहादूर दादोबा पांडुरंग' नावाने पहिले आत्मचरित्र लिहिले. त्यानंतर रमाबाई रानडे यांचे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे स्त्रीने लिहिलेले पहिले आत्मचरित्र ठरले. त्यानंतर लक्ष्मीबाई टिळकांचे 'स्मृतिचित्रे', पार्वतीबाई आठवले यांचे 'माझी कहाणी' हे आत्मचरित्र लिहिले. १९६०नंतर विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत.स्त्री आत्मचरित्राच्या अनुषंगाने विचार करताना असे लक्षात येते की, दलित स्त्रियांनी लिहिलेले आत्मचरित्र सकस असल्याचे जाणवते. या स्त्रियांना आत्मचरित्र लिहिण्याची जी प्रेरणा मिळाली त्यात दलित वाङ्मयातील पहिले आत्मकथन म्हणजे प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी' त्यानंतर प्रा.केशव मेश्राम यांचे 'हकीकत व जटायु', दया पवारांचे 'बलुतं' इ. आत्मचरित्रे त्यांच्या डोळ्यासमोर होती. दलित स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रामध्ये विमल मोरे यांचे 'तीन दगडांची चूल', बेबी कांबळे यांचे 'जीणं आमुचं', शांताबाई कांबळे यांचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा', कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट', मुक्ता सर्वगौड यांचे 'मिटलेली कवाडे' जनाबाई गिऱ्हे यांचे 'मरणकळा', शांताबाई दाणी यांचे 'रात्रंदिन आम्हा' इ. आत्मचरित्रे लिहिल्या गेली १९८० ते आजतागायतही लिहिल्या जात आहे.

१९६० नंतर स्त्रियांच्या लिखाणाचे प्रमाण वाढले, त्यामुळे मराठीमध्ये स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांची संख्या वाढली आहे. जसजशी स्त्रियांनी अनेक क्षेत्रे काबीज केली तसतशी त्यांच्या आत्मचरित्रात विविधता आली. स्त्री मुक्तीने चळवळीने स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली गेली. त्यामुळे स्त्री आत्मचरित्राची एक परंपरा निर्माण झाली. स्त्री आत्मचरित्राचे अनेक भाग पडता येतील हे विभाजन कार्यक्षेत्रानुसार किंवा आत्मचरित्र लेखनाच्या हेतूनुसार पाडलेले आहेत.

१) पती गौरवार्थ लिहिली गेलेली आत्मचरित्रे.

२) सहजीवनाचे चित्रण असलेली आत्मचरित्रे.

३) चित्रपट क्षेत्रातील स्त्री आत्मचरित्रे

४) समाजकारणातील स्त्रियांची आत्मचरित्रे

५) साहित्य क्षेत्रातील लेखिकांची आणि साहित्यिकांच्या पत्नींची आत्मचरित्रे.

६) दलित स्त्रियांची आत्मचरित्रे इत्यादी

या सर्व प्रकारच्या आत्मचरित्रातून त्या त्या क्षेत्रात नावाजलेल्या स्त्री आत्मचरित्रातून आपल्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला आहे. या सर्वांमध्ये दलित स्त्री आत्मचरित्राचे एक वेगळे स्थान आहे. याचे कारण त्यामध्ये असलेली विद्रोहात्मकता. दलित स्त्री आत्मचरित्राचीही प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात आहे. दलित स्त्री आत्मचरित्रांकी ऊर्मिला पवार यांचे 'आयदान' चे वेगळेपण या शोधनिबंधातून मांडण्याचा प्रयत्न याठिकाणी केला गेलेला आहे.

दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचे स्वरूप वैविध्यपूर्ण आहे. यातील समाजजीवन दारिद्र्याने पिळलेले व आर्थिक अरिष्ट अस्पृश्यतेमुळे मिळणारी वागणूक पशुतुल्य आहे. अंधश्रध्दा,रूढी आणि परंपरेमुळे निर्माण झालेली दिशाहीनता इथे प्रत्ययाला येते. भुकेमुळे दलित समाजाची होणारी होरपळ याचे चित्रण त्यांच्या आत्मचरित्रातून उमटलेले आहे. दलित शोषित स्त्रियांचे चित्रण जग आत्मचरित्रात दृष्टीस पडते. कुटुंबसंस्था, जातीव्यवस्था, पुरूषप्रधान संस्कृती ही या स्त्रियांच्या शोषणाची मुख्य केंद्रे आहेत. शोषणमुक्तीसाठी झगडणाऱ्या या स्त्रिया दु:खी कष्टी दलित स्त्रियांच्या प्रतिनिधी आहेत. दलित स्त्रियांच्या आत्मचरित्राचा विचार करण्यासाठी दलित समाज, चळवळ व त्या स्त्री जीवनाचा विचार करणे योग्य ठरेल.

**प्रा. केशव मेश्राम** यांच्यामते "हजारो वर्षे ज्यांच्यावर अन्याय झाला, अशा अस्पृश्यांना दलित म्हटले पाहिजे व त्या वर्गातील लेखकांनी निर्माण केलेल्या साहित्यास दलित साहित्य म्हणावे"

**गो. म. कुळकर्णी** यांच्यामते– "तळागाळात रूतून बसलेला सर्व उपेक्षित समाज म्हणजे दलित समाज" होय.

दलित वाङ्मयात स्त्रियांची आत्मकथने १९८० नंतर प्रसिध्द झालेली आहेत. दलित स्त्रियांची आत्मकथनं अधिक संयमी, पारदर्शी आहेत. भूतकालीन जीवनाला नितळपणाने सामोरे जावून त्यांनी आत्मलक्षी अभिव्यक्ती सादर केली आहे. दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून प्रकट झालेले स्त्री जीवन वेदनेने आणि करूणेने ओथंबलेले आहे. हे स्त्री जीवन अस्पृश्य समाजातील आहे. नरकयातना भोगणारी स्त्री ही दलिताहून दलित आहे. कारण ती उच्चवर्णीय समाजाकडून धिक्कारलेली स्वसमाजातील पुरूषवर्गाकडून पिळली गेली आहे. तिचे शोषण शारिरीक आणि मानसिक स्वरूपाचे आहे.दलित स्त्रीचे स्त्रीत्व आणि दलितत्व

स्त्रियांच्या शोषणास कारणीभूत ठरले आहे. ''जातिव्यवस्था ही भारतीय स्त्रियांचे शोषण करणारी अनन्य संस्था आहे. त्यामुळेच भारतीय स्त्री शोषणास अधिकच भर पडली आहे.''

दलित स्त्रियांच्या शोषणाचे चित्र त्यांच्या आत्मकथनातून प्रकट झाले आहे. दलित आत्मकथनामध्ये त्यातही दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून 'आयदान' चे विशेष महत्त्व आहे. ते एक दलित स्त्रीचे आत्मकथन म्हणून नव्हे तर दलित स्त्री जाणीवेचे रूपांतर एक व्यापक सामाजिक आकलन करणारे आत्मकथन म्हणून हे आत्मकथन विशेष लक्षणीय आहे. 'आयदान'ही उर्मिला पवारांची आत्मकथा आहे. पुर्वार्धाची विमल आणि उत्तरार्धातील उर्मिलाच्या जीवनाचा उत्तरार्ध असा तो प्रवास आहे. हा प्रवास रेखाटताना लेखिका वस्तुनिष्ठ पध्दतीने तटस्थपणे आपल्या आयुष्याकडे बघताना दिसतात. कुठेही सांकेतिकता नाही. पारदर्शिता हे 'आयदान'चे वैशिष्टय. पुर्वायुष्यातील नातीगोती, दारिद्रय, चालिरिती, रूढी, परंपरा जातीयतेचे हिंसक अनुभव,भटशाहीचे प्रस्थ, ब्राह्मण हस्तक्षेपाला विरोध करणारी सुधारकीवृत्ती दलितांची जीर्ण मानसिकता उर्मिला पवारांनी अतिशय समर्थपणे चित्रीत केली आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीने सारे दलित विश्वच मोहरलेले संघर्ष सन्मुख झालेले होते. आणि त्याच प्रकाशात उर्मिला पवारांचे मनोविश्व आणि विचारविश्व तेजाळून आलेले दिसून येते.

''आयदान'' च्या प्रस्तावनेत स्वतः उर्मिला पवार म्हणतात, ''प्लास्टिकचे युग येण्यापुर्वी आपल्या संसारात बांबूपासून तयार केलेली सुप, गेवळया, परडया, हारे, करंडे, इत्यादी वस्तूंना महत्त्व होते. या वस्तूंचे सामान्यरूप म्हणजे 'आयदान' माझी आई आयदान करायची. आईच्या हातात अखंड फिरणारे आयदान आणि आमच्यामधला वेदनेचा धागा एक आहे हेही जाणवते.

'आयदान' म्हणजे बांबुपासुन तयार केल्या जाणाऱ्या सुप, गेवळया, परडया, हारे, करडे यासारख्या वस्तू. कोकणात महार जातीचा हा परंपरागत व्यवसाय होता. उर्मिला पवारांच्या आई ही आयदान तयार करायच्या. आईच्या हातातले अखंड फिरणारे आयदान आणि आपले लेखन याची वीण एकच आहे.आपल्या वेदनेचा धागा एकच आहे असे उर्मिला पवार म्हणतात.त्या स्वतः जेव्हा सक्षम झाल्या आणि स्वतःच्या जिवनाचे सिंहावलोकन करतात तेव्हा त्यांच्यासमोर त्यांचे बालपण, नात्यातल्या स्त्रियांची दुःखे जातीव्यवस्थेने केलेले शोषण तसेच पुरूषप्रधानतेने केलेली गळचेपी हे सारं घडले तसे आपल्या समोरं उर्मिला पवारांनी मांडलेले आहे.

महाड ते राजापुर यामध्ये कोकणातल्या मागासलेल्या भागातल्या मागासलेल्या जातीत मुलगी म्हणून जन्मलेल्या उर्मिला पवार कोकणातील व मुंबईतील आपल्या व्यक्तिगत, कौटुंबीक आणि सामाजिक आयुष्यातील अनुभवांचे अत्यंत प्रांजळ, सहज आणि निःसंकोच कथन त्यांनी केलेले आहे आपले गाव, घर, कुटूंब, शाळा, शिक्षक, खेळ, छंद, वयाने वाढताना प्रेमात पडणं, लग्न, सासरी राहणे स्वतंत्र संसार थाटणे, मुंबईतील आयुष्य, सामाजिक चळवळीतील सहभाग, सहजीवनातील ताण, लेखिका म्हणून जडणघडण प्रिय व्यक्तींच्या मृत्यूचे आघात अशाक्रमाने जीवनकथेचे निवेदन येते. त्यातून स्वतःच्या आत्मशोधाबरोबरच कोकणातील दलित समाजाचे व संस्कृतीचे प्रातिनिधिक दर्शनही त्यांच्या आत्मकथनातून घडते.

दलित समाजाच्या स्थितीगतीच्या प्रातिनिधीक चित्राची पार्श्वभुमी 'आयदान'ला प्राप्त झाली आहे. कोकणातल्या आपल्या सामाजिक पर्यावरणाचे, लोकजीवनाचे सम्यक चित्रच उर्मिला पवार उभे करतात. यात सणवार, श्रध्दा, समजुती राहणीमान, भावकी, पंचायत, जातीयता, खेळ, तमाशा, देवदेवता, लग्नकार्य व त्यातील रीतीरिवाज विधी गाणी, खाणे–पिणे सारे सजग झाले आहे. उर्मिला पवारांच्या लेखनात हे सामाजिक वास्तव अतिशय जिवंतपणे उमटले आहे.

'आयदान'मध्ये आलेली अनेक व्यक्तिचित्रे विशेषतः स्त्रियांच्या व्यक्तिरेखा हे 'आयदान'चे वैभव आहे. आई–वडिल, भावंडे, नवरा, मुले तर आहेतच पण माहेर–सासरच्या गोतावळयातील अनेक माणसे त्यांच्या लकबींनिशी, स्वभावनिशी अगदी अस्सलपणे साकार झाली आहेत. 'आई होन म्हंजे सती जान बाय, सती' ..... असं सांगणाऱ्या आयेची व्यक्तिरेखा, 'आयदान' मध्ये महत्त्वाची आहे. या व्यक्तिरेखेला पुरक अशी दुसरी व्यक्तिरेखा म्हणजे मालवणी तिरकसपणा असलेली सासूची स्वतःच्या पतीबद्दल लेखिकेने ज्या परखडपणाने लिहिले आहे ते लक्षणीय आहे. एक व्यक्ती म्हणून असलेल्या पतीच्या आत्मसन्मानाला आणि दोघांमधील भावनात्मक नात्याला धक्का न लावता स्त्री–पुरुष नात्याचे, नवरेशाहीचे, पुरुषी अहंकाराच्या मानसिकतेचे विश्लेषण तटस्थपणे करण्याचे आव्हान लेखिकेने ताकदीने, प्रगल्भपणे पेलले आहे. एकूणच या आत्मकथनातून जाणवणारी हिंमत निर्भयता लक्षणीय अशी झाली आहे.

'आयदान' या आत्मकथनात स्वतःला स्वतःच्या नजरेतून पाहण्याची व्यक्त होण्याची वृत्ती दिसुन येते.आत्मभान आल्यावर प्रत्यक्ष जीवनातील विसंगती, कोंडमारा, जगण्यातील अर्थपूर्णता, निरर्थकता शोधणे हा प्रवास आत्मकथनातून व्यक्त होतो. या प्रवासामध्ये व्यक्तीचे होणारे सामाजिकीकरण आणि त्याच्या चौकटीत व्यक्ती स्वातंत्र्य आत्मनिर्भर होऊन जगणे हा संदर्भ

दलित स्त्री आत्मकथनातील स्त्री भोवती दलितत्व, पुरुषसत्ता भिन्न तसेच कष्टकरी असण्याचे संदर्भ जाणवतात. 'आयदान'च्या पार्श्वभूमी मनोगतातून आत्मकथन लिहिण्यामागची प्रेरणा उर्मिला पवार यांनी मांडली आहे. आई–मुलगी यांच्यात मौखिक असणारी सर्जकता जगण्याच्या रेट्यात वेदना सोसत स्वतःबरोबर इतरांच्या जगण्याला घडविणारी 'स्त्री' असण्याचा सन्मान जाणवतो. धर्मांतरानंतर लेखिकेच्या घरात देवादिकांच्या मूर्ती जाऊन तिथे बुद्ध–आंबेडकरांच्या प्रतिमा बसविल्या तसेच सार्वजनिक कृष्णवदना पाहिल्याचा पाहणे याचीही दखल लेखिकेने घेतली आहे. आत्मकथनाच्या अखेरीस उर्मिला पवार यांच्या मुलाचा मेला अपघातात अकाली मृत्यु, 'आय'च्या पतीचा मृत्यु, भावाची आत्महत्या याघटनेमुळे आतड्याला पीळ पाडणारे आघात सोसल्याचे जाणवते. आत्मकथनाच्या मध्यावर लोपलेली आत्मशोधाची प्रेरणा मृत्यूचे वेदनादायी सत्य स्विकारताना मथळ्यातील त्या वेदना व्यक्त होताना दिसतात.

**निष्कर्ष** 'आयदान' मध्ये उर्मिला पवारांनी कोकणातल्या प्रादेशिक शब्दांचा भाषाशैलीचा वापर केला आहे. अनेक अर्थभिन्न शब्द आत्मानुभवाच्या प्रगटीकरणातून येताना दिसतात. कोकणातल्या स्त्रियांच्या वाट्याला आलेल्या जीवघेण्या कष्टावरून कोकणातील आडवाटेच्या प्रवासावळे गावातील समुद्र, खाड्या, नद्या माश्यांचे प्रकार, जंगलदऱ्यांचे वर्णनही आलेले आहे. तसेच 'मालवणी' या बोलीभाषेचा वापरही आत्मकथनात केलेला असून तो त्यांच्या बोलीचा आणि संस्कृतीचा भाग झालेला आहे. कोकणी, मालवणी कष्टकरी, स्त्री–पुरुषांची, रेखाटलेली भाषा प्रवाही, सहज व सुंदर आहे. कोकणातील दलितांचे जीवन वास्तवच या आत्मकथनातून व्यक्त होते.

एकूणच 'आयदान' हे पश्चिम महाराष्ट्रातल्या कोकणी दलित जिवनाचे दर्शन घडविणारे महत्त्वपूर्ण असे आत्मकथन आहे. 'आयदान'ची भूमिका स्त्रियांकडे वा दलितांकडे केवळ अन्यायपीडित म्हणून नव्हे तर वैचारिकतेच्या बाजूची असल्याचे दिसते. प्रादेशिक भाषेने लोकजीवन व स्वानुभव यांची सांगड घातलेली आत्मकथनातून दिसून येते. त्यातून लेखिकेचे व्यक्तिमत्त्व अभिव्यक्त होत नाही तर समाजाची सुखदुःखे, आशा–आकांक्षा, ताण–तणाव जातिभेद, अंधश्रद्धा, अज्ञान, रूढीग्रस्तता, गुलामगिरीची मानसिकता यांचे प्रत्ययकारी दर्शनही घडते. तसेच स्वतःच्या अस्मितेचा शोध, विद्रोहीप्रवृत्ती, आत्मनिष्ठता सोज्वळ निवेदन ही आत्मकथनाची वैशिष्ट्ये सांगता येतात. या आत्मकथनातून दाहक वास्तवाचा अनुभव वस्तुनिष्ठपणे आणि तेवढ्याच तटस्थ निवेदनातून आलेला दिसून येतो. त्यामुळे उर्मिला पवारांच्या 'आयदान' आत्मकथनाला एक वेगळीच उंची प्राप्त झालेली दिसून येते.

## संदर्भ


१) इंग्लिश ऑटोबायोग्राफी /शु मेकर; इटस् जेनेटिक अँन्ड फेजेस, ऑलिव्हर अँन्ड बॉईड, लंडन १९३० पृ. १०६
२) The concise oxford Dictionary of English literature; London, II[nd] Edition 1970, P.36
३) A Dictionary of Literary terms, J. A. Gudden, London, 1977, P.6
४) वा. ल. कुलकर्णी– 'साहित्य आणि समिक्षा' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६३,पृ.६८
५) दैनिक महाराष्ट्र/दि. १५ मे १९९४. प्रा. राम शेवाळकर संपादित 'निवडक मराठी आत्मकथा' या ग्रंथाचे प्रभा गणोरकर यांनी केलेले परीक्षण.
६) डॉ. सदा कऱ्हाडे– 'चरित्र आत्मचरित्र' ; मुंबई १९९४, पृ १०९६
७) डॉ. आनंद यादव– 'आत्मचरित्र मीमांसा', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, फेब्रुवारी, ९८, पृ. ८
८) तत्रैव–पृ.२१
९) गो.म. कुलकर्णी : 'चिंतन दलित साहित्याचे' विशाखा दिवाळी अंक, १९८४ पृ १३५.
१०) डॉ. सिसिलिया कार्व्हालो, सतीश काळसेकर – 'आयदान' : सांस्कृतिक ठेवा, प्रकाशक–लोकवाङ्मय गृह, मुंबई पहिली आवृत्ती २००३


ooo////ooo


**प्रा.अमृता डोरलीकर**
मराठी विभाग,
डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस.महाविद्यालय

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

July-August-September-2017

Vol. 4 Issue 3

## मराठी साहित्य संशोधन विशेषांक

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 225/-

# अनुक्रमणिका


| अ.नं. | शोध निबंधाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| @ | संपादकीय | - डॉ. धनराज धनगर | 05 |
| 1 | आदिवासींचे धवळे : उगम आणि विकास | - डॉ. अंजली मस्करेन्हस | 06 |
| 2 | लोकसाहित्यातील लोकसंस्कृतीतून येणाऱ्या लोकप्रयोज्य कलांचा अभ्यास | - डॉ अनिता सोनवणे | 15 |
| 3 | गोर बंजारा लोकसाहित्यातील मानवी मूल्ये | - प्रा. नेमीचंद चव्हाण | 20 |
| 4 | बंजारा लोकसाहित्यातील समाजदर्शन | - प्रा. तुकाराम चव्हाण | 28 |
| 5 | लोकसाहित्य संशोधनाच्या नव्या दिशा | - डॉ. निवृत्ती मिसाळ | 33 |
| 6 | लोकसाहित्य संशोधन अभ्यास पद्धती | - डॉ. सागर लटके | 35 |
| 7 | मराठी आख्यायिका : एक आकलन | - डॉ. भाऊसाहेब गमे | 40 |
| 8 | महानुभावीय साहित्याचे संशोधन-संपादन-प्रकाशन : पार्श्वभूमी व संधी | - डॉ प्रमोद आंबेकर | 44 |
| 9 | महानुभावीय व वारकरी संप्रदायाच्या अनुषंगाने मराठी साहित्य | - श्री अनिल महाजन | 49 |
| 10 | 'संतु आंतोनीची जीवित्वकथा' या ग्रंथावर ज्ञानेश्वरीचा प्रभाव | - प्रा. विनय मडगावकर | 54 |
| 11 | संत ज्ञानेश्वरांचे कार्य आणि कर्तुत्व | - एम. आर. साळुंखे | 58 |
| 12 | संत चोखामेळा यांच्या अभंगातील समाज वास्तव | – डॉ. उज्वला पाटील | 64 |
| 13 | नामयाची दासी जनी | - डॉ. वसंत शेंडगे | 68 |
| 14 | समर्थ रामदास स्वामींचे प्रशासन विषयक विचार | - डॉ. अलका वडगे | 73 |
| 15 | शाहिरी वाङ्मयातील ध्रुवतारा : भाऊ फक्कड | - प्रा. संगीता सूर्यवंशी | 77 |
| 16 | गीतकार ना. धों. महानोर | - डॉ. तुषार चांदवडकर | 85 |
| 17 | विठ्ठल वाघ यांच्या कवितेतील कृषिनिष्ठ जाणिवा | - डॉ. ममता दयणे | 89 |
| 18 | डॉ. यशवंत मनोहरांच्या कादंब-यांतून अभिव्यक्त होणारा आंबेडकरी स्त्रीवाद | – प्रा. मनीषा डोंगरे | 94 |
| 19 | धादांत खैरलांजी : स्त्री दृष्टीकोनातून | - डॉ. शंकर मुंढे | 97 |
| 20 | मराठी साहित्यातील दलित स्त्रियांची आत्मकथने :एक परीक्षण | - डॉ. मनीषा नागपुरे | 99 |
| 21 | दलित साहित्यातील कथेचे अवलोकन | – डॉ. चंद्रमणी गजभिये | 105 |
| 22 | शंकरराव खरातांची दलित कथा एक आकलन | - डॉ. आर. एम. केदार | 109 |
| 23 | महात्मा फुले यांच्या वाङ्मयातील वैचारिकता | –प्रा. मिलिंदकुमार देवरे | 113 |
| 24 | निरऱ्या सहस्त्रकाची कविता : आस्वाद आणि आकलन | - डॉ. सिद्धार्थ भगत | 117 |
| 25 | मराठी भाषेची स्थिती - गती | - डॉ. सेहल मराठे | 124 |
| 26 | समकालीन भारतीय साहित्य | – प्रा. सर्जेराव जाधव | 128 |
| 27 | मराठी नाट्य वाङ्मयाची पूर्व पीठिका | – डॉ. राम चौधरी | 133 |

| | | | |
|---|---|---|---|
| 28 | नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कवितेतील शेतकरी आत्महत्याविषयक आशय आणि संदर्भ | – प्रा. अनिल भगत | 138 |
| 29 | ललित लेखातील आशय नाविन्य | – डॉ. भूषण वंड | 146 |
| 30 | अनुवाद, भाषांतर आणि रुपांतर | – प्रा. विपिन वैराट | 149 |
| 31 | आत्मचरित्र : एक हृदय स्पर्शी वाङ्मय प्रकार | – प्रा. अमृता डोरलीकर | 153 |
| 32 | मानवी भावबंधांचे उत्कट स्पंदन 'भूमी' | – डॉ. रामलीला पवार | 157 |
| 33 | मराठी साहित्यातील ठळक समीक्षा प्रवाहांचे स्वरूप वं मूल्यमापन | – प्रा. गौतम थोरात | 165 |
| 34 | हरिश्चंद्र बोरकर यांच्या नाट्य वाङ्मयाचे वाङ्मयीन मूल्यमापन | - संजयकुमार निंबेकर | 170 |
| 35 | समकालीन वऱ्हाडी कवितेचा 'मुगुट' शंकर बडे | - डॉ. ममता दयाणे | 175 |

## UGC Journal Details

Name of the Journal : Research Journey

ISSN Number :

e-ISSN Number : 23487143

Source: UNIV

Subject: Marathi

Publisher: Swatidhan International Publication

Country of Publication: India

Broad Subject Category: Multidisciplinary

Print

## UGC Journal Details

Name of the Journal : Research Journey International E Research Journal

ISSN Number :

e-ISSN Number : 23487143

Source: UGC

Subject:

Publisher: Swatidhan Pub. Yevla

Country of Publication: India

Broad Subject Category: Arts & Humanities

Print

*या विशेषांकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबधित लेखाकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013) | Vol. 4, Issue 3
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 July-Aug.-Sept. 2017

# आत्मचरित्र: एक हृदयस्पर्शी वाङ्मयप्रकार

प्रा. अमृता डोरलीकर
सहाय्यक प्राध्यापक, मराठी

Mobile No. 9326234282

आत्मचरित्र हे एका अर्थाने आत्मचिंतन असते. मानवी जीवनातील सगळया बऱ्या–वाईट गोष्टींचा तो आत्मशोध असतो. ना खंत ना खेद यावृत्तीतून केलेले ते एक आत्मविश्लेषण असते. स्वत:चा शोध घेणे ही मानवी मनाची एक मुलभूत प्रेरणा आहे. व्यक्ती म्हणून आपल्याला जी ओळख असते ती या समाज व्यवस्थांनी प्रस्थापित केलेल्या संकेताच्या आरशामधुन हे संकेत हे आरसे आपल्याला लिंग जात, धर्म इत्यादींच्या प्रस्थापित मान्यामध्ये ठोकून बसवतात. दुसऱ्याचे जीवन जाणून घेण्याचे पुरेपुर समाधान आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार देऊ शकतो गतजीवनाला सुसंगत आकार व अर्थ देण्याचा प्रयत्न आत्मचरित्रात होत असल्याने बरेचदा वाचकही अंतर्मुख होतो आत्मशोध करायला लागतो.

प्रस्तावना :–

व्यक्तीला आत्मचरित्र का लिहावेसे वाटते असा प्रश्न जेव्हा पडतो, तेव्हा माणसाचा स्वत:वर लोभ असतो. आपल्यानंतर आपली स्मृती कायम रहावी आणि आपल्या जिवनातील काही सांगण्यासारखे आहे. याहेतूने आत्मचरित्रे लिहीली जातात.

आत्मचरित्र या संकल्पनेतील :आत्म' हे विशेषण 'आत्मन्' या शब्दापासून आणि आत्मा हे नाम संस्कृत मधून मराठीत आले. आत्मचरित्र म्हणजे स्वत:च स्वत:बद्दल लिहिलेला ग्रंथ होय. अनेकांनी आत्मचरित्र या संकल्पनेचे वेगवेगळे अर्थ सांगितले आहेत. त्यावरुन आत्मचरित्र म्हणजे स्वत:च्या जिवनाविषयी स्वत: लिहिलेली कहाणी असे म्हणता येते. अर्थात ही कहाणी अंतर्मुख होऊन स्वजीवनाचे सत्यदर्शन घडविण्याच्या दृष्टीने तटस्थतेने लिहिली असावी. आत्मचरित्रात कल्पनेला, अवास्तव घटनांना स्थान नसते किंवा लिहिण्यामागे मुख्य उद्देश मनोरंजन करणे हा नसतो. आत्मचरित्रात 'स्व' चित्र रेखाटण्याच्या दृष्टीने 'तटस्थ' व 'प्रांजळ' भूमिका घेऊन जीवनातील काही काळाची, घटनांची कलात्मक मांडणी असते.

आत्मचरित्र केव्हा लिहावे यासंबंधी असे नियम घालून दिलेले दिसत नाही. आत्मचरित्र लिहिण्यासाठी कुठल्याही काळ, वेळेची गरज नसते. आत्मचरित्र स्वत:च्या जीवनाविषयी लिहायचे असल्यामुळे काही विशिष्ट गोष्टींचा विचार करुन लिहावे लागते. म्हणजेच स्वत:ची स्तुती, आत्मगौरव या गोष्टी टाळून स्वत:च्या गुणदोषासकट आत्मचरित्र लिहिणे आवश्यक असते. 'स्व' चा तटस्थपणे शोध घेणे ही आत्मचरित्र लेखनाची मुख्य कसोटी असते. आत्मचरित्रात स्वत: व्यतीरिक्त इतर पात्रांना/व्यक्तीरेखांना लेखनात किती महत्त्व द्यायचे हे सुद्धा ठरवणे आवश्यक असते.

आमचरित्र लेखनामागे कोणत्या प्रेरणा उद्देश व हेतू असतात याची विस्ताराने चर्चा 'आत्मचरित्र मीमांसा' या ग्रंथात आनंद यादवांनी केली आहे. त्यांच्यामते, ''आत्मचरित्र लेखनामागे इतिहास लेखनाचीच पण थोड्या वेगळया स्वरुपाची प्रेरणा असू शकते''[1] दुसरी महत्त्वाची प्रेरणा त्यांनी आत्मशोधाची सांगितली आहे ते म्हणतात, ''आत्मचरित्र लिहिण्यामागे आत्मशोधाची प्रेरणा असू शकते''[2]

आत्मचरित्र लेखनाच्या हेतूवर अनेकांनी प्रकाश टाकला आहे. अ.म. जोशी म्हणतात, ''आत्मचरित्र लिहिण्याने लेखकाचा हेतू आपल्या जीवनापासून लोकांस काहीतरी शिकावयास मिळावा असा असेल किंवा केवळ

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013) | Vol. 4, Issue 3
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 July-Aug.-Sept. 2017

विरंगुळा म्हणून आपल्या गत जीवनाकडे एकदा वळून पाहून त्यातील आठवणींची आपल्या मनाशी उजळणी करावी व आपल्याला आलेले बरे–वाईट अनुभव इतरांना सांगावे असा असेल किंवा सुक्ष्म आत्मविश्लेषण करुन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा झाला याचा शोध घेण्याचा प्रयत्न करावा व त्या प्रयत्नाचे फळ इतरांना दाखवावे असा असू शकेल किंवा दुसराही असू शकेल''.[3]

आत्मचरित्र लिहिण्यामागे अनेक हेतू, कारणे असतात. त्यातला प्रमुख हेतू आत्मशोध असायला पाहिजे स्वत:वरचे प्रेम ही माणसाच्या जगण्याची मुलभूत प्रेरणा असते. आपले आयुष्य कसे गेले जीवनातले सुखदुःख सांगत असताना दु:खातून कसे बाहेर पडलो हे सांगण्याचा हेतू अनेक आत्मचरित्रांचा असतो. आत्मस्तुतीला बऱ्याचदा आत्मचरित्राचा दोष मानला जातो. त्यात्या काळातील मानवी समाजाचा इतिहास समजून घेण्याच्या दृष्टीने कच्ची सामुग्री म्हणूनही आत्मचरित्रे महत्त्वाची ठरतात. त्या त्या समाजाचे तणाव, संघर्ष, घटना यांचा विशिष्ट जीवन आणि निर्माण झालेल्या भावभावना याचे प्रतिबिंब आत्मचरित्रात दिसून येते. खऱ्या आत्मचरित्रात कठोर आत्मपरीक्षण असावे लागते. तटस्थवृत्तीने, आत्ममूल्यमापन व भोवतालच्या परिस्थितीचे वस्तुनिष्ठरितीने केलेले वर्णन आत्मचरित्रात असावे लागते.

यावरुन असे स्पष्ट होते की, स्वत:च्या जीवनाविषयी इतरांना कळावे व स्वत:चा आत्मशोध घेणे या उद्देशाने आत्मचरित्र लिहिली जातात. बरेचदा इतरांपेक्षा वेगळे वैविध्यपूर्ण जीवनातले अनुभव लिहिण्यासारखे असले तर आत्मचरित्रालाही निराळेपण प्राप्त झाल्याचे दिसते.

डॉ. विमल भालेराव यांच्यामते, ''स्वजीवन तटस्थपणे न्याहाळून त्यातून आवश्यक त्या बाबींची निवड करुन त्यांचे प्रांजल निवेदन व कलात्मक मांडणी यातून 'स्व' चित्र रेखाटणे म्हणजे 'आत्मचरित्र' होय''.[4]

डॉ. स.दा. कऱ्हाडे यांच्यामते, ''स्वत:च्या जीवनाने दूरस्थपणाने सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र''.[5]

डॉ. रा.ग. जाधव यांच्यामते – ''आपल्या जीवनविषयक अनुभवाचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वत: लेखनरुपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय''.[6]

डॉ. वसंत बोरगांवकर यांच्यामते, '' स्वत:च लिहिलेली स्वत:च्या जीवनाची कहाणी''.[7]

पाश्चात्यांच्या मते, "Autobiography is the history of life] character and work of a peson written by himself - Chartes Duffy.

(व्यक्तीच्या जीवनाचा, व्यक्तित्त्वाचा त्याने स्वत:च लिहिलेला इतिहास म्हणजे आत्मचरित्र)

**आत्मचरित्र वाङ्मय प्रकाराचे स्वरुप व वैशिष्ट्ये :–**

पाश्चात्य आत्मचरित्रात व भारतीय आत्मचरित्रात बराच फरक दिसून येतो. पाश्चात्य आत्मचरित्रे व्यक्तीकेंद्रीत आहेत.व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाचा शोध घेत असतांनाच स्वत:च्या चुका, दोष, अपराध, गुन्हा यांचेही विवेचन स्पष्टवक्तेपणाने केलेले दिसते. त्यातून आपल्या चुकांचे परिमार्जन करावे असे त्यांना वाटते. याउलट स्वत:पेक्षा आपल्या कामाला, समाजाला, घराला, ध्येयाला महत्त्व दिलेले आपल्याकडील आत्मचरित्रात दिसून येते. खाजगी गुणदोषांपेक्षा केलेल्या कार्याचे मोल अधिक मानले जाते. अशा आत्मचरित्रातून त्या विशिष्ट काळात समाजाचा सांस्कृतिक घडामोडीचा, एखाद्या गोष्टीचा समाजमनावर कसा परिणाम होऊ शकतो यांची माहिती मिळते. काही आत्मचरित्रे आत्मगौरवार्थ लिहीत असताना चुकीचे वर्तन घडले असेल तरीही ते कसे बरोबर आहे हे सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. बऱ्याचदा आत्मचरित्रात जन्मापासून आजतागायत इतिहास असतो. डॉ. आनंद यादव यांनी आत्मचरित्राचे दोन प्रकार सांगितले आहेत.

१) सार्वजनिक क्षेत्रात कार्य करणारे

ISSN : 2348-7143
Vol. 4, Issue 3

२) खाजगीरित्या वैयक्तिक जीवन जगणारे

विल्यम सि. स्पेजमन यांनी आपल्या "The forms of Autobiography" या ग्रंथात आत्मचरित्राचे १) तत्त्वज्ञानात्मक २) इतिहासात्मक व ३) साहित्यरुपात्मक असे तीन प्रकार मानले आहेत. इतिहासात्मक आत्मचरित्रात घडून गेलेली परिस्थिती असते. त्यातील चैतन्य हरवलेले असते. तसेच प्रत्यक्ष जीवन भोगलेली व सांगणारी व्यक्ती एकच असते. त्यामुळे वाचक त्याची मनातल्या मनात चिकित्सा करत असतो. त्यामुळे त्यात तटस्थता येऊ शकत नाही. याउलट साहित्यरुपात्मक आत्मचरित्रात तटस्थता असते. मानस शास्त्रीयदृष्ट्या लेखक स्वपासून अलग होऊन तटस्थपणे पाहू शकतो. तसेच साक्षात अनुभव होऊ शकतो. त्यामुळे साहित्यरुपात्मक आत्मचरित्रातील नायकाबरोबर आपल्यालाही सहप्रवास करता येतो. या आत्मचरित्रात काळाचे परिणाम व्यक्तीवर कोणत्या स्वरुपात झाले त्याचा प्रत्यय येतो. त्यामुळे विशिष्ट कालगत समाज स्थितीचा व व्यक्तीचाही इतिहास प्रत्ययाला येतो.

आनंद यादव याच्या मते, ''हे प्रकार १९७० च्या आसपास विशेष रुढ झालेले दिसतात. यावरुन आत्मचरित्राच्या वर्गीकरणाची व प्रकाराची थोडक्यात कल्पना येते''.

जिज्ञासा हा माणसाचा जन्मजात स्वभावगुण आहे. दुसऱ्याचे जीवन जाणून घेण्याची उत्सुकता आणि व्यक्तीचे जीवनदर्शन घडविणे हे आत्मचरित्राचे प्रमुख उद्दिष्ट असते. त्यामुळे जिज्ञासातृप्तीचे समाधान या वाङ्मय प्रकाराकडून पुरेपूर मिळू शकते. आणि या कारणाने मानवी मने आत्मचरित्राकडे आपोआप आकर्षिली जातात. कादंबरीप्रमाणे त्यात कल्पनाशक्तीची जरुरी नसते. उत्तम कलाकृती निर्माण करण्यास लागणारी समरसता इतर वाङ्मय प्रकारापेक्षा आत्मचरित्राच्या बाबतीत अधिक शक्य आहे. माणूस स्वतःविषयी स्वतःच अधिक खरे सांगू शकतो "Every man & life may be best written by himself". हे जॉन्सनचे उद्गार लक्षात घेण्यासारखे आहे.

आत्मचरित्र लेखन करताना बऱ्याच अडचणी निर्माण होतात. यासंबधी डॉ. विमल भालेराव यांनी विस्तृत अशी चर्चा केली आहे. त्यांच्यामते 'सत्यकथन', 'तटस्थवृत्ती', 'स्व' ला केंद्रस्थान' घटनांची योग्य निवड आणि 'कुशल मांडणी', 'वस्तुस्थितीदर्शक निवेदन' ही आत्मचरित्राची आवश्यक अंगे सांभाळताना काही अडचणी निर्माण होतात.

'सत्यकथन' ही आत्मचरित्राची सर्वात मोठी कसोटी आहे. त्याला तीन बाजु सांगितलेल्या आहेत. स्वतःला दिसणारे सत्य, प्रतिपक्षाला दिसणारे सत्य आणि प्रत्यक्षात असणारे सत्य यातील कोणते सत्य स्विकारायचे हा प्रश्न निर्माण होतो. सत्य बोलणे एखाद वेळी सोपे जाईल पण सत्य लिहिताना अनेक अडचणी निर्माण होतात. अनेक आठवणी जशाच्या तशा आठवतीलच असे नाही. जे सांगायचे आहे ते जसे घडले तसे प्रांजळपणे, प्रामाणिकपणे सांगितले म्हणजे सत्याच्या बाबतीत साशंकता निर्माण होणार नाही. स्वतःच्या गुणांबरोबरच दोषांचेही चित्रण असते तेव्हा त्याच्या सत्यतेला शाबासकी दिली जाते.

आपले जीवन तटस्थवृत्तीने पाहिले तरच ते आत्मचरित्र आत्मसमर्थन या दोषापासून वेगळे राहते. आपण कसे आहोत यापेक्षा लोकांना आपण कसे दिसावे याची धडपड केल्यामुळे आत्मचरित्रात तटस्थता पाळणे कठीण होते.आत्मचरित्राचे सौंदर्य 'स्व' च्या प्रकटीकरणात असते. इतर पात्रांची कधी गर्दी होते तर कधी योग्य न्याय मिळत नाही. 'स्व' कडे ही पुरसे लक्ष दिले जात नाही यामुळे कुठलीच प्रतिमा स्पष्ट होत नाही.आत्मचरित्राकाराला आत्मचरित्र कुठूनही सुरु करुन कुठेही संपविता येते. आत्मचरित्र कोणत्या गोष्टी घ्याव्या व कोणत्या घेऊ नये हे ठरवावे लागते. घटनांची निवड झाल्यावर त्यांची मांडणी कुशलतेने करणे आवश्यक असते.

आत्मचरित्र वस्तुस्थितीदर्शक व्हायला पाहिजे असे म्हटले जाते. आयुष्यातील संस्मरणीय घडामोडींचा काळ मोडला तर कल्पनासृष्टीतले क्षण अधिक सुखद व आनंददायक असतात. त्यामुळे या चित्रणाला प्राधान्य मिळून

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal- Sr. No. 40705 & 44117 July-Aug.-Sept. 2017 | Vol. 4, Issue 3

आत्मचरित्र वस्तुस्थितीदर्शक होत नाही.

जान्हवी संत यांच्यामते, ''आत्मचरित्रकाराच्या अंगी शालीनता, दुसऱ्याबद्दलची आपुलकी, समयसूचकता, हृदयंगम व सरस भाषाशैली हे गुण आवश्यक आहेत'' [९]

असा हा हृदयस्पर्शी वाङ्मय प्रकार मराठी साहित्यात इंग्रजी वाङ्मयाशी संबंध आल्यावर आपल्याकडे खऱ्या अर्थाने रुढ झाला. १८७०–७१ खऱ्या अर्थाने बहरला. पुढे त्याची वेल विस्तारत गेली आणि जीवनातील विविध क्षेत्रे व्यापक पद्धतीने मांडण्याचे काम या वाङ्मयप्रकाराने केले. सामाजिक, राजकीय, प्रसारमाध्यमे या क्षेत्रातील अनुभवही या वाङ्मयप्रकाराने तटस्थपणे व स्वअनुभवाने मांडताना तेवढयाच ताकदीने मांडले. आज कितीतरी आत्मचरित्र असे आहे की, मराठी साहित्यात त्यांचे नांव अजरामर झालेले आहे. रमाबाई रानडे यांचे 'आमची अकरा वर्षं', लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतीचित्रे', वि.द घाटे यांचे 'दिवस असे होते', हंसा वाडकर यांचे 'सांगते ऐका', कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट', दया पवार यांचे 'बलुत', लक्ष्मण माने यांचे 'उपरा', गोदावरी परुळेकर यांचे 'जेव्हा माणूस जागा होतो', सुनिता देशपांडे यांचे 'आहे मनोहर तरी', माधवी देसाई यांचे 'नाच ग घुमा', मल्लिका अमरशेख यांचे 'मला उद्ध्वस्थ व्हायचंय', उर्मिला पवार यांचे 'आयदान', सिंधुताई सपकाळ यांचे 'मी वनवासी' इ.अशा अनेक आत्मचरित्रांनी मराठी साहित्याला समृध्द केले आहे. . आपल्या हृदयातील भावभावनांना वाट मोकळी करुन देणारा हा वाङ्मयप्रकार आज मराठी साहित्यात खऱ्या अर्थाने मानाचे स्थान मिळवून कथा, कादंबरी, कविता या वाङ्मय प्रकारासोबत आपली मुद्राही कोरताना दिसत आहे.

संदर्भ ग्रंथ :–

१. यादव आनंद – आत्मचरित्र ''मीमांसा'', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, फेब्रुवारी ९८ – पृ. ८
२. तत्रैव – पृ. २१
३. जोग रा. श्री. – 'मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग २, पुणे, ६३ – पृ. ११
४. डॉ. भालेराव विमल – 'आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अभ्यास' (१९१०–१९७५) नागपूर, १९८५ – पृ. १६
५. डॉ. कऱ्हाडे स.दा. – 'चरित्र आत्मचरित्र', मुबंई – १९७६ पृ. १०९
६. डॉ. जाधव रा. ग. – 'मराठी विश्वकोश' खंड २ रा
७. डॉ. वोरगावकर वसंत – 'प्राचीन मराठी वाङ्मयातील चरित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक लेखनाचा समीक्षणात्मक अभ्यास' अप्रकाशित प्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद पृ. १२३
८. यादव आनंद – आत्मचरित्र ''मीमांसा'', नागपूर १९८५ – पृ. १६
९. संत जान्हवी – 'चरित्र आत्मचरित्र', कोल्हापूर का.ना. – पृ. ४५

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-November-December-2018

Vol. 5 Issue 4

Chief Editor :
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

RESEARCHJOURNEY

## Editorial Board

**Chief Editor -**

**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh Kingdom of Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur [M.S.] India
- **Dr. G. S. Wankhede** - Baliram Patil Arts, Commerce & Science College, Kinwat-Nanded
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prin. Dr. B. V. Game** - MGV's Arts and Commerce College, Yeola-Nashik [M.S.] India
- **Dr. Sharad Birhade** - D. N. College, Faizpur.
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.
- **Prof. V. S. Bhalerao** - J. N. V. Kangda, [H.P.] India.

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Professor & Head. Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. D. A. Suryawanshi** - Principal, R. C. Patel College of Education, Shirpur, **Dhule.**
- **Dr. Sandip D. Mundhe** - Head, Lib. Science, Sambhajirao Kendre College, **Jalkot, Latur**
- **Dr.Y. H. Saner** - Principal, Abhay College of Education, **Dhule**
- **Dr. D. D. Patil** - Principal, Arts, Science and Commerce College, Chopda, **Jalgaon**

**Review Committee -**

- **Dr. Leena Pandhare** - HoD. of English, MGV's Arts and Commerce College, Yeola-Nashik [M.S.] India
- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. S. T. Khairnar,** - Member, BoS, Commerce (SPPU), L.V.H. College, Panchavati.

**Publisher:**

- **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, (Yeola) Nashik**
Email : swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

| | | | |
|---|---|---|---|
| 61 | आचार्य सत्यनारायण गोयंका के साहित्य में प्रतिबींम्बित भगवान बुद्ध का नारी विषयक दृष्टीकोन | अंजना सोनवणे | 268 |
| 62 | गाव्री तालुक्यात विविध- सण उत्सवावेळी सादर केले जाणारे अभिनयगणप्त्र लोकनाट्य:लळीत | डॉ. प्रकाश साळुंखे | 275 |
| 63 | कौटिलीय अर्थशास्त्र : पीक नियोजन व जल व्यवस्थापन | शिरीष अमृतकर | 279 |
| 64 | रेशीम उद्योगातून मिळणारे उत्पन्न आणि रोजगार | डॉ. शशांक पोळ व भाऊसाहेब दरेकर | 284 |
| 65 | कालिदासाच्या साहित्यातील मानवी सूक्ष्म भाव भावनांचे दर्शन | प्रा.श्रीमती बकुल कांबळे | 289 |
| 66 | भारतातील कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा आढावा | डॉ. कल्याण मोरे व प्रा.अरविंद पाटील | 299 |
| 67 | कृषी साहित्यातील समस्या | शिरीष अमृतकर | 303 |
| 68 | यावल तालुक्यातील उच्च माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक कार्यसमाधनाचा अभ्यास | डॉ.प्रतिभा सूर्यवंशी | 310 |
| 69 | पांडुरंग नथुजी राजभोज व मंदिर सत्याग्रह चळवळ विशेष अभ्यास : पर्वती मंदिर सत्याग्रह | डॉ.राजकुमार सुरवसे | 314 |
| 70 | प्रिया तेंडूलकर यांच्या कथेतील स्त्रीवादी विचारसरणी | डॉ.वैशाली झोडे | 317 |
| 71 | १९९० नंतरचे ग्रामीण जीवनाचे प्रश्न आणि सदानंद देशमुख यांचे कादंबरी लेखन | डॉ.माणिक बागले | 319 |
| 72 | प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भौगोलिक संकल्पनांच्या आकलनासाठी बुद्धीमंथन तंत्राच्या परिणामकारकतेचा अभ्यास | डॉ.वंदना चौधरी | 323 |
| 73 | लोकसाहित्यातील ओवीतून कुटुंब चित्रण | डॉ. स्वाती वाकोडे | 327 |
| 74 | भगवान बुद्धाचे वास्तववादी अर्थशास्त्र | डॉ.मनोजकुमार भोवते | 332 |
| 75 | शेतकरी वेदनेची गाथा:बारोमास | डॉ. मधुकर वैकरे | 335 |
| 76 | प्रा.मधू जामकरांच्या ललित लेखनातून काव्यात्मकता | डॉ.आर.बी.धायगुडे | 340 |
| 77 | गोविंदाग्रज ह्यांच्या गुढगुंजनात्मक कविता एक चिंतन | प्रा.अमृता डोरलीकर | 343 |
| 78 | भटक्यांच्या स्वकथनातून व्यक्त होणारा परिवर्तनाचा वेध | डॉ.ईश्वर सोमनाथे | 348 |
| 79 | मध्ययुगीन महाराष्ट्रातील संतमहिलांची वाटचाल एक विश्लेषण | स्वाती बदामे व डॉ.शिवाजी पवार | 351 |
| 80 | श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललीत लेखनातील प्रादेशिकता व निसर्गचिंतन | डॉ.राजाभाऊ धायगुडे | 355 |
| 81 | चंद्रकांत महामिने यांच्या विनोदी कथा संग्रहाचा अभ्यास | प्रा. मनीषा गुंडगळ (चव्हाण) | 359 |
| 82 | झाडीमंडळाचे साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक वाङ्मयीन चळवळीचे योगदान | डॉ.धनराज ल. खानोरकर | 365 |
| 83 | विनोबांचे राजकीय वर्गीकरण व लोकशाही विषयक विचार | डॉ. दीपक लोणकर | 370 |
| 84 | गुंतवळ | डॉ. अंजली मुकुंद पांडे | 374 |
| 85 | अमरावती विभागातील आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या सर्जनशीलतेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर होणारा परिणाम – एक अभ्यास | विठ्ठल होनाळे, डॉ. मोहन खताळ | 377 |
| 86 | ग्रामीण साहित्य प्रेरणा | डॉ.गोवर्धन मुळक | 381 |
| 87 | वारी : ऐक्य जीवा-शिवाचे | डॉ. संतोष देशमुख | 386 |
| 88 | लोकसंस्कृतीचा प्रतिनिधी – वासुदेव व त्याची लोककथागीते | डॉ. रामकिशन दहिफळे | 390 |
| 89 | वारकरी संप्रदाय : समाजप्रबोधनाचे माध्यम | डॉ.अशोक लिंबेकर | 394 |
| 90 | पर्यटनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम | प्रा. प्रकाश काळवणे | 397 |
| 91 | स्त्री-भ्रुणहत्या: परिणाम आणि उपाय | डॉ.साईनाथ बनसोडे | 400 |

# गोविंदाग्रज ह्यांच्या गुढगुंजनात्मक कविता एक चिंतन

प्रा.अमृता डोरलीकर
डॉ.मधुकरराव वासनिक
पी.डब्ल्यू.एस महाविद्यालय, नागपूर
मों रू ९३२६२३४२८२
cmpamruta123@rediffmail.com

१८ व्या शतकापासून पाश्चात्यांच्या अनुकरणाने भारतीयांच्या संपूर्ण जीवनशैलीतच आमुलाग्र बदल झाले. धर्मश्रद्धा, संस्कृती, समाजकारण शिक्षणपद्धती, स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन इ.या सारख्या जीवनाच्या सर्व आंगोपांगामध्ये परिवर्तन सुरु झाले. महाराष्ट्राचाच विचार करायचा झाल्यास महाराष्ट्रात अवतरलेल्या नवयुगाने रुढी, परंपरा, यात रुतलेल्या समाजाला बाहेर पडण्याचा मार्ग दाखवला. या नव्या सामाजिक वास्तवाशी सुसंगत अशा नव्या संकल्पना मराठी साहित्यात येऊ लागल्या. वैचारिक बंडखोरी हा या काळाचा महत्त्वाचा विशेष म्हणता येईल. जुन्याचा निषेध आणि नवनिर्मितीचा पुरस्कार हे ध्येय नवसाहित्याने स्वीकारले होते. केशवसुत काव्यप्रांतात या प्रवृत्तीचे प्रतिनिधी ठरले. आत्मोल्लेख, निसर्गप्रेम ,आत्मप्रतीति, हे नव काव्याचे विशेष ठरले. आत्मानुभुतीच्या अभिव्यक्तीला प्रारंभ झाला. इंग्रजी साहित्यातील ''रोमॅटिसिझम'' हा नवसाहित्य संप्रदाय लोकप्रिय होऊ लागला. शेली, किट्स, बायरन, वर्डस्वर्थ यांनी प्रस्थापित केलेले संकेत मराठी काव्यात आले. स्त्री-पुरुष प्रेम, त्यांचा विरह, निसर्ग प्रेम, अप्राप्त कल्पनेची ओढ, अनाकलनीय नैराश हे रोमॅटिसिझमचे सर्व विशेष आपल्याकडे आले. केशवसुत, टिळक, बालकवी, बी, रेंदाळकर, गोविंदाग्रज या कवींनी आपल्या काव्यात आत्मानुभूती व्यक्त केली. केशवसुतांनी निर्माण केलेल्या संकेतांना आत्मगत भावनांच्या उत्कटतेची जोड मिळून गडकऱ्यांची कविता निर्माण झाली.

राम गणेश गडकरी यांनी 'गोविंदाग्रज' या टोपण नावाने काव्यलेखन आणि 'बाळकराम' या नावाने विनोदी साहित्य लिहले. गोविंदाग्रजांना ''केशवसुतांचा सच्चा चेला'' आणि ''प्रेमाचे शाहिर''या उपमा दिल्या गेल्या. .त्यांच्या साहित्यापैकी ''वाग्वैजयंती'' ''पिंपळपान'' इत्यादी कविता संग्रह प्रसिद्ध आहे. या कविता संग्रहात प्रेमकविता, सामाजिक आणि गुढगुंजनात्मक कविता इ. विविध विषयावर काव्यलेखन करताना त्यांच्या विभिन्न प्रवृत्ती दिसून येतात. त्यांनी आपल्या प्रतिभेला अनेक पैलू तर पाडून घेतलेच पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणातून अनेक भावप्रवृत्ती जन्माला आलेल्या होत्या याची साक्ष त्यांच्या गुढगुंजन कवितावरुन दिसून येते. अशा त्यांच्या गुढगुंजनात्मक एकुण दहा ते बारा कविता आहेत.

## गुढगुंजन म्हणजे काय ?

इंग्रजी काव्यप्रकार ''रिफ्लेक्टीव्ह लिरिक'' या संज्ञेचे मराठी रूपांतर म्हणजे गुढगुंजन कविता होय''केशवसुत पाच चिंतनिका'' या ग्रंथात प्रा. भ. श्री. पंडीत यांनी गुढगुंजनाला 'चिंतनिका' असे म्हणून तो ''एक भावगीतसदृश्य प्रकार आहे''[1] असे म्हटले आहे. 'गोविंदाग्रज' या ग्रंथात श्री रा.ग. हर्षे म्हणतात '''गुढगुंजन म्हणजे शाब्दिक ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावर जी एक विदेही स्थिती प्राप्त होत आपल्या अवलोकनात येतात ते उद्गार आणि आजचे गुढगुंजन यात स्वरुपतः जरी साम्य असले तरी एकाची ती अनुभूती असते तर दुसऱ्याची पोपटपंची असते. प्रासादिक संतकवींचा हा वरिष्ठ प्रकारचा गुढवाद आपणांस उपनिषदांपासून तर थेट तुकारामांपर्यंत पाहवयास मिळतो''[2]

"आत्मप्रतीतिपर अथवा गुढगुंजनात्मक काव्य हे ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंत संताच्या काव्यातून याची प्रचिती येते.बुध्दीच्या सहाय्याने विश्वातील अनाकलनीय घटना समजून घेण्याचा प्रयत्न जेथे कमी पडतो तेथे संत आत्मसाक्षात्काराचा आश्रय घेतांना दिसतात. आत्मसाक्षात्काराची भाषा व त्यामधील कल्पना ही गुढ असते. आधुनिक कवींनी परमेश्वरविषयक आत्मसाक्षात्कार अनुभवला नसला तरी विश्वातील इतर काही घटनांची अनाकलनीयता त्यांच्या मनाला, बुध्दीला सारखी अस्वस्थ करते.त्यावेळेची त्याकवींची जी मनःस्थिती असते. त्यामनोवृत्तीतून जे काव्य स्फुरते ते प्रतीतिधर्मीय अथवा गुढगुंजनपर काव्य होय."[3] कारण हे काव्य आत्मानुभूतीवर अधिष्ठित असलेले जिज्ञासेच्या सहजप्रवृत्तीने स्वतःचे ज्ञान, भावनात्मक अनुभव व मनोरचना यांना अनुसरून मनुष्य जगतातील अनाकलनीय घटनांबद्दल आपल्या मनात श्रध्दा असते. "गुढगुंजनपर काव्याचा उगम या विशिष्ट श्रध्देत असतो." असे वा .ना. देशपांडे म्हणतात. कवी अनिलांनीही "प्रतीतिधर्मीय काव्य" असाच शब्दप्रयोग केलेला दिसून येतो. प्रा.जोगांच्या मते "जीव जगत् ईश्वर यांचा विचार न करताही गुढगुंजन होऊ शकते. प्रेमासारख्या अबुध्दिगम्य अनुभूतीतुन गुढगुंजन होऊ शकते"[4]. गोविंदग्रजाच्या काव्यात आत्मानुभुतीपेक्षा प्रखर बुद्धिमत्तेचाच प्रभाव अधिक दिसून येत असल्यामुळे त्यांच्या काव्याला" आत्मप्रतीतिपर" या नावापेक्षा "गुढगुंजन" हे अधिक योग्य वाटते असे स.रा. गाडगीळ म्हणतात. तत्वज्ञान व अध्यात्म हे गुढगुंजन या काव्यप्रकाराचे मुख्यविषय मानले आहेत. चिंतनशील कवीचे मन सामान्यजनांच्या मनापेक्षा विशेष, तीव्र, संवेदनशील आणि भेदक असते. त्यांच्या मनाला अतर्क्य ज्ञानसुध्दा सहजगम्य असते. या मनोमार्गाने आलेल्या अनुभूतीस रसिक 'गुढ' किंवा 'रहस्य' असे नाव देत असतो. यातून अनुभूती अभिव्यक्त झालेली असते.तिला छायावादी कविता, रहस्यवादी कविता, शून्य संशोधनात्मक कविता, सायुज्यवादी कविता, आध्यात्मवादी कविता, गुढवादी इ. विशेषणे मिळाली आहेत.गोविंदाग्रजांनी ज्या मोजक्या गुढगुंजनावर कविता लिहिल्या त्यात 'फुटकी तपेली', 'घुबडास','कलगीचे गाणे','राजहंस','मुरली',इं कविता विशेष होत.

**गोविंदाग्रजांच्या गुढगुंजनपर कवितांची वैशिष्टे**

"गोविंदाग्रजांच्या मनोवृत्तीमध्ये अनेक कारणामुळे एकातांची भयानतेची, अंधकाराची जी आसक्ती निर्माण झाली होती तिचे पडसाद 'घुबडास' या काव्यात उमटले आहेत टराविकाने भरलेल्या जगाचा त्याग करुन कवी स्मशाचातील घुबडाचा जलसा ऐकण्यासाठी आतूर झाला आहे पोपट, मैना यांच्या पोकळ बडबडीचा त्यांना वीट आला आहे.

मनात माझ्या जी हुरहुर। जनांत कठित तीचा सूर।
साथ मला कर, जरि तूं दूर। बेसूराने, भेसूराने झोप जगाची भंगू।
काळोखची प्रभा दाटली। भयानकाची सभा थाटली।
चिरंतनाचे प्रेतचि नाचे। लागे विश्व दुभंगू।[5]

काळोखाला मुर्त बनविण्यासाठी काळोखाची प्रभा असा शब्दप्रयोग कवीने केला. 'घुबडास' मधील कल्पनाविलास हा नुसता चमकृती निर्मितीसाठी आलेला नसून कवीच्या अंतरंगातचे दर्शन घडवून आणण्याचे ते प्रमुख साधन असल्याचे कल्पनाविलास हा त्या काव्याचा दोष नसून गुणच झाला आहे".असे स.रा. गाडगीळ म्हणतात.

गडकऱ्यांच्या गुढगुंजनपर कवितांमध्ये सर्वोकृष्ट अशी 'मुरली' ही कविता आहे. 'प्रिती' आणि 'भक्ती' हा या काव्याचा विषय आहे. प्रेमाला त्यांनी भक्तीचे गूढ आवरण घातले आहे. प्रणयरसाने धुंद होऊन उन्मनी अवस्थेत गेलेल्या प्रेमिकाचे मीलनासाठी चाललेले ते उत्कट आक्रंदन आहे.राधा म्हणजे भक्त आणि मुरली म्हणजे परमेश्वरी कृपेचे प्रत्युत्तर ही या भूमिकेमागे कवीची आत्मानुभूती असल्याने या कवितेत त्यांनी आपल्या

अंतःकरणाचा सारा जिव्हाळा ओतला आहे. भावनोत्कटता, कल्पनेची स्वैरता, उत्कट मनःस्थिती, नादमधूर चाल यासर्व काव्यगुणांचा समन्वय होऊन वाचकाचीवृत्ती तल्लीन होते. तत्त्वज्ञानाची जोड दिल्याने त्याचा अर्थ गूढ झाला आहे. राधिकेला कृष्णाच्या मुरलीचा रव परिचित आहे त्यामुळे तिला मुरलीचा ध्यास लागला आहे. ही तिची मानसिक तन्मयावस्था आहे. ही कविता प्रितीची किंवा भक्तीची शेवटची पायरी म्हणजे आत्यंतिक तादात्म -स्वत्वाची पुर्ण विस्मृती याच कल्पनाचा आविष्कार करण्यासाठी गडकऱ्यांनी 'मुरली' ही कविता लिहिली आहे.

'श्वासे मज हृदयी भरवी । नादे की ओढुनि घेई।
चुबंनेच की मज बनवी । तव ओठावरली लाली।।
दृठ आलिंबन दे अथवा। अवकाश न त्यांत असावा ।
एकरुप जीवा भावा । तव देहि दे मम जिरवी।।
एकरुप राधा कृष्ण। जयनाद गात ही मुरली । कन्हया''[६]।।

राधाकृष्णाचे मीलन झाले. सर्वत्र शांत झाले. राधिकेची बावरी उत्कट अवस्था संपली कारण ती सन्निध्यावस्थेतून सरुपतेत गेली आहे. काव्यात भक्तीरसापेक्षा शृंगाररसाला प्राधान्य आहे. गडकऱ्यांच्या स्वैरकल्पनाशक्तीचा भावनोत्कटतेचा नादलुब्धतेचा येथे संगम झाला आहे. आणि या संगमामध्ये आत्मानुभूतीला अवीट गोडी प्राप्त झाली आहे.

गोविंदग्रजांची आणखी एक सर्वश्रेष्ट कविता म्हणजे 'राजहंस' या कवितेत पतीनिधनाच्या दारुण प्रसंगाने आधीच जिच्यावर दैवाचा क्रुर घाला पडला आहे अशा एका विधवा स्त्रीचा एकुलता एक पुत्र काळाने हिरावून नेल्याने तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पुत्र निधनाच्या शोकाने भ्रमिष्ट झालेली स्त्री आपला पुत्र झोपी गेलेला आहे अशा समजुतीने बोलत आहे. अशी या कवितेची बैठक आहे. त्याविधवा स्त्रीच्या कारुण्यमय जीवनाच्या पार्श्वभूमीवर कवीने तिच्या भ्रममूलक मनःस्थितीचे चित्र रंगविले आहे. तिच्या बालकाच्या मृत्यूची वास्तव कल्पना ज्यांना आहे अशा सभोवतालच्या व्यक्तींची तिने केलेली निर्भर्त्सना हा काव्याचा मुख्य विषय या काव्यातुन स्पष्ट होतो.

''तो हिराच तेव्हा तेव्हा नेला
हिरकणीस आता टपलां..................
मी मुका असा घेतांना
हा पहा पुन्हा हसलाना
का अशा फिरविता माना
सुखे खुपे काय डोक्याला''[७]

अगदी असहाय असा प्रसंग आहे . याठिकाणी तिच्या भ्रमाची आणि निर्भर्त्सनेची परमावधी झाली आहे. आणि त्यामुळे कारुण्याचाही पसमोत्कर्ष या काव्यात झाला आहे.

''मृगजळ प्याया आत उतरलो
अफाट तरि मी त्यातच बुडतो,
नसत्यामाजी असता विरतो ! नको
मला ही असली मेली
''नको तपेली फुटकी असली !
जीव बोलतो पाणी पाणी
''चिरकालाची तहान लागुनि''[८]

कशावरही कविता करता येते असे एका वादविवादात गडकऱ्यांनी विधान केले आणि ते सिध्द करण्यासाठी समोरच पडलेल्या फुटक्या तपेलीवर काव्य लिहिले अशी माहिती डॉ. हर्षे यांनी दिली आहे. आत्मा - परमात्याची

ब्रह्मायेची भाषा बोलणारी अशी गोविंदग्रज यांची 'फुटकी-तपेली' ही कविता आहे.'' आपल्या डोळयांना जे जग दिसते आहे तो परमेश्वराने निर्माण केलेला एक आभास आहे.त्यालाच माया म्हणतात.ते आवरण दुर केल्या वाचून जीवात्माचे दर्शन होणार नाही.परमात्म्याची भेट होणे त्यालाच मोक्षप्राप्ती म्हणतात. म्हणून या प्रवासात मला ही मायेची फुटली तपेली नको कारण ती जो पर्यंत आत्मज्ञानाचे पाणी मला प्यायला मिळण्याची आशा नको असे कवीने तळमळून या काव्यात सांगीतले आहे.'' त्यांच्या बुध्दीवैभवाचे दर्शन या काव्यातून घडते. ही त्यांची एक आत्मप्रतीतिपर गुढगुंजनात्मक कविता आहे.

मराठी काव्य प्रांतात गोविंदाग्रजांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे .प्रतिभा संपन्न कवी म्हणून भावोत्कटता, नेत्रदीपक कल्पकता, भाषेचा झगमगाट, गुढगुंजन, मनोहर वर्णनशैली याविविध विशेषांनी त्यांचे काव्य मराठी भाषेत अमर झाले आहे. 'मुरली', 'राजहंस', 'प्रेम आणि मरण', 'अवेळी ओरडणाऱ्या कोकीळेस' 'प्रेमपाठ', आणि 'गुलाबी कोडे', 'फुटकी तपेली', 'घुबडास' या काही निवडक गुढगुंजनपर कवितेत रसोत्कटता हा त्यांचा प्रकृती विशेष जाणवतो. अंतःकरणाची उत्कटता, आत्मानुभूतीचा जिव्हाळा हे काव्याचे विशेष त्यांचा काव्यामध्ये व्यक्त झालेले दिसतात. त्यांच्या गुढगुंजनकाव्यातील भावसौंदर्य आणि कल्पनाविलास, भावनांची उदात्तता आणि कल्पनांची रमणीयताही त्यांच्या काव्यात प्रभावीपणे प्रकट झालेली दिसुन येते.

कवीला वास्तवात जे भावडे कल्पनेत सुचले त्यात काही गुढार्थ सापडला की त्याला ते लौकिक भाषेत मुर्त करण्याचा प्रयत्न करतात .परंतु त्यात ते नेहमी यशस्वी होतातच असे नाही. त्यामुळे गोविंदाग्रज यांच्या या गुढगुंजनात्मक कवितेतुन पुष्कळ ठिकाणी दुर्बोधता, क्लिष्टता आलेली आहे.गडकऱ्यांचे काव्य हे भावनोत्कटतेपेक्षा कल्पनाविलासाने अधिक सजविलेले आहे. असा काही टीकाकारांचा त्यांच्या काव्यावर आक्षेप आहे. त्यांच्या काव्यनाटकामध्ये बुध्दिमत्तेचा कल्पकतेचा गौरव करणारे अनेक उद्‌गार आढळून येतात भव्य आणि नेत्रदीपक कल्पनांच्या भोवऱ्यात सापडल्याने बऱ्याच ठिकाणी कोमल भावना दडपून जाण्याची वेळ येते. त्यांच्या अनेक काव्यांचा उगम कल्पनेच्या विलासात आहे त्यांच्या कल्पनाविलासाच्या मुळाशी भावनोत्कट आणि हळवी मनोवृत्ती आहे असे दिसते. गडकऱ्यांच्या काव्यात पाल्हाळपणा, भडकपणा हे दोष आढळून येतात. अर्थात हे दोष मान्य करुनही गोविंदग्रजांचे मोठेपणा वादातील आहे हे अगदी स्पष्ट आहे.

**निष्कर्ष :-**

१. गोविंदग्रजांच्या गुढगुंजनात अवाजवी शब्दांची कसरत केलेली दिसते त्यांनी आपल्याकाव्यातून अर्थचमत्कृती साधण्याचा प्रयत्न केला आहे. अचाट बुद्रिमता व विशाल भौतिक साधनांची विफलताही आढळते त्यांच्याकाव्यातून कल्पकताही आढळते.
२. गोविंदग्रजांच्या गुढगुंजन काव्यातुन आध्यात्म आणि ऐहिक जीवनाची सांगड घालण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.
३. महाकाव्यात जशी उपरुपके असतात तशी उपरुपके गोविंदग्रजांच्या कवितेमध्ये आढळतात.
४. नादमाधुर्य व अर्थगौरव हे त्यांचे काव्यगुण या गुढगुंजन काव्यातही प्रकर्षाने दिसून येतात. काही ठिकाणी दुर्बोधता व प्रदीर्घता आढळून येते.
५. अतिशयोक्ती, अन्योक्ती बरोबरच वाच्यार्थ व व्यंगार्थही काही ठिकाणी आढळतो.
६. गोविंदग्रजांच्या गुढगुंजनपर काव्यात नैराश्याची दाट छाया आढळून येते.
७. गडकऱ्यांच्या मनोरचनेचा महत्त्वाचा विशेष म्हणजे अप्राप्य वस्तूचा ध्यास घेऊन तिच्या प्राप्तीसाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी करणे हा होय.

८. मानवी जीवनातील प्रणयाचा पाया जरी शारीरिक आकर्षण हा असला तरी त्यांचाही शेवट आत्म्याच्या आत्यंतिक एकात्मतेत होण्यातच त्याप्रेमाचे अंतिम उदात्त स्वरुप गोविंदग्रजांच्या गुढगुंजन काव्यात व्यक्त होते.
९. प्रेमासारख्या अबुद्धिगम्यच अनुभूतीतून गुढगुंजनपर काव्य निर्माण होऊ शकते. हे गोविंदग्रजांनी दाखवून दिले.
१०. गोविंदग्रजांच्या काव्यात चमत्कृतीच्या खाली भावनात्मक पातळीवर खोल आध्यत्मिक तळमळ राहिलेली दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. डॉ. गाडगीळ, स.रा. 'मराठी काव्याचे मानदंड' - खंड पहिला - पद्मगंधा प्रकाशन पुणे - २००५
२. तत्रैव
३. --''--
४. --''--
५. गोविंदाग्रज, 'पिंपळपान'- कॉन्टिनेन्टल प्रकाशन, . तृतीयावृत्ती २०१३ पान नं.१२८
६. तत्रैव-
७. तत्रैव-
८. तत्रैव-
९. डॉ. गाडगीळ, स.रा. 'मराठी काव्याचे मानदंड' - खंड पहिला - पद्मगंधा प्रकाशन पुणे - २००५
१०. डॉ. काळे अक्षयकुमार - 'गोविंदग्रज समीक्षा' - अमेय प्रकाशन, प्रथमावृत्ती १९८५
११. परांजपे कृ. रा - 'गोविंदाग्रजांची गूढगीते' - आनंद मुद्रणालय, प्रथमावृत्ती १९८८

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATIO

Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

December-2019 Special Issue - 211

## Role & Nature of Media

## प्रसार माध्यमांचे स्वरूप आणि भूमिका




Guest Editor:
Dr. R. G. Tale,
Principal,
Bar. Sheshrao Wankhede College of
Arts & Commerce, Khaperkheda
Dist. Nagpur, Th. Saoner . Maharashtra

Executive Editor of the issue:
Dr. Jyoti Selukar
Dr. Anjali Pande

Chief Editor:
Dr. Dhanraj Dhnagar

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 35 | सामाजमाध्यमांच्या विळख्यातील युवावर्ग | डॉ. प्रीती उमाठे | 149 |
| 36 | भारतामध्ये ई-कॉमर्स प्रणाली प्रवेगीत करण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका | डॉ. दामोधर भेंडे | 153 |
| 37 | प्रसारमाध्यमांचे व्यापारीकरण | डॉ. राजेंद्र कांबळे | 161 |
| 38 | प्रसार - माध्यमांचे व्यावसायीकरण | डॉ. विद्या चन्ने | 163 |
| 39 | प्रसारमाध्यमे आणि साहित्य यांची भूमिका | प्रा. संजय सिंगनजुडे | 167 |
| 40 | प्रसारमाध्यमांचा युवा वर्गावर पडणारा प्रभाव | डॉ. उल्हास राठोड | 173 |
| 41 | प्रसारमाध्यमे आणि पत्रकारितेची सामाजिक भूमिका | प्रा. संगीता उमाळे | 176 |
| 42 | प्रसारमाध्यमांतील अर्थकारण | डॉ. एस. एस. हजारे | 182 |
| 43 | प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया | डॉ. साधना लांजेवार | 186 |
| 44 | प्रसारमाध्यमे : नाटक - चित्रपट - खेळ | डॉ. विजया राऊत | 189 |
| 45 | स्मार्ट फोनचा महाविद्यालयीन मुलींच्या सामाजिक जीवनावर पडणारा परिणाम | डॉ. सुरेश सोमकुंवर | 193 |
| 46 | प्रसारमाध्यमे आणि बदलते ग्रामीण जीवन | प्रा. प्रमोद शेन्डे | 200 |
| 47 | आधुनिक प्रसार माध्यमांचे प्रकार | डॉ. सोपानदेव पिसे | 206 |
| 48 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | प्रा.मोनाली बहादुरे | 211 |
| 49 | प्रसारमाध्यमे आणि समाज | डॉ. स्नेहप्रभा गावंडे | 216 |
| 50 | विवाहसंस्थेवर प्रसार माध्यमांचा प्रभाव | प्रा. राखी तुरस्कर | 218 |
| 51 | प्रसारमाध्यमे आणि समाज | प्रा.संतोष यादव | 221 |
| 52 | प्रसारमाध्यमांच्या दर्पणातील समाज | डॉ. कमलकिशोर इंगोले | 224 |
| 53 | प्रसारमाध्यमे आणि समाज | प्रा.श्रीरंग लभाने | 228 |
| 54 | प्रसारमाध्यमे आणि युवा पिढी | मनीषा सोनटक्के | 233 |
| 55 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | डॉ. मंगला कांबळे- डाहाट | 236 |
| 56 | प्रसारमाध्यमे आणि स्त्रियांची बदलती भूमिका | डॉ. भारती मस्के | 240 |
| 57 | प्रसारमाध्यमे आणि समाज | प्रा. बाळकृष्ण रामटेके | 243 |
| 58 | प्रसारमाध्यमांचे व्यापारीकरण | डॉ. अमिता रघटाटे | 247 |
| 59 | प्रसारमाध्यमे आणि समाज | डॉ. समृद्धी टापरे | 251 |
| 60 | प्रसारमाध्यमांचा आढावा व बदलती जीवनशैली | डॉ. प्रवीण काळे | 255 |
| 61 | प्रसारमाध्यमे आणि समाज | डॉ. अशोक शहाणे | 258 |
| 62 | प्रसारमाध्यमांची आजची स्थिती व व्यावसायिक समाजकार्य | डॉ. चंदु पाटील | 261 |
| 63 | प्रसारमाध्यमांचे व्यापारीकरण | प्रा. पंढरी मोरे, डॉ. डी. डी. सांबारे | 265 |
| 64 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | कविता राजभोग | 269 |
| 65 | प्रसारमाध्यमे आणि समाज | डॉ. अनुराधा खाडे | 275 |
| 66 | मुद्रित प्रसारमाध्यमांमध्ये अग्रलेखाचे महत्त्व | प्रा. अमृता डोरलीकर | 277 |
| 67 | प्रसारमाध्यमांची भूमिका व आजचे सामाजिक वास्तव | डॉ. मनीषा नागपुरे | 284 |
| 68 | प्रसारमाध्यमे आणि स्त्रियांची बदलती भूमिका | डॉ. स्वाती वाकोडे | 289 |
| 69 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | प्रा. रीता वाळके -डंभाळे | 292 |
| 70 | प्रसारमाध्यमे आणि साहित्य | डॉ. साधना जिचकार | 297 |
| 71 | प्रसारमाध्यमे आणि समाजिक परिवर्तन | डॉ. स्वर्णलता वारके | 301 |
| 72 | प्रसारमाध्यमांचे बदलते स्वरूप | प्रा. लीना गादेवार | 305 |
| 73 | समाजमाध्यमे आणि तरुण पिढीतील परिवर्तनाचे अध्ययन | कु.मयुरी ठाकरे | 311 |
| 74 | प्रसार माध्यमे आणि समाज | डॉ.राखी जाधव | 315 |


RESEARCH JOURNEY

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 211 Role & Nature of Media
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
December-2019

# मुद्रित प्रसारमाध्यमामध्ये अग्रलेखाचे महत्त्व

**प्रा. अमृता डोरलीकर**
डॉ. म. वा. पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालय,
नागपूर

प्रास्ताविक :–

वर्तमानपत्रे समाजाचा तिसरा आरसा आहे असे म्हणतात. वर्तमानपत्राने आपले रोजचे जीवन व्यापले आहे. पत्रकारिता लोकशाहीचा एक स्तंभ मानला जातो. लोकमानस घडविण्यात त्याचा महत्त्वाचा सहभाग असतो. लोकशाही शासन व्यवस्था असणाऱ्या देशांमध्ये वृत्तपत्रांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. शिकलेल्या बुद्धीजीवी समाजाची वृत्तपत्रेही आजची एक गरज झाली आहे. 'वृत्तपत्र' ही आजच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे. आकाशवाणी, दुरदर्शन ते इंटरनेटपर्यंत माहिती देणाऱ्या साधनांची वेगाने प्रगती झाली. उपग्रहवाहिन्यांमुळे जगाच्या कानाकोपऱ्यात घडणाऱ्या घटना काही तासात घरबसल्या दिसू लागल्या हे सत्य असले तरी २१ व्या शतकातही वृत्तपत्रांचे स्थान अबाधित आहे.

इ.स. १८०६ मध्ये खिळे जुळवणीच्या प्रारंभिक मुद्रण तंत्रापासून आजच्या संगणकीय मुद्रणतंत्रांपर्यंत आणि छपाईच्या ट्रेडल या यंत्रापासून आधुनिक ऑफसेट यंत्रापर्यंत झालेल्या यांत्रिक प्रगतीमुळे वृत्तपत्राच्या बाह्यंगात जसा बदल झाला तसाच वृत्तपत्राच्या अंतरंगातही बदल झाले. पूर्वी वृत्तपत्रात अग्रभागी असलेल्या अग्रलेखांचे स्थलांतर आतील पानात दोन स्तंभ एवढ्या मर्यादित जागेत झाले. वृत्तपत्रातील अग्रलेख संपादकीय पृष्ठापुरते मर्यादित झाले. वृत्तपत्रातील मुख्यपृष्ठावर प्रसिद्ध होणाऱ्या वार्तांचे विश्लेषण करणारे, पार्श्वभूमी सांगून अन्वयार्थ लावणारे अग्रलेख, लेख असे लेखन या पृष्ठावर प्रसिद्ध होत असल्याने त्याचे संपादकीय पृष्ठ हे नाव सार्थ ठरत आहे.

आज काळाच्या ओघात वृत्तपत्रातील अग्रलेखाचे परिवर्तन होताना दिसते. तरीही अग्रलेखाचे महत्त्व कमी झालेले नाही.

## अग्रलेखाचे स्वरुप आणि त्याचे प्रयोजन पुढीलप्रमाणे सांगता येते :

अग्रलेखामधून केलेले आवाहन हे समाजातील बुद्धीजीवी वर्ग, विचारवंत, राज्यकर्ते, प्रशासन व समाजधुरीण यांच्यासाठी असते. सामान्य वाचकांचे प्रबोधन करणे हा एक महत्त्वाचा उद्देश असतो. अग्रलेखातून एखाद्या घटनेबद्दल भाष्य करताना वाचकांना त्या घटनेचा अन्ययार्थ समजावून सांगितला जातो. कोणत्याही प्रश्नाच्या दोन बाजू मांडून वाचकांना अग्रलेखातून आवाहन केले जाते. व त्याला विचारप्रवृत्त करण्यात येते आणि त्याचे मतही घडविले जाते. वाचकांच्या विचारावर व मतांवर अग्रलेखातून अप्रत्यक्षपणे संस्कार केले जातात. सामान्य वाचक व राज्यकर्ते यांच्या संदर्भात, एखाद्या निर्णयाने समाजमनावर कोणते परिणाम होईल आणि नागरिकांची प्रतिक्रिया काय होऊ शकते याचा अंदाज राज्यकर्तांना अग्रलेखातून येऊ शकतो. अग्रलेख लिहिणारा संपादक हा एक प्रकारे समाजाचे वैचारिक नेतृत्व करीत असतो.

## अग्रलेखाची रचना व भाषा :

अग्रलेख पान दोन किंवा पान चार वर डावीकडील दोन स्तंभात प्रकाशित होतो. अग्रलेखाची जागा मर्यादित म्हणजेच चारशे ते एक हजार शब्दापर्यंत असते. अग्रलेखाचा आकृतीबंध हा जुन्या वैचारिक निबंधाशी नाते सांगतो. अग्रलेखाची भाषा एकाच वेळी भारदस्त व सोपी असावी लागते.

ISSN : 2348-7143
December-2019

अग्रलेखाचे प्रमुख प्रकार :

अग्रलेखाचे प्रामुख्याने दहा प्रकार पडतात. त्यात माहितीपूर्ण, टीकात्मक, आक्रमक, उपहासगर्ग, विनोदी, मृत्यूलेख, धार्मिक प्रशंसात्मक, वैज्ञानिक, पाठपुरावात्मक अग्रलेखाचा समावेश आहे.

इंग्लंड, अमेरिकेतील लंडन टाईम्स, वॉशिंग्टन पोस्ट, न्यूयॉर्क टाईम्स अशा जगमान्य वृत्तपत्रामध्ये आजही अग्रलेखांचे स्थान अढळ आहे. अमेरिकेत दरवर्षी सर्वोत्कृष्ट अग्रलेखासाठी दिला जाणारा पुलित्झर पुरस्कार पाश्चात्य पत्रकारितेतील अग्रलेखाचे महत्त्व सिद्ध करतांना दिसतात.

भारतीय वृत्तपत्र सृष्टीतही 'दर्पण' या नियतकालिकापासून ते आजपर्यंत सर्व वर्तमानपत्रे लेखन प्रकाराशी जुळवून आहेत. मराठी पत्रकारितेत उत्कृष्ट अग्रलेखासाठी आ. अत्रे, डहाणूकर पुरस्कार मराठी वृत्तपत्र सृष्टीत अग्रलेखाचे मानबिंदू मानले जातात. श्री. रा. टिकेकर यांनी 'पृथ्वीतलावर वृत्तपत्रांचे राज्य आहे'[१] असे म्हटले आहे. कारण आज जीवनात वृत्तपत्रे हा अपरिहार्य घटक झालेला आहे.

माहिती, मनोरंजन, मार्गदर्शन आणि सेवा या चार उद्दिष्टांतच वृत्तपत्र वाचले जाते. वाचकांना सभोवतालची माहिती देण्याचे काम वृत्तपत्रातील बातम्या करतात. तर मार्गदर्शकाचे काम वृत्तपत्राचा आत्मा समजल्या जाणाऱ्या अग्रलेखांद्वारे केले जाते. अग्रलेखाला वृत्तपत्र सृष्टीत अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. अग्रलेख माहिती देण्याचे मत प्रतिपादन करण्याचे, प्रबोधन करण्याचे आणि अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करीत असतात. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी पत्रकाराला 'जागल्या' ची म्हणजे रात्रीच्या गस्तवाल्याची उपमा दिली. ही भूमिका अग्रलेखाद्वारे संपादक यथोचितपणे पार पाडताना दिसतात.

अग्रलेख म्हणजे वृत्तपत्रांचा आत्मा होय. अग्रलेख म्हणजे वृत्तपत्रातील विचारधन, ज्ञान व मताचा एक अजोड खजिना ''वृत्तपत्रातील अग्रलेख साहित्यातील काव्यमय पाने बनू शकतात. तसेच दुःखात समाधीवरील अश्रूंचे रुप घेऊन प्रकटू शकतात.''२ असे डॉ. वि. ल. धारूरकर यांनी म्हटले आहे. अग्रलेख हा स्तंभ संपादकाने लिहिलेला असला तरी तो वाचकांच्या सामुदायिक नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करत असतो. संपादक हे आपल्या अग्रलेखाद्वारे केवळ स्वतःचेच मत मांडतात असे नाही तर हजारो वाचकांचे प्रतिनिधित्व संपादक करीत असल्याने अग्रलेखांमध्ये आम्ही असा शब्दप्रयोग ते करतात. विचार विवेक आणि आदर्श अग्रलेखातून प्रकट होत असतात. वाचन, मनन आणि चिंतनातून अग्रलेख साकार होत असतात. डॉ. हरिमोहन यांच्या मते, ''समाचारपत्र पर सम्पादक कि कार्यकुशलता वैचारिकतां आणि कर्तव्य परायणता कि छाप हुआ करती है।''३ संपादकांच्या लेखनीतून प्रकट होणारे विचार हे वाचकांच्या विवेकबुद्धीला नवी चेतावनी देत असतात. अग्रलेखातून घटनांचे पडसाद उमटत असतात. वाचकांवर अग्रलेखांचा प्रभाव पडतो.

अग्रलेखांच्या व्याख्या :

लोकशाहीत वृत्तपत्राचे जसे महत्त्व तसेच वृत्तपत्रात अग्रलेखाला महत्त्व आहे. जी.के.पुरी यांनी जर्नालिझम या आपल्या ग्रंथात वृत्तपत्र आणि त्यातील अग्रलेख यांच्यातील परस्पर संबंधाबाबत आपला अभिप्राय व्यक्त करताना म्हटले आहे, "The best Newspaper is that which has the best editorial. ४

अग्रलेख हे वृत्तपत्राचे हृदय आहे, त्याचा आत्मा आहे. वृत्तपत्र हे चक्र आहे असे मानले तर अग्रलेख त्याचा केंद्रबिंदू. लोकांचा माहिती करुन घेण्याचा हक्क, पारदर्शक मानवी प्रतिष्ठेची जाणीव अग्रलेखातून होत असते. अग्रलेख म्हणजे काय ? पत्रकारितेला पाश्चात्य तसेच पौर्वात्य पत्रतज्ज्ञांनी अग्रलेखाच्या विविध पैलूंना अनुलक्षून ज्या विविध व्याख्या केल्या आहेत त्यावरुन 'अग्रलेख हे वाचकांचे मत बनविण्याचे साधन आहे. वाचकाला आपल्या मताबरोबर घेऊन जायचे काम अग्रलेखांद्वारे संपादकांना करावे लागते.''५

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 211 Role & Nature of Media
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
December-2019

अग्रलेखामध्ये साठ टक्के मत व चाळीस टक्के माहिती त्या वृत्तपत्राच्या धोरणाशी निगडीत संपादक लिहित असतात. अग्रलेख म्हणजे काय हे समजावून घेण्यासाठी विविध संकल्पना लक्षात घ्याव्या लागतात. डॉ. विश्वास मेहेंदळे यांच्या मते, ''जगातल्या कोणत्याही देशातल्या, राज्यातल्या, गावातल्या एखाद्या विशिष्ट राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, घटनेवर प्रसंगावर तातडीने व्यक्त केलेले पण अभ्यासपूर्ण, दोन्ही बाजू मांडणारे तौलनिक स्वरुपाचे विचार प्रवर्तक विवेचन म्हणजे वृत्तपत्रातील अग्रलेख घटनेवर भाष्य करणारे असे हे लेखन संपादकीय या संज्ञेस पात्र ठरते''.[६]

डॉ. एम लायलस्पेन्सर यांनी अग्रलेखांची व्याख्या करताना म्हटले आहे की, ''एखाद्या वैशिष्टपूर्ण घटनेचे, घडामोडीचे महत्त्व सामान्य वाचकालाही होईल अशाप्रकारे त्या घटनेची मोजक्या शब्दात तर्कशुद्धरीतीने व सहजतेणे आनंद देईल त्या प्रभावी पद्धतीने केलेले विश्लेषण किंवा सादर केलेला मजकूर म्हणजे अग्रलेख''.[७]

''मत आणि वस्तुस्थिती या गोष्टी थोडक्यात तर्कशुद्धपणे रंजक पद्धतीने वाचकांच्या मनावर परिणाम करण्याच्या दृष्टीने ज्यामध्ये व्यक्त केलेल्या असतात त्यास संपादकीय, अग्रलेख म्हणायचे''[८] असे ल.ना. गोखले म्हणतात.

गॅबेल आणि मिल्टन यांनी वृत्तपत्रांच्या प्रवृत्तींचा तसेच धोरणांचा विवेकपूर्ण अविष्कार म्हणजे अग्रलेख''[९] अशी व्याख्या केली आहे.

श्शुमन ॲडविन म्हणतात, ''चालू घडामोडींवरील अन्वयार्थक भाष्य म्हणजे अग्रलेख''[१०] ''मराठी वृत्तपत्रातील अग्रलेखांना जे अग्रत्व किंवा महत्व आहे त्याचे मूळ मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात आहे. ज्या उद्देशासाठी महाराष्ट्रात वृत्तपत्रे काढली गेली आणि वाचली गेली त्या उद्देशानेच अग्रलेखाला महत्त्व प्राप्त झाले होते. केवळ आपल्या वाचकांना बातम्या पुरविण्यासाठी वृत्तपत्रे निघाली असती व धंदेवाईक संपादकांनी त्याचे संपादन केले असते तर अग्रलेखाला मराठी वाङ्मयात उल्लेखनीय स्थान मिळाले नसते''.[११]

धारदार भाषाशैलीतील आणि परखड विचार मांडणारे अग्रलेख हे वृत्तपत्रांचे भूषण असतात. अनेकांना ही किमया साधतेच असे नाही. एखाद्या वादामध्ये नेमकी काय भूमिका घ्यायचे हे संपादक ठरवू शकला नाही तर त्याचे संपादकीयत्व गोंधळाचे ठरते''.[१२]

वरील सर्व व्याख्यांचा विचार करता वृत्तपत्रात अग्रलेखांचे स्थान किती अनन्यसाधारण आहे याची कल्पना येते.

**अग्रलेखांची वैशिष्टये :**

१. अग्रलेखामध्ये चालु घडामोडीचे सत्य परखडपणे मांडलेले असते. कुठलाही उत्तम अग्रलेख हा वाचकांच्या विचारांना गतिमान करतो. अनेकदा त्यांना कार्यप्रवणही बनवतो. जो लेख आपल्या वृत्तपत्राच्या ध्येय धोरणाचा व नितीचा उचित आविष्कार करतो तो अग्रलेख असतो.
२. अग्रलेख म्हणजे विचार आणि वर्तन यातील एकरुपता, ज्ञान आणि विवेक यांची सांगड, निर्भयता आणि नि:पक्षपातीपणा यांचे प्रतीक होय.
३. अग्रलेख लिहितांना संपादकाला अचूक ज्ञान, स्पष्ट मांडणी व विषयानुरुप भाषा कधी भावनात्मक विचारप्रधान, मनोरंजनात्मक या लेखनश्शैलीमुळे ढोबळमानाने अग्रलेखाचे चिंतनात्मक, प्रभावी, माहितीप्रधान, मनोरंजनात्मक, टिकात्मक असे प्रकार करता येतात.

**अग्रलेख लिहितांना काही तत्त्वाचे पालन केले जाते :**

१. अग्रलेख लिहिणाऱ्या लेखकाने सत्य आणि परिस्थिती प्रामाणिकपणे व पुर्णपणे सादर केली पाहिजे. एखाद्या व्यक्तीला खोटे पाडण्याचा, वाचकाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करु नये ही तत्त्वे लेखकाला पाळावी लागतात.

२. अग्रलेख लेखकाने वस्तुनिष्ठ, पक्षपाती निष्कर्ष काढावे लागतात.

३. अग्रलेख लेखकाच्या लेखनामागे वैयक्तिक हिताची, विशिष्ट हितसंबंधाची प्रेरणा नसावी ही जाणीव अभिप्रेत असते.

४. अग्रलेखात मांडलेली मते ही अस्खलनशील नाही याची जाणीव लेखकाला असणे आवश्यक असते असे मानले जाते.

५. अग्रलेख लिहिताना लेखकाने माहितीच्या व ज्ञानाच्या प्रकाशात आपल्या निष्कर्षाचे सतत परीक्षण करावे लागते एखादा मांडलेला विचार चुकीचा असेल तर ती मते किंवा विचार सुधारावेत हे अभिप्रेत असते.

६. अग्रलेख लेखकाची भक्कम अशी निष्ठा आणि जीवनाची लोकशाहीवादी तत्त्वप्रणाली असावी. स्वत:ची मते मांडण्याचे धैर्य त्याला असले पाहिजे असे अभिप्रेत असते.

७. अग्रलेख लेखकाने व्यावसायिक सचोटीचा उच्च दर्जा सांभाळण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांचे संरक्षण, प्रतिष्ठा अबाधित ठेवणे आवश्यक आहे.

वरील सर्व तत्त्वे अग्रलेख लेखनासाठी परिपूर्ण आहेत. त्याद्वारे कुठल्याही अग्रलेखांचे परीक्षण करता येऊ शकते.

**अग्रलेख लिहिणाऱ्याची परंपरा :**

स्वातंत्र्यपूर्व काळात श्री.गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, शिवराम महादेव परांजपे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. ग.त्र्यं. माडखोलकर इ. नी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात अग्रलेखातून समाजाला जागृत करण्याचे काम केले. आगरकरांची सामाजिक जाणिवेनी ओतप्रोत भरलेली मार्मिक आणि सडेतोड भाषाशैली, टिळकांची स्वराज्याच्या प्रेरणेने प्रेरीत झालेली आक्रमक आणि परखड भाषाशैली, ब्रिटीश सत्तेचे वाभाडे काढणारी परांजपे ह्यांची उपरोधपूर्ण भाषाशैली, सामाजिक विषमतेवर घणाघाती प्रहार करणारी आंबेडकरांची विद्रोही आणि तर्कशुध्द भाषाशैली आणि माडखोलकर ह्यांची प्रवाही आणि ओजपूर्ण भाषाशैली त्याकाळातील पत्रकारितेचे स्वरूप स्पष्ट करणारे हे अग्रलेख आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात आचार्य प्र.के. अत्रे, श्री. अनंतराव भालेराव, श्री. गोविंद तळकर, श्री माधव गडकरी, श्री नीळकंठ खाडीलकर, नरहर कुरुंदकर इत्यादींनी लेखन केलेले आहे. कुठल्याही व्यावसायिकतेला शरण न गेलेली ही मंडळी आहेत. स्वातंत्र्योत्तर अग्रलेखाची भाषा जनसामान्यांच्या अधिक जवळ असलेली साधी सरळ भाषा आहे. संस्कृत अवतरणे, क्लिष्ट वाक्यरचना, बोजड शब्द, अनावश्यक आलंकारिकता यापासून दूर राहून ती जास्तीत जास्त लोकांशी भावनिक व वैचारिक दृष्ट्या संवाद साधण्यास यशस्वी झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात वृत्रपत्रांची संख्या वाढलेली आहे वेगवेगळया थरातील वाचक वर्गही निर्माण झालेला आहे. अग्रलेखांमध्ये ज्ञान आणि माहितीचे प्रमाण वाढलेले दिसते. तसेच वेगवेगळया विषयांना वृत्तपत्रात आणि अग्रलेखातही प्राधान्य मिळाले.

ISSN : 2348-7143
December-2019

**मराठी अग्रलेखांचा विकास** :

वृत्तपत्रातील अग्रलेखांचा इतिहास सांगावयाचा झाल्यास १८८५ साली संपूर्ण भारतातून ४२१ वृत्तपत्रे प्रसिद्ध होत होती. १९९७ मध्ये महाराष्ट्रात मराठी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकांची संख्या जास्त झाली. १८३२ ते १८८१ पर्यंतच अग्रलेख इंग्रजी वळणाची होते. दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी आपल्या नियतकालीकासंदर्भात 'हे एक चांगले साधन मिळाले आहे आणि त्याचा उपयोग समाजासाठी करावयाचा आहे'' असे विचार मांडले आहेत. दर्पण नंतर वृत्तपत्राच्या क्षेत्रात ज्ञानोदय, ज्ञानदर्शन, ज्ञानसिंधू, ज्ञानप्रकाश, ज्ञानसागर अशा नावाची वृत्तपत्रे पुढच्या दहा वर्षात प्रसिद्ध झाली या वृत्तपत्रांनी 'दर्पण' ने प्रज्वलीत केलेली ज्ञानज्योत पुढे तेवत ठेवली. २४ ऑक्टोंबर १८४१ मध्ये गोविंद विठ्ठल उर्फ भाऊ महाराज यांनी 'प्रभाकर' नावाचे साप्ताहिक सुरु केले. नव्या ज्ञानाचा उपयोग कर्मठ धर्मवाद्यांना उत्तर देण्यासाठी झाला पाहिजे त्यासाठी त्यांना लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख या विचारवंताची जोड मिळाली. पाश्चात्य विद्येचा प्रसार व्हावा आणि भाषा व संस्कृती या संबंधी स्वाभिमानही असावा हा मुख्य हेतू त्यांचा होता. 'इंदूप्रकाश' या १८६२ मध्ये सुरु झालेल्या साप्ताहिकाने मराठी वृत्तपत्राच्या क्षेत्रात दुसरे पर्व सुरु केले. न्या. रानडे, भांडारकर, विष्णुशास्त्री पंडित सामाजिक सुधारणा करणे, ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धार्मिक प्रचाराला परतवून लावणे इ. विविध घटनांचे पडसाद 'इंदुप्रकाश' या साप्ताहिकांत उमटू लागले होते.

'इंदुप्रकाश ते केसरी' असा कालखंड लक्षात घेतला तर अरुणोदय, हिंदूपंच, किरण, दिनबंधू ही वृत्तपत्रे तत्कालिन बदलत्या पत्रकारितेची दिशा दाखवितात. १८६६ मध्ये 'अरुणोदय' चे संपादक काशिनाथ विष्णू फडके यांनी तात्त्विक चर्चेपेक्षा सामाजिक व्यवहार आणि घटना यावर त्यांनी भर दिला होता. १८७२ मध्ये हिंदूपंच नावाचे वृत्तपत्र सुरु झाले. यापत्राने गंभीर विषयांना विनोदी आणि उपहास पर भाष्य व्यक्त करण्याचे अभिनव तंत्र स्वीकारले होते. याच काळातील महादेव बल्लाळ नामजोशी यांनी 'किरण' या साप्ताहिकातील अग्रलेखातून अनियंत्रीत राज्यसत्ता व नोकरशाहीवर जोरदार टीका केली.

वरील सर्व वृत्तपत्रांनी सामाजिक सुधारणांचे विचार प्रखरपणे मांडले. इंग्रज सरकारच्या धोरणावरही टीका केली. त्याकाळातील सुधारणांचे लोन समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत पोहचलेले नव्हते. शिक्षणाच्या अभावी अंधारात चाचपडणाऱ्या आणि अन्यायाने दडपडलेल्या वर्गाच्या आशा पल्लवीत करण्याचे कार्य दिनबंधू या साप्ताहिकाने केले. दिनबंधूचे संपादक कृष्णराव भालेकर हे महात्मा जोतीराव फुले यांचे अनुयायी होते. त्यांच्या प्रेरणेने १८७८ मध्ये दिनबंधू साप्ताहिक सुरु केले. त्यांनी बहुजन समाजावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. मराठी पत्रकारितेच्या इतिहासात बहुजन समाजाच्या समस्यांना समाजापुढे मांडून एक नवा विचारप्रवाह सुरु केला. वृत्तपत्रातुन होणारे लोक जागृतीचे कार्य, प्रबोधनाचे धोरण यांचा परिणाम एकोणीसाव्या शतकाच्या मध्यानंतर वाढत होता. इंग्रजी दडपशाही विरुद्ध आणि राजकीय पार्श्वभूमीवर 'केसरी' वृत्तपत्र सुरु झाले. १८ जानेवारी १८८१ रोजी बाळ गंगाधर टिळक आणि गोपाळ गणेश आगरकारांनी 'केसरी' वृत्तपत्र सुरु केले. केसरीचे पहिले संपादक गोपाळ गणेश आगरकर होते. लोकमान्य टिळकांनी इंग्रजी वळणाच्या अग्रलेखांना मराठी, देशीय स्वरुप दिले. १८८७ साली लोकमान्य टिळक केसरीचे संपादक झाले. गुळगुळीत कागदावर बुळबुळीत मजकूर छापून लोकांचे रंजन करणे हे काही वर्तमानपत्राचे मुख्य कर्तव्य नव्हे. स्वदेश रक्षण करण्यासाठी आपले साधन नेहमी धारदार ठेवण्याची दक्षता ठेवली पाहिजे अशी लोकमान्य टिळकांची भूमिका होती. 'काळ' कर्ते शिवराम सहादेव परांजपे टिळकांच्या परिवारातले नसले तरी त्यांच्याच विचारपरंपरेतील प्रतिभाशाली पत्रकार होते. न.ची. केळकर, श्री. ग.त्र्यं. माडखोलकर, नरहर कुरुंदकर हेही त्यांच परंपरेतील लेखनकर्ते होते.

ISSN : 2348-7143
December-2019

महाराष्ट्राच्या सामाजिक परिस्थितीत व विचारातही १९२० च्या सुमारास परिवर्तन घडत होते. महात्मा फुले यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या ब्राम्हणेतर वर्गात जागृकता येऊ लागली. शाहु महाराजांच्या प्रोत्साहनाने दिनबधु, शेतकऱ्यांचा कैवारी, विजयी मराठा यासारखी ब्राह्मणेतरांची व्याख्या व समस्या व्यक्त करणारी वृत्तपत्रे प्रसिद्ध होऊ लागली. ब्राह्मणेत्तर समाजाचे शैक्षणिक प्रश्न, त्या समाजातील रुढी, अंधश्रद्धा, कर्मठ चालीरिती जातीपातीचे व्यवहार इत्यादींनी निर्माण केलेली विषमता अशा विविध प्रश्नांवर या पत्रातून विचार व्यक्त होऊ लागले. याचकाळात अस्पृश्य वर्गातही विचार जागृती होऊ लागली. आपण सर्वार्थाने उपेक्षित आहोत, बहिष्कृत आहोत ही जाणीव वाढू लागली. उच्च जातींनी आपल्याला वंचित ठेवले आहे. शिक्षण जवळ जवळ नगण्य होते. ज्यांनी शिक्षण घेतले त्यांनी आपल्या बांधवासाठी वृत्तपत्र चालविले त्याही काळात 'अत्यंजविलाप', 'महाराजा सुधारक', निराश्रित हिंदू नागरिक', 'चोखामेळा' ही वृत्तपत्रे प्रसिद्ध झाली. दलित पत्रकारितेचे खरे स्वरुप इ.स. १८०८ साली प्रसिद्ध झालेल्या 'सोमवंशीय मित्र' या वृत्तपत्रात दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही या प्रभावी साधनाची महती पटली होती.

डॉ. आंबेडकर यांच्यापुढे शिक्षणाच्या दृष्टीने खूपच मागे असलेला वर्ग होता. पण अशाही परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२० पासून १९५६ पर्यत 'मुकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' व 'प्रबुद्ध भारत' ही चार नियतकालीके संपादीत केली. 'मुकनायक' हे डॉ. आंबेडकरांच्या या पहिल्या पाक्षिकाने अस्पृश्यांच्या विचारांना, भावनांना आणि समस्यांना वाचा फोडली. डॉ. आंबेडकरांना राजकीय प्रश्नापेक्षा सामाजिक दास्य अधिक जाचक वाटत होते. त्यातून अस्पृश्य समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांनी जे ध्येयधोरण मानले होते तेच 'बहिष्कृत भारत' च्या अग्रलेखातून अत्यंत जळजळीत शब्दांत मोठया पोटतिडकीने मांडत होते. १९३० मध्ये 'जनता' हे पाक्षिक सुरु केले. या जनता पाक्षिकाचेच नंतर १९५६ साली 'प्रबुद्ध भारतात' रुपांतर झाले. स्पृश्य व अस्पृश्य या दोन्ही समाजात धार्मिक व सांस्कृतिक चळवळी ची जोड देणे तितकेच आवश्यक होते. अशा चौफेर कार्यासाठी त्यांची पत्रकारिता जन्माला आली आणि समाजाला मार्गदर्शक ठरली.

सामाजिक प्रबोधन करणारे एक ध्येयवादी पत्रकार म्हणून प्रबोधनकार ठाकरे यांचा उल्लेख केला पाहिजे. १९२१ मध्ये प्रबोधन हे पाक्षिक सुरु केले. प्रबोधनकार ठाकरे यांची लेखणी प्रखर होती आणि लेखन शैली सर्वार्थाने स्वतंत्र होती. कडक शब्दात टिका करुन प्रतिपक्षाचे विचार कसे सदोष आहेत हे सांगताना ते बिनतोड युक्तिवाद करीत असत. देखावा करणाऱ्या सुधारकांचा निर्भिडपणे परामर्श घेतला.

**अग्रलेखांचे महत्त्व :-**

अग्रलेखांचे महत्त्वांचे स्थान आजही प्रिंट मिडिया वृत्तपत्रामध्ये अबाधित आहे, कोणतीही घटना घडल्यास वाचक त्या त्या दिवशी याबाबत संपादकाचे मत काय असेल हे उत्सुकतेने वाचत असतो.

काही वृत्तपत्राचा खप त्यामध्ये असणाऱ्या अग्रलेखांमुळेच होतो. अग्रलेखांची व्याप्ती ही तर त्याच्या वैचारिक आणि शाब्दिक दाहकता यावर अवलंबुन आहेच. पण त्यासोबत त्याला समाजातील भौगोलिक स्त्रोतांची किनार असते, ज्यातून काही वेळेस भविष्यातील गोष्टींचा उलगडा येथे आधीच झालेला असतो. आजच्या इंटरनेटच्या युगात प्रत्येक व्यक्तींच्या हातात मोबाईल फोन आले. वृत्तपत्र आणि त्यामध्ये सादर होणारे अग्रलेख अथवा स्तंभलेख आज वाचले जात नाही. तरीही अनेक जुने नवे संदर्भ अग्रलेखात समाविष्ट असतात. वृत्तपत्र क्षेत्रात आजही अग्रलेखाला एक विशिष्ट स्थान आहे असे म्हणावेसे वाटते.

संदर्भ ग्रंथ :

१. टिकेकर श्री.रा :– वृत्तपत्रविद्या संपादन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नागपूर. पृ. ४९
२. डॉ. धारुरकर वि.ल. :– संपादन कला व शास्त्र, परिमल प्रकाशन, औरंगाबाद. पृ. ८३
३. तत्रैव, पृ. ८४
४. डॉ. परांजपे विनिता :– अग्रलेख, एक संवाद माध्यम, मानसन्मान प्रकाशन, पुणे. पृ. १४–१५
५. तत्रैव
६. तत्रैव
७. पोतदार के.एम. :– संपादक आणि संपादकीय, कॉस्तुभ प्रकाशन, नागपूर. पृ. ८१
८. डॉ. परांजपे विनिता :– अग्रलेख, एक संवाद माध्यम, मानसन्मान प्रकाशन, पुणे. पृ. १४–१५
९. तत्रैव
१०.तत्रैव
११.तत्रैव प्रस्तावना, पृ. ६–७
१२.देशमुख एस.एम. :– प्रस्तावना, हार आणि प्रहार, आदित्य प्रकाशन, नांदेड.
१३.इंटरनेट वरील उपलब्ध माहितीचा आधार.

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)
ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Education

Volume-VIII, Issue-IV
October - December - 2019
Part - III

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com



Ajanta
Prakashan

# CONTENTS OF PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | वैदर्भीय संत आणि त्यांचे साहित्य<br>**डॉ. सौ. शुभांगी परांजपे** | १-५ |
| २ | टोला : कादंबरी की आत्मकथन ?<br>**प्रा. डॉ. अरूण व्ही. लाडे** | ६-९ |
| ३ | वैदर्भीय दलित काव्याचे अग्निप्रलयी उन्मेष<br>**डॉ. राष्ट्रपाल मेश्राम** | १०-१८ |
| ४ | आशा बगे यांच्या कादंबऱ्यातील मनोविश्लेषकता<br>**डॉ. मनीषा नागपुरे** | १९-२२ |
| ५ | विदर्भातील राष्ट्रसंत व तुकडोजी महाराज, ग्रामदैवत संत गाडगेबाबा व सत्यपाल महाराजांचे समाजसुधारणेचे विचार<br>**प्रा. अंजली एस. वारकड** | २३-२५ |
| ६ | आदिवासी लोकसाहित्य आणि पर्यावरण : एक अवलोकन<br>**डॉ. माया वानखडे** | २६-३१ |
| ७ | पूर्व विदर्भातील दंडार लोकनाट्य<br>**डॉ. शरद जे. मेश्राम** | ३२-४० |
| ८ | वैदर्भीय मराठी आत्मकथनात्मक कादंबरी 'होरपळ' : एक लक्षवेध<br>**राजेंद्र विश्वनाथ कुळमेथे** | ४१-४५ |
| ९ | विदर्भातील आदिवासी साहित्य : समाज, संस्कृती आणि जीवन दर्शन<br>**प्रा. विठ्ठल शामराव आत्राम** | ४६-५५ |
| १० | वऱ्हाडी बोलीतील म्हणींची अर्थवत्ता<br>**प्रा. अमृता डोरलीकर** | ५६-६४ |
| ११ | वैदर्भीय काव्यप्रवाहातील कवी लोकनाथ यशवंत यांचे निराळेपण<br>**कु. शितल वासुदेव निमगडे** | ६५-६८ |
| १२ | वैदर्भीय कवी रंगनाथजी रायपूरे यांच्या 'वादळवाट' या कविता संग्रहाचे मूल्यमापन<br>**प्रा. एन. एस. चापले** | ६९-७३ |
| १३ | मुकुंदराजाची महत्ती<br>**डॉ. सोपानदेव पिसे** | ७४-७७ |
| १४ | प्रा. शंकर सखाराम यांच्या 'भूक' कादंबरीचे मूल्यमापन<br>**कु. प्रणिता कचरूजी गेडाम** | ७८-८१ |

VOLUME - VIII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १०. वऱ्हाडी बोलीतील म्हणींची अर्थवत्ता

**प्रा. अमृता डोरलीकर**
डॉ. म.वा.पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर.

मराठीतील लोकसाहित्याचे दालन भव्य आणि दिव्य आहे. लोकगीत, लोककथा, उखाने, म्हणी इ. प्रकारची विविधता त्यात आहे. लोकसाहित्यातील या विविध भावछटा हृदयस्पर्शी आहे. लोकजीवनातून आविष्कृत झालेले आणि लोकजीवनात आनंद निर्माण करणारे हे अलिखीत अक्षर वाङ्मय आपल्या देशाचे लेणे आहेत. त्यातही लोकजीवनातील म्हणींनी लोकसाहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. लोकजीवनातील विविध अनुभव विशिष्ट परंपरा त्यांच्या मागे आहे.

लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे ज्या समाजाचे ते साहित्य असते त्या समाजाच्या सांस्कृतिक, श्रद्धांना, रुढींना व जीवनावर नियंत्रण करणाऱ्या घटकांचा अभ्यास होय.[१] लोकसाहित्याची निर्मीती अज्ञात असलेली दिसून येते. लोकसाहित्याची निर्मिती लोकसमूहातून झालेली असते.

लोकसाहित्याचा अभ्यास हा लोकमानसाच्या आविष्काराचा अभ्यास आहे. ते ज्या विविध माध्यमातून व्यक्त होत त्या सर्वांचा विचार अभ्यासात क्रमप्राप्त ठरतो. त्यामुळे म्हणींसारख्या शब्दबद्ध आविष्कारा बरोबरच लोकरुढी, लोकविद्या – विश्वास – रुढी इ. चाही अभ्यास करणे आवश्यक असते. म्हणजेच पर्यायाने हा अभ्यास लोकधर्म व लोकसंस्कृती यांचा अभ्यास ठरतो.[२]

"अगदी मार्मिकपणे मोजक्या शब्दात मोठे सत्य सांगणारे वचन म्हणजे म्हणी होय"[३] असे अलेक्झांडर क्राप म्हणतो.

म्हणीतून व्यक्त होणारे सत्य हे लोकजीवनातून व्यक्त होणारे असते. या सत्याला लोकजीवनाचा स्पर्श झालेला असतो. "मोजक्या व सुटसुटीत शब्दांच्या म्हणी पद्याकडे झुकलेल्या असून ठसकेबाज असतात"[४].

म्हणींच्या मांडणी सूत्रबद्ध असून साहित्यीक असलेली दिसते. म्हणीला ठसकेबाजपणा आणि पद्याभास असतो. सामूहिक जीवनाचा आविष्कार त्यातून होताना दिसतो. निरनिराळया लोकसमूहात एकाच अर्थाच्या अनेक म्हणी दिसून येतात. लोकजीवनात रुढ झालेल्या म्हणींना कित्येक शतकांची परंपरा आहे. युरोपात म्हणींच्या अभ्यासाला एकेकाळी चालना मिळली होती. ॲरिस्टॉटलने इ.स. पूर्व दुसऱ्या शतकात म्हणींचा अभ्यासाला सुरुवात केली. म्हणींची पहिली व्याख्या ॲरिस्टॉलने केलेली आहे.

"Proverbs are remarks which on account of their shortness and correctness have been saved out of the wreck and rwns of oncient philosophy"

या व्याख्येतून म्हणींचा सुटसुटीतपणा आणि आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य दिसून येते.

भारतात म्हणींना प्राचीन परंपरा आहे. सुभाषिते आणि म्हणी यांचा संबंध आहे. सुभाषिते म्हणजे आज प्रचलित असलेल्या म्हणींचे मूळ रुप होय असे म्हटले जाते.

म्हणीचे स्वरुप व त्यामागील परंपरा पाहता जुना अनुभव सुत्रबद्ध करुन सांगताना म्हणींची निर्मिती होते असे म्हटले जाते. आशयाच्या दृष्टीने म्हणीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते.

१. नात्यासंबंधीच्या म्हणी
२. पशु, पक्षी इत्यादी विषयक म्हणी
३. विरोध व उपहासात्मक म्हणी
४. धर्म, नीती, अनुभव आणि व्यवहार ज्ञान संबंधीच्या म्हणी
५. इतर प्रकारच्या म्हणी असे म्हणींचे स्वरुप सांगता येते. प्रांतवार म्हणींचे स्वरुप बदलत जाते. महाराष्ट्राच विचार करायचा झाल्यास विदर्भातल्या म्हणींना ग्रामीण भागात बोलल्याजाणाऱ्या बोलीभाषेचा साज चढलेला दिसतो.

वैदर्भीय लोकसाहित्याचे स्वरुप पाहिले तर ते बरेच संमिश्र असल्याचे दिसते. त्यात वैदिक परंपरेचा आणि जनपद संस्कृतीचा प्रवाह एकमेकात मिळालेला आहे. याविषयी ''जानपद स्थितीतच धार्मिक जीवनाला विशेष रुप प्राप्त होत असते. भटकंतीच्या काळात एकत्र फार काळ निवास नसल्याने दैवी विश्वास आणि धार्मिक विधी यांचे रुप विकास पावण्यास फारसा वाव नसतो. पण एकदा स्थैर्य प्राप्त झाले की धार्मिक विधी वाढतात''[५]

विदर्भाच्या लोकसाहित्याचा विचार केला तर वैदर्भीय लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन मुख्यत: शेती हेच होते. लोकसाहित्याच्या अंगाने विचार करता वैदर्भीय ग्रामीण भागात मनोरंजनाचे साधन म्हणून सण, उत्सव साजरे केले जातात. रोजच्या दैनंदिन आयुष्यात म्हणींच्या माध्यमातून विरंगुळा आणि मनोरंजन दोन्ही साधले जातात. ती शेती सर्वस्वी निसर्गावर पावसाच्या स्थितीवर अवलंबून असते. या पावसासंबंधी आपल्या पूर्वानुभवातून वैदर्भिय मनाने काही आराखडे बांधलेले असतात. शेतकऱ्यांसाठी त्यांचे फार महत्त्व असते. पावसाशी निगडीत अनेक म्हणी त्यांच्या बोलण्यातून नेहमीच येत असतात.

अरदळा, पाळतीन गरदळा
पळला जर हस्त त कुनबी मस्त
रोवनी करते बोवनी; मिरुग जाते शियानी.
पाऊस पळे मिर्गा आंधी रोहिनीचा,
पायना हाले भोवा आंधी बहीनीचा.

ऋतुमानानुसार पाऊस पडणे पिकासाठी आवश्यक असते. हे यातून स्पष्ट होते. वैदर्भीय म्हणींची निर्मिती वृद्ध लोक, वातावरणातील उकाडा हवामानाची स्थिती, वारा वाहण्याची दिशा, वातावरणातील किटकांचे वर्तन पक्षांची हालचाल इ. लक्षात घेऊन हे अंदाज बांधत असतात. पावसाचे अनुमान मांडणाऱ्या ह्या

म्हणी केवळ पावसाविषयीच सांगत नाही तर तेवढयाच ताकदीने मानवी मनोवृत्तीचे दिग्दर्शनही त्या करतात. मानवी स्वभावविशेष म्हणी अचूक पकडतात –

पानी पळलं की शिदोळ तलावतात.

आपल्या पात्रतेपेक्षा अधिकतेचा हव्यास धरणाऱ्या

वृत्तीची येथे टिंगल केलेली दिसते.

दुकायात तेरावा मयना

पान्याआधीन वयन बाधन बंर आपल्या निरीक्षणाच्या आधारावर ग्रामस्थ पावसाची अनुमाने करीत. त्यांनाच म्हणीतून बांधून ठेवण्यात आले. शेतकरी सुखी तर जग सुखी असे म्हटले जाते त्याने उत्पादन केलेल्या धान्यावरच जगाचा उदरनिर्वाह चालतो. हे अन्नधान्य पिकविणे, मेहनत, मशागत शेतीतील कठोर कष्टासाठी शेतकऱ्याला बळ हवे ही भावना म्हणीतून पुढीलप्रमाणे व्यक्त होताना दिसते.

ज्याच्या हाती भाकर, त्यानच वाहाव वखर

ज्याच्या कानात बाई, त्यानच कसाव काई

ज्याच्या शेतालेकाटी, त्याच्या ताटाले तुपाची वाटी.

बोरी–बाभळीचे कुंपन शेताला सुरक्षित ठेवते.

ज्याच्या घरी नाई पास, त्याच्या जिनगानीचा नास

बारा बैली खटला, ताल नाई पटला

आभामान्याच्या घरी बारा बैल, सोळयाले गेलो त खुटे सैल

हे बैला, जीव गयला

अशांनी शेती न केलेलीच बरी. त्यासाठी शेती ज्ञान हवे, पूर्वानुभव हवा. स्वतःची निर्णयशक्ती व कष्टाची तयारी हवी असे यातून सूचीत होते.

गोत आलं खाऊन गेलं, खत आलं देऊन गेलं.

खत करे सो गोत ना करे

आळशी, ऐ तखाऊ माणसाची शेती नसतेच

खाऊ खाऊ खत केलं, कर्जात शेत गेलं.

अशाने सर्वच बुडले म्हणून कष्ट न करता मांस वाढवणारे म्हणजे –

खाऊ खाऊ गोबर टिन्या केल्या खबर

भारतात प्रदेशानुसार पिके ठरलेली आहेत त्यातही विदर्भाची जमीन काळीभोर येथील बोलीतून. म्हणीतूनही या मातीच्या पिकांची माहिती मिळते. पिकांचा वापर म्हणी संकेतासाठीही झालेला दिसतो. स्वभाव, वागणूक आणि वृत्ती–प्रवृत्तींचे दर्शन हा मूळ हेतूही त्यातून दिसतो.

बोलबोल हरभऱ्याची फोल

वांग्यात वांग ल्यावनं

पारी आला दोडका, भाजीचा ना बीयाना

मुयाभर इकळे, कांदाभर तिकळे

आंबा पिकला, रस गयला

शिष्टाईचे वांगे, मसाल्याचे कांदे

हाती लसन आयका उसन

नसानी तूर, गावाच्या दूर

भाताची पंगत, देवाच्या संगत

दिवस बुडाला, मजूर उडाला इत्यादी

काही म्हणी पशूवरही आधारित आहेत जसे की,

हेल्याच्या टकरीत, वावराचा नास

ताकांच तगारु, दारी बांधल वगारु

बकरी जाते जीवनिशी, खानारा म्हंते वातळ

सोकली मेंढी, तेरा रानं धुंडी

कुंभाराच्या घरी गध्याचा बाजार

इ. म्हणी सांगता येतात.विदर्भातील जनजीवनाचे धर्म हे अभिभाज्य अंग आहे. येथील लोकांचे जीवन हे धर्मजीवनच आहे. म्हणीतून देव, दैवते, तीर्थक्षेत्र, पोथ्या, उपास–तापास इ.ची माहिती मिळते. वैदर्भीय जनजीवनही धार्मीकता आहे. वैदर्भीय लोक आपल्या श्रद्धाभावानुसार देवदेवता पूजतो पंढरीचा विठोबा–रखुमाई त्यांची आराध्य दैवता. आपल्या अंतरीची परमेश्वरनिष्ठा आपल्या म्हणींच्या देव्हाऱ्यातून मांडलेली दिसून येते. उदाहरणार्थ –

देवाचं देनं सरत नाई, मान्साचं देनं पुरत नाई.

भेव तथी देव

देवाची करनी अन् नारयात पानी

देखल्या देवा दंडवत

देव देवळात चित खेट्टात

मनी नाही भाव, मस्न्या देवा पाव

आला नेव त केला देव, नाहीतर हरहर महादेव

आंधी पोटोबाॅं, मंग इठोबाॅं

प्रस्तुत म्हणीतून व्यक्त होणारी जाणीव व जीवननिष्ठा ऐहिक जीवनाची जडवादी भारतीय कल्पना किती संपन्न आणि समृद्ध आहे आणि वैदर्भीय ग्रामीण जनामनातही खोलवर रुजलेली दिसून येते.

देव प्रसन्न व्हावा यासाठी ग्रामीण भागात भजन, पूजन, नवस, अंगारे धुपारे, पोथ्या, तीर्थयात्रा इ.चा आश्रय घेतला जातो. परमेश्वर प्राप्तीचे सारे मार्ग म्हणीतूनही व्यक्त होताना दिसतात.

आपलं ते मापलं, दुसऱ्यांन देवऱ्यावर कापलं
आवत न गावाले, निवद देवाले
आल्याचे बेल, पैशाचे तेल
खाऊन पिऊन देव केला, गाल फुगवून निवद केला
गध्यापुढे वाचली गीता, रातचा गोंधळ बरा होता
तमाशात जाते अन् कीर्तनात येते.
हात धुतला, पन नसीब नाई धुतलं
देवांनं देलं, कर्मानं नेलं
देव आला द्याले, पदर नाई घ्याले

वैदर्भीय जनजीवनावर दैववादाचा पगडा या म्हणीतून दिसून येतो. विदर्भात श्रावण महिन्यात ग्रामीण भागात भागवत हरी विजय, पांडवप्रताप मधीलकथातून प्रवचन--कीर्तनातून जनमानसावर संस्कार केले जातात. हे संस्कार म्हणींचे रुप घेऊन अवतरलेल्या दिसतात.

उदा. :— धर्मराज मेले अन याहीच्या कुई आले
घरचा चोर तकादहन
लंका जयते, हनुमान चित पायते
गध्यापुढे वाचली गीता, रामचा गोंधळ बरा होता
सीता गेली वनवासा, मागं लागली दुर्दशा

या सर्व म्हणीतून ग्रामजीवनातील 'पोथी' वाचनाची परंपरा स्पष्ट होते. यासंदर्भात रा.चिं. ढेरे म्हणतात — ''पोथी वाचन हे जनमानसाच्या दृष्टीने एक अनुष्ठान असते. लोकमानसाच्या दृष्टीने पुराकथातील सत्य हे आदिम व महासत्य असते ते विधीच्या वा अनुष्ठानाच्याद्वारे पुनः जागवता येते. ऐतिहासिक पुरुषापेक्षा रामकृष्ण त्यांना अधिक खरे व शाश्वत वाटतात. काळाची बंधनं तोडून त्यांच्या Primoradial time शी त्यांचे मन नाते जोडू पाहते. पोथीपारायणाचे अनुष्ठान त्यासाठीच मांडले जाते''६

तीर्थस्थळाविषयी विदर्भातील लोकांना खूपच आकर्षण असते. अशा तीर्थक्षेत्रात प्रत्यक्ष परमेश्वराचे वास्तव्य आहे. अशी श्रद्धा असल्यामुळे साधुसंताच्या सान्निध्याने त्या स्थळाला पवित्र्य लाभल्याची भावना असते. यात्रेच्या—जत्रेच्या निमित्ताने या ठिकाणी मरण आले तर जीवाला मोक्षप्राप्ती होते अशी धारणा आहे. वर्धे पलिकडे आंभोरा, मार्कण्डा, कौण्डिण्यपूर, रामटेक, मोठा महादेव, मुक्तागिरी, लोणार, बहिरम, वाशिम इ. पवित्र स्थळे आहेत. या स्थळांवरुनही काही म्हणींची निर्मिती झालेली दिसते.

फिरपन गेलं पंढरपूरा, येसीपासून आलंघरा
तीर्थात तीर्थ लोनार, सौ बामन एक सोनार
फाटकं लुगळं तुटक्या वाह्या, बाई मी चालली बालाजी पाहाया
लोकाच्या मार्थं, तुयजापूरा जातो

शेगाव संताच, आसे गाव भूताचं

माणूस हा उत्सवप्रिय प्राणी आहे. वैदर्भीयांच्या जीवनातही अनेक सण साजरे केले जातात. नक्षत्र, मास, ऋतू इ. वर सणांचे महत्त्व अवलंबून असते. ''सण हे सूर्याच्यास्थितीवर व कृषिसंपत्तीच्या समृद्धीवर अवलंबून असतात'' असे डॉ. केकेलॉक एलिस, यांनी म्हटलेले आहे. त्यांचे प्रत्यंतर कृषिप्रधान विदर्भात प्रामुख्याने येते. नागपंचमी, पोळा यासणाला विशेष महत्त्व आहे. आपल्या कष्टाळू जीवनात आनंद, उत्साह नवचेतना ओतणाऱ्या सणांचे अनेक संदर्भ वैदर्भीय माणसाने आपल्या म्हणीतून चितारलेले दिसतात.

उदा. :— असलं त्या राजी दिवाई नसलं त्यारोजी शिमगा

दिवाई दसरा, हातपाय पसरा

राजाले दिवाई रानीले पाडवा, इत्यादी

शेती हाच ज्यांच्या जीवनाधार, त्या वैदर्भीयांना दिवाळीचे महत्त्व एवढे वाटते त्याचे कारण हेच. या संदर्भात डॉ. रा.ची. ढेरे म्हणतात – ''लक्ष्मी ही आपल्या परंपरेत समृद्धीची देवता आहे. आपण दीपावलीला तिची पूजा नवनिधींचा स्वामी असलेल्या कुबेरासह करतो. धनद कुबेर आणि लक्ष्मी हे समृद्धीदायक युगुल दीपावलीच्या सणात प्रमुख पूजाविषय बनले आहेत. दीपावलीला 'यक्षरात्री' असे प्राचीन नाव आहे. कुबेर हा यक्षाचा अधिपती यक्षराज आहे. त्याची धनशक्ती म्हणजेच लक्ष्मी समृद्धीचे प्रतीक, समृद्धीही सर्जनाचीच परिणती आहे. प्राचीनांच्या दृष्टीने तर उचितकाळी, उचित प्रमाणात जलवृष्टी व्हावी, भूमी वृक्ष व वनस्पतींनी, नाना धनधान्यांनी बहरुन जावी, हाच समृद्धीचा अर्थ होता. धान्याने भरलेल्या कोठयांचे अन् गायींनी भरलेल्या गोठयांचे त्यांना यामुळेच कौतुक''[७]

फाल्गुनी पौर्णिमेला येणारी होळी हा फाल्गुनोत्सवही तेवढाच महत्त्वाचा त्यावरील म्हणीही आढळून येतात.

उदा. :— आवसपुनिव पाळते, व्हळीच्या गवऱ्या जाळते.

बाप शिमगा, माय तिसक्रात

वेळेवर वेळ, शिमग्याचा खेळ

शिमगा सरला तरी बोंब मारनं सुरुच

होईची बोंब, तीन दिवस

या सणात बीभत्स प्रकारांना अधिक वाव दिलेला असतो. ''शिमग्याच्या सणात अनिर्बंधपणा, उच्छृंखलपणा यांच्याकडे प्रवृत्ती असते. त्यात बेहोशी येते व पुढे बेतालपणाही येतो. व तो क्षम्यच नव्हे तर आवश्यक मानला जातो. शृंगारभावनेने रांगडे व किंचित उघडे प्रदर्शन हे शिमग्याचे एक लक्षणच होऊन बसले आहे''[८].

सामाजिक जीवनात जनमानसात अनेक प्रकारच्या श्रद्धा खोलवर रुजलेल्या असतात. नवस, उपास—तापास यांना आधार यासाठी घेतला जातो. इरावती कर्वे नवसाची व्याख्या करतात. 'नवस करणे

म्हणजे देवाला प्रत्यक्ष वचन देण्यासारखेच आहे''. अशी वचने देणे आणि प्राण देऊनही पाळणे हा वैदर्भीय हा धर्म मानला जातो. यावरही म्हणी अस्तित्वात असलेल्या दिसतात.

नवसा सायासाचा, अपेक्षा पायाचा

नव्या नवसाची, सोळा दिवसाची

लाळा नवसांच, पिंक आलं कावसाचं

लेकाचे नवस केले पंढरपूरापासून, सुनींच गऱ्हानं दारात बसून नवसपूर्तीसाठी पशूंना बळी दिला जातो असे अहिंसेचे तत्व जसजसे कळू लागले तसतशी सजीव बळीची जागा जड अशा पदार्थांनी घेतली. नारळ हे बोलके उदाहरण आहे. नारळाचे डोळे आणि 'शेंडी' त्याला नराचेच प्रतीक मानल्या गेले. तिथी, वार मास या संबंधीच्या विविध लोकश्रद्धा अशा आहेत.

अवसीले केला अन् पुनिवले नेला

अवस वाकळी, जवस पाखली

आंगोनीले नाई जागा त बुधवारचं लगन सांगा.

आधीच उल्लास, त्यात फाल्गूनमास

इतवार अन् सदा कतवार

डोयाना मोया, सोम्मारचा पोया, इत्यादी

ग्रामीण जीवनात दिवसाचे फार महत्त्व मानले जाते. हे यावरुन लक्षात येते. तसेच श्रद्धाळू व धर्मभोळया विदर्भातील ग्रामीण भागात भूत, पिशाच्च, राक्षस, मुंज्या या योनींनाही म्हणींनी आश्रय दिलेला दिसतो.

भूजाच्या घरात, सुताची वरात

भोये भोये, भूताचे जवाई

घरच्या मुंज्या ठेवाव, बाहिरच्यांच लगन कराव इ.

ग्रामव्यवस्थेवरही काही म्हणी आधारलेल्या दिसतात. गावपंचायतीला विशेष महत्त्व असते. त्या आधारीत म्हणी –

उदा. :– गाव करे ते राव ना करे

पाचामुखी परमेसर

अशा म्हणी आहेत. व्यवसाय उदयोगावरुनही जाती ठरत असे. दुर्गा भागवताच्या मते, ''जाती संस्थेचे व्यावसायिक स्वरुप हे आनुवंशिक उद्योगधंधाच्या स्वरुपाचे जगातल्या सुधारलेल्या राष्ट्रातच असायचे तसेच बहुतांशी आहे. उद्योगधंधाने अनुवंशिक वर्गीकरण भारतातल्या प्रमाण जाती संस्थानिर्माण करण्याइतके सामर्थ्य इतरत्र ठरलेले नाही''

ग्रामीण व्यवस्थेत लोक त्यांचे उद्योग, जाती यांना महत्त्व आहे. त्यावरही बऱ्याच म्हणींची उत्पत्ती झालेली दिसते.

उदा. :— कुनबी पिकावर शायना
ठरन पाटलाची, ओवायनी कावकोराची
सोनार, शिंपी, कुळकर्णी आप्पा यांची संगत न करे बाप्पा.
घरचा रडया, गावचा देशपांडया
पांडयाची म्हैस, देसपांडयाले ऊठबैस.
माहार गेला अन जोहार करुन आला.
मायरीनची घोळी हूकही, चारी खळे चुकली,
भटाची घोळी खळयावर
गंध कमावते. अन कुंभार खाते
चालचाल चंभारा सातभरली, खेट्ट इतका गत सरली
दाढी ना मिशी, हजामतची खुशी.
खुदा मारे एकच बार, तेली मारे धारोधार
म्हाल्याची मुंडी अन धोब्याची लंगोटी
बामनाले देली वसरी बामन हातपाय पसरी
धनगर बसला जेवाया, ताकासंग शेवया इ.

वरील म्हणी ग्रामीण व्यवस्थेत बाराबलुतेदारीतून निर्माण झालेल्या दिसतात.एकत्र कुटूंबपध्दतीला विशेष महत्त्व आहे. त्यात आई—वडील,मुले,बहिणी व इतर नातेवाईकांचा समावेश असतो.ही नातीगोती रक्त संबधावरून आणि लग्न संबंधावरून ठरत असतात.वैदर्भीय लोकसाहित्यातून या नात्यांच्या उल्लेख वारंवार झालेला दिसून येतो. यावर आधारितही काही म्हणींची निर्मिती झालेली दिसून येते.

माय तुही कासी,डोक्स ठेव पायापासी
अळानी माय घर वाया जाय,शिकेल माय घर पुढ जाय.
खान तशी माती,गहु तसी रोटी,माय तशी बेटी,
पोराची माय, तिचे पालखीत पाय
बाप तसा लेक, मसाला एक
पहिली बेटी अन धनाची पेटी
पावना म्हणून आला अन घरजवाई झाला
जीवातला जीव केला तुमच्या हवाली
आता तुमी मायबाप जीवाची सावली
सासू बसली भांडाय,त सून बसली कांडाय
पाटलाची सून,तिची गदानीन कुणाला
सजन गोयरा,नंदीना नवरा

आवसीमावसी, दुकानात पिवसी

कामापुरता मामा, ताकापुरती आजी

ईच्छायाचं आलं घोड, सासूचं गेलं मढं

सवतीसवती भांडण, झिट्या तोळती दातानं

आवाजावा मांडला हेवा

असे हे म्हणींचे सप्तरंगी लोभसवाणे इंद्रधनुष्य वैदर्भीय म्हणींतून आविष्कृत होताना दिसते. जीवनानुभावातील सौंदर्याचे वेधघेण्याचे तितक्याच समर्थपणे व्यक्त करण्याचे सामर्थ्य म्हणींमध्ये दिसून येते. शब्दांची जडणघडण लोकजीवनात झालेली असल्यामुळे व परंपरेने त्यांचा उपयोग होत असल्यामुळे जीवनविषयक अवशेष त्यात शोधता येतात.

वैदर्भीय म्हणीतील शब्दवैभव संपन्न असून त्या जो भाव व्यक्त करतात त्यांनाही मोल प्राप्त होते. म्हणूनच आशयाच्यादृष्टीने अभिव्यतीच्या दृष्टीने आणि कलात्मकतेच्या दृष्टीने म्हणींच्या शब्दात सामर्थ्य आहे संपन्नता आहे. लोकसाहित्यातील वैदर्भीय म्हणींचे दालन समृद्ध आणि आगळे—वेगळे आहे. मराठी लोकसंस्कृतीचे दर्शन त्यातून घडते. लोकजीवनात प्रचलित असलेल्या म्हणी यांच्या पाठीमागे एक विशिष्ट परंपरा आहे.

आज इलेक्ट्रॉनीक प्रसारमाध्यमांच्या युगात म्हणींचे संवर्धन करण्याची गरज निर्माण झाली आहे. संकलनाच्या माध्यमातून पुस्तकरुपाने म्हणींचे संवर्धन करता येऊ शकते. मराठी भाषेची खाण असलेल्या या म्हणींचा ठेवा जतन करुन पुढच्या पिढीच्या हातात देतांना मराठी साहित्याच्या उपासकांना मनाला एक वेगळा आनंद देणारा अनुभव ठरेल अशी आशा आहे.

**संदर्भ सुची**

१. कुरुंदकर नरहर — महाराष्ट्र वाकसंप्रदाय कोश — प्रस्तावना पृ. २९

२. डॉ. ढेरे रा.ची. — संतसाहित्य आणि लोकसाहित्य — श्री विद्या प्रकाशन, पुणे

३. क्राप अलेक्झांडर — द सायंस ऑफ फोकलोअर — पृ. १४३

४. व्यवहारे शरद — लोकसाहित्य उद्‌गम आणि विकास — विश्वभारती प्रकाशन, नागपूर—पृ.८९

५. श्री. डागे — हिंदूधर्म — पृ. २४७

६. डॉ. ढेरे रा.ची. — संतसाहित्य आणि लोकसाहित्य — श्री विद्या प्रकाशन, पुणे पृ. २९

७. तत्रैव

८. मौज होळी अंक — २८—०३—५१

**आधारभूत ग्रंथ**

१. विठ्ठल वाघ — वऱ्हाडी म्हणी आणि लोकधर्म — लोकवाङ्मय गृह, १९९७, मुंबई.

Sustainable Development of Natural Resources : Challenges and Solutions

Dr. K. P. Kariya Shri Uday Shankar Singh
Dr. S. A. Jeswani Dr. Sadhana K. Karhade

MHPC

Delhi

# Sustainable Development of Natural Resources Challenges and Solutions

प्राकृतिक संसाधन : शाश्वत विकास

CHIEF EDITORS

*Dr. K. P. Kariya*

*Shri Uday Shankar Singh*

EDITOR

*Dr. Ms. Sonu A. Jeswani*

CO-EDITOR

*Dr. Sadhana K. Karhade*

SUB-EDITORS

*Dr. Ramesh B. Patil*
*Dr. Mrs. Sheela S. Khedikar*
*Dr. Ms. Seema A. Pande*
*Ms. Jyotsna N. Wakude*



The present book, Sustainable Development of Natural Resources: Challenges and Solutions is an outcome of the conference proceedings which include various selected papers presented at the National Conference organized by [illegible] College, Nagpur in collaboration with Vishwa Yuvak Kendra, Delhi. The major focal area was Sustainable Development of the Natural Resources: Problems and Solutions, with the varied and inclusive sub-themes that covered the following areas: Natural Resources [illegible] (Special Reference [illegible]), Exploitation of Natural Resources [illegible] Dangerous [illegible] Sustainable Development of Natural Resources: Present Status and Future Prospects, The Role of Teachers in Sustainable Development of Natural Resources, The Role of Students in Sustainable Development of Natural Resources and the Role of Media [illegible] in Sustainable Development of Natural Resources. [illegible] issues are included in this book.

[illegible] this book will certainly add to the knowledge and [illegible] in the field of Sustainable Development of Natural Resources for educationists, environmentalists, social workers, researchers and students.

# Sustainable Development of Natural Resources : Challenges and Solutions


- ❖ CHIEF EDITORS : Dr. K. P. Kariya
  Shri. Uday Shankar Singh
- ❖ EDITOR : Dr. Ms. Sonu A. Jeswani
- ❖ CO-EDITOR : Dr. Sadhana K. Karhade
- ❖ SUB-EDITORS :
  - Dr. Ramesh B. Patil
  - Dr. Mrs. Sheela S. Khedikar
  - Dr. Mrs. Seema A. Pande
  - Ms. Jyotsana N. Wakude
- ❖ LANGUAGE EDITORS :
  - Prof. Nitin H. Gaikwad (ENGLISH)
  - Dr. Pooja G. Pandya (ENGLISH)
  - Dr. Mrs. Sudha P. Jangid (HINDI)
  - Lect. Ms. Kavita B. Baheti (HINDI)
  - Lect. Mrs. Sarita D. Babhare (MARATHI)
  - Dr. Chhotu D. Puri (MARATHI)



**MOUNT HILL PUBLISHING COMPANY**
**DELHI**

20. प्राकृतिक संसाधनो का दीर्घकालिक विकास समस्या और समाधान 67
**मंजू हरिलाल साहू**
21. प्राकृतिक संसाधनों का पर्यावरण के दृष्टि से उपयोग, समस्या व समाधान 71
**डॉ. सुजाता साखरे**

# मराठी लेख

1. पर्यावरण : एक वैश्विक आव्हान 1
**डॉ. सौ. शीला संजय खेडीकर**
2. नैसर्गिक स्त्रोतांच्या शाश्वत विकासात विद्यार्थ्यांची भूमिका 6
**डॉ. क्षमा चव्हाण**
3. बदलत्या हवामानाचा भारतीय कृषीक्षेत्रावर होणारा परिणाम 10
**डॉ. अरविंद युगंधर**
4. नैसर्गिक साधन संपत्तीचा शाश्वत विकास : समस्या आणि निराकारण 16
**डॉ. सौ. शुभांगी अविनाश रोडे**
5. ऊर्जा, पर्यावरण आणि शाश्वत विकासाचे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण योगदान 19
**प्रो. कमल हेमंत अडिलकर**
6. नैसर्गिक साधन-संपत्तीचा शाश्वत विकास – समस्या आणि निराकरण 25
**सौ. मृदुल सोनक**
7. भारतातील पाण्याची समस्या व संवर्धन 30
**प्रो. सौ. वैशाली एस पाटील**
8. शाश्वत विकासासाठी पर्यावरणाचे जतन व संवर्धन 33
**प्रो. डॉ. विद्या मारंबे**
9. नैसर्गिक साधनसंपत्तीचा शाश्वत विकास आणि शिक्षकाची भूमिका 37
**डॉ. वर्षा वासनीक**
10. पर्यावरणाची दिर्घकालीन उपयुक्तता व विकास 41
**श्री. विलास बी. कांबळे**
11. नैसर्गिक स्त्रोतांच्या शाश्वत विकासात शिक्षकांची भूमिका 43
**प्रो. सीमा सोनवणे एवं डॉ. स्वाती भोयर**
12. पर्यावरण पुनर्भरण एक काळाची गरज 46
**डॉ. एम. डी. पवार**
13. पर्यावरण शिक्षणात शिक्षकाची भूमिका 49
**डॉ. शेखराम परसराम येळेकर**
14. पर्यावरण संतुलन भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आवाहन 51
**प्रो. संजय उद्धवराव देशमुख**
15. जल एक नैसर्गिक स्त्रोत : व्यवस्थापन, समस्या आणि उपाय 54
**डॉ. राष्ट्रपाल गणवीर**
16. नैसर्गिक संसाधनामुळे होणा–या शाश्वत विकासाची वर्तमान स्थिती 58
**डॉ. मृणालिनी नरेन्द्र तापस**
17. पर्यावरण आणि मराठी साहित्य : अन्योन्य संबंध 62
**प्रो. अमृता डोरलीकर**
18. पर्यावरण शिक्षण : श्री निकेतन कला वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा एक अभिनव उपक्रम 68
**प्रो. सारिका पाटील**
19. साधन संपत्तीचे स्वरूप आणि व्याप्ती 71
**प्रा. गाडवे मनिशा महारूद्र**

# पर्यावरण आणि मराठी साहित्य : अन्योन्य संबंध

**प्रो. अमृता डोरलीकर**

**बीजशब्द :– पर्यावरण, निसर्ग, नैसर्गिक घटक, मानव, मराठी साहित्य, संत साहित्य.**

## प्रस्तावना

पृथ्वीवरील विशिष्ट किंवा ठराविक भागात उपलब्ध असलेली सर्व सजीवांच्या सभोवतालची परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय. Environ या मूळ फ्रेंच शब्दापासून इंग्रजीत शब्द प्रचलित झाला. पर्यावरण या संकल्पनेत सजीव व निर्जीव घटक, मानव व्यवहार, भौतीक वातावरण, नैसर्गिक साधनसंपत्ती इ. घटकांचा विचार केला जातो. मानवी जीवनाच्या जडणघडणीत नैसर्गिक पर्यावरणाचा प्रभाव पडत असतो. मानवाच्या वर्तन व व्यवहारातून मानवी पर्यावरण निर्माण होत असते. पर्यावरण व मानवी संस्कृती यांचा परस्पर संबंध आहे. तसाच साहित्य आणि समाज यांचा संबंध आहे. हे दोन घटक परस्परसंबंधी आहे. समाजात घडणाऱ्या विविध घडामोडींचे चित्रण साहित्यात उमटत असते. सभोवतालच्या पर्यावरणाचा प्रभाव समाजावर पडत असतो. मानवी संस्कृती ही पर्यावरणानुसार घडत असल्यामुळे या पर्यावरणाचे चित्रण साहित्यातून येते. साहित्याचा, समाजाशी व संस्कृतीचा पर्यावरणाशी संबंध येतो. साहित्य, समाज, संस्कृती आणि पर्यावरण यांचा अन्योन्य संबंध आहे.

पर्यावरण या संकल्पनेचा विचार करताना प्राकृतिक पर्यावरण व मानवनिर्मित पर्यावरण हे दोन प्रकार पडतात. नैसर्गिक पर्यावरणात सजीव–निर्जीव सृष्टीचा भूतलावरील सर्व घटकांचा विचार केला जातो. मानवनिर्मित पर्यावरणात मानवाचे जीवन, व्यवहार, वर्तन या बाबींचा विचार केला जातो. यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक इ. बाबींचा समावेश होतो. याठिकाणी प्राकृतिक पर्यावरणाचाच विचार करावयाचा असल्याने त्याचा मानवी जीवन व्यवहारावर आणि मराठी साहित्यावर कसा परिणाम झाला हे अधोरेखित करणे क्रमप्राप्त ठरते.

## पर्यावरणाची संकल्पना

कोणत्याही प्रदेशातील नैसर्गिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक इ. घटकांचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास हा 'पर्यावरणशास्त्र' या शाखेमध्ये करण्यात येतो. निसर्ग आणि मानव यांचे अतूट नाते आहे. निसर्गाचा व निसर्गातील घडामोडींचा मानवी जीवनावर परिणाम होत असतो. निसर्गातील घडामोडीने समग्र मानवी जीवन प्रभावित होत असते. मानवाची एक जीवनशैली असते. त्यातून मानवनिर्मित पर्यावरण निर्माण होत असते. निसर्गातील घडामोडी त्यांचा मानवी जीवनावर होणारा परिणाम त्यातून मानवी जीवनाचे बदलते वर्तन तसेच मानवाची जीवनशैली जीवन जगण्याची पद्धती, त्यांचा जीवन व्यवहार आदी बाबींचा समावेश 'पर्यावरण' या संकल्पनेत अंतर्भूत होतो. पर्यावरण संकल्पना स्पष्ट करताना के.आर. दीक्षित म्हणतात– "पर्यावरण म्हणजे संपूर्ण सृष्टींचा पूर्णत्त्वाने केला गेलेला विचार होय. ज्यामध्ये पृथ्वी, आग, आकाश, वायू जल या पंचमहाभूतांचा व आर्थिक, सामाजिक संरचनेचा गुणवत्ता व गुणविशेष यांच्यातील फरक हा जैविक अजैविक घटकांद्वारे ठरविले म्हणजे पर्यावरण"[1]

पर्यावरण ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी काही अभ्यासकांची मते पुढील प्रमाणे सांगता येतात.

डॉ. म.वा.पी.डब्ल्यू.एस.महाविद्यालय,नागपूर.

अॅडरसन – ''पर्यावरण शास्त्र म्हणजे पर्यावरणाचा अभ्यास व व्यवस्थापन करण्यासाठी विविध शाखांमधील ज्ञानाचा समन्वय साधण्याचा प्रयत्न होय''[2]

जॉन्सन टर्क – ''पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनाचा पर्यावरणावर असणारा प्रभाव यांचा अभ्यास होय''[3]

''पर्यावरणातील सर्व सजीव व निर्जीव घटकांचे संवर्धन व्यवस्थापन करण्याच्या पद्धतीचा अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र होय''[4]

पर्यावरण या संकल्पनेमध्ये पृथ्वी, आग, आकाश, वायू, जल आर्थिक व सामाजिक संरचन, जैविक व अजैविक घटक मानवी जीवन, नैसर्गिक व सांस्कृतिक घटक, पर्यावरणाचा अभ्यास व व्यवस्थापन मानवाच्या सभोवतालची परिस्थिती, मानवाचे वर्तन व व्यवहार, याचा पर्यावरणावर पडणारा प्रभाव, पर्यावरणातून आकार घेणारे मानवी जीवन आदी बाबींचा समावेश होतो.

## साहित्यातील पर्यावरण संकल्पना

मानवी संस्कृतीच्या जडणघडणीत पर्यावरणाचा महत्त्वाचा वाटा आहे. निसर्गातील अनेक घटकांपैकी मानव हा एक सजीव घटक आहे. स्वतःच्या कल्पनाशक्तीच्या सहाय्याने व बुद्धीमत्तेच्या जोरावर पर्यावरणातील अनेक शक्तीवर अधिकार प्राप्त केले आहे. मानव स्वतःचे जीवन अधिकाधिक सुखमय करण्याच्या हव्यासापोटी निसर्ग चक्रात हस्तक्षेप करत आहे. त्यामुळे मानवापुढे अनेक जीवघेण्या समस्या निर्माण होत आहेत.

अलीकडच्या काळात पर्यावरण या विशयाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. पर्यावरण या व्यापक संकल्पनेत समग्र जीवनसृष्टीचा, निसर्ग आणि मनुष्य या पर्यावरणातील दोन्ही घटकांचा अभ्यास यामध्ये केला जातो. नैसर्गिक पर्यावरणातून मानवी संस्कृती घडत असते. मराठी साहित्यात पर्यावरण ही संकल्पना व्यापक अर्थाने वापरलेली आहे. ''मानव हा देखील पशुपक्षी व वनस्पती यांच्यासारखाच एक सजीव आहे. तथापि हा सजीव बुद्धीवान आहे. नैसर्गिक पर्यावरणाशी प्राणी व वनस्पती यांच्याप्रमाणेच मानव हा देखील बांधलेला आहे हे खरेच. पण हे नैसर्गिक पर्यावरण स्वतःशी अनुकूल करुन घेण्याची क्षमता त्यात अधिक आहे''[5]

पर्यावरण या संकल्पनेत निसर्गाबरोबरच पशू–पक्षी, प्राणीसृष्टी, जीवसृष्टी, मानवसृष्टी, सभोवतालचे वातावरण आदी घटकांचा समावेश होतो. मानवी जीवनावर निसर्गचक्राचा परिणाम होत असतो. पावसाळा, हिवाळा, उन्हाळा या बदलत्या ऋतूचक्रानुसार मानव स्वतःच्या राहणीमानात बदल करुन घेत असतो. मानवाच्या जीवनमानाचा परिणाम पर्यावरणावर होतो. ''पर्यावरणाचे संस्कृतीकरण मनुष्य अव्याहतपणे करीत आलेला आहे. यातूनच अनुकूलनाबरोबरच प्रदूषणही निर्माण करण्यास तो कारणीभूत ठरला आहे.''[6] मानवाच्या हस्तक्षेपामुळे पर्यावरणात प्रदुषण निर्माण होत आहे. साहित्याच्या दृष्टिकोनातून पर्यावरण ही संकल्पना सर्वसमावेशक आहे. ''साहित्यकृती हे एक सजीव आहे आणि साहित्य ही समुदायवाचक कल्पना म्हणजे अशा सजीवांची जाती होय''[7]

मानवाला जीवन जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा साहित्यकृती सजीव असल्याने तिला जगण्यासाठी काही मूलभूत घटक आवश्यक असतात. यामध्ये ''उष्णता, प्रकाश व विद्युत हे भौतिक घटक मूळ ऊर्जास्त्रोत होत. साहित्यकृतीच्या संदर्भातही साहित्य प्रकार, लेखकाचे व्यक्तीमत्त्व आणि सांस्कृतिक संवेदन असे तीन मूलभूत ऊर्जास्त्रोत मानता येतात''[8]

वरील विवेचनावरुन साहित्यकृती ही एक शरीररुपी सजीव कलाकृती आहे हे स्पष्ट होते. या दृष्टिकोनातून विचार केल्यास साहित्याचा आणि मनुष्याचा महत्त्वपूर्ण संबंध दिसतो. म्हणूनच मराठी साहित्य हे नैसर्गिक व मानवनिर्मित पर्यावरणाचा विशिष्ट दृष्टिकोनातून अभ्यास करणारे साहित्य ठरते.

मराठी साहित्यातून संपूर्ण सजीव–निर्जीव घटकांचा विचार केलेला आहे. पर्यावरणातील प्रत्येक घटकाचे आपापले स्वतंत्र स्थान व महत्त्व असते. यासर्व घटकांच्या एकत्रित परिणामातून दोन प्रकारची पर्यावरणे उदयास येतात. सृष्टीतील पर्यावरणातील घटकांचे प्राकृतिक पर्यावरण व मानवनिर्मित पर्यावरण अशा दोन विभागात विभागणी करता येते. ''पर्यावरण म्हणजे मानवाच्या सभोवतालच्या सर्व घटकांच्या अभ्यासाचा समावेश असतो. त्यात नैसर्गिक, मानवनिर्मित, प्राकृतिक रासायनिक, जैविक व अजैविक इ. सर्व घटकांचा अंतर्भाव होतो''.[9]

साहित्यातील नैसर्गिक पर्यावरणामध्ये, मानवी जीवनावर अनुकूल परिणाम करणारे घटक व मानवी जीवनावर प्रतिकूल परिणाम करणारे घटक यांचा विचार केला जातो. तसेच साहित्यातील मानवनिर्मित पर्यावरणामध्ये सामाजिक पर्यावरण, धार्मिक

पर्यावरण, सांस्कृतिक पर्यावरण, राजकीय पर्यावरण, आर्थिक पर्यावरण यांचा विचार केला जातो. यादृष्टीने नैसर्गिक पर्यावरणाचाच विचार याठिकाणी केलेला आहे.

नैसर्गिक पर्यावरणात भौगोलिक घटकांचा अभ्यास केला जातो. त्याचबरोबर सांस्कृतिक घटकांचाही समावेश होतो. मानवाच्या नैसर्गिक पर्यावरणात हस्तक्षेप वाढल्याने निसर्गचक्रात अडथळे निर्माण होत आहे. एकविसाव्या षतकात मानवाने नेत्रदीपक प्रगती केली, त्याचबरोबर अनेक समस्याही निर्माण केल्या. यातील महत्त्वाची समस्या नैसर्गीक साधनसंपत्तीचा अतिवापर आहे. म्हणूनच आजच्या काळात पर्यावरणशास्त्र विषयाचे महत्त्व वाढत आहे. मराठी साहित्यातून नैसर्गिक पर्यावरणाचे अनेक संदर्भ येतात. संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चक्रधरांपासून ते केशवसूत, बालकवी व आजपर्यंतच्या अनेक आधुनिक लेखकांनी नैसर्गिक पर्यावरणासंदर्भात लेखन केलेले आहे.

## मराठी साहित्यातील पर्यावरण

मराठी वाङ्मयाचे अभ्यासाच्यादृष्टीने मध्ययुगीन आणि आधुनिक असे कालखंड पाडले जातात. मराठी वाङ्मयाला मध्ययुगीन कालखंडात मोठया प्रमाणात वाङ्मयनिर्मिती झालेली आहे. या साहित्यातून पर्यावरणाचे विविध घटक दिसून येतात. मध्ययुगीन कालखंडामध्ये निर्माण झालेल्या मराठी साहित्यातून पर्यावरणातील विविध घटकांचा शोधपुढे घेतलेला आहे. महाराष्ट्रात 12 व्या शतकात महानुभाव संप्रदायाचा उदय झाला. महानुभाव संप्रदायातील 'लिळाचरित्र' या ग्रंथाच्या स्वरुपात मराठीतील गद्य वाङ्मयाला प्रारंभ झाला. या संप्रदायातील साहित्यात पर्यावरणाचे नैसर्गिक स्वरुप ठिकठिकाणी दिसून येते. 'लिळाचरित्र' या ग्रंथामधून निसर्गसृष्टीचे विलोभनीय चित्रण येते. यामध्ये नदी, पर्वत, पशु–पक्षी, वृक्ष–वेली यांचे अनेक संदर्भ येतात. त्याचप्रमाणे प्राणी हा निसर्गातील महत्त्वाचा घटक आहे. अशाप्रकारे 'लिळाचरित्रातून' निसर्गातील प्राणीसृष्टीचे वर्णन येते. त्याचबरोबर 'सह्याद्रीवर्णन' ग्रंथामधून सह्यादी पर्वतासभोवतालचे निसर्गाचे वर्णन येते. 'रिद्धीपूरवर्णन' या ग्रंथातून निसर्गातील विविध घटकांचे दर्शन होते. मराठी साहित्याला आणि समाजमनाला घडविण्याचे सामर्थ्य संताच्या काव्यवाणीला आहे. कारण संताचे काव्य भावना आणि विचार या दोन्ही अंगाने समृद्ध आहे. संत नामदेवांनीही आपल्या अभंगवाणीतून वृक्षाचे महत्त्व विशद केलेले आहे.

'वन' वृक्ष वल्ली ईश्वरासमान।

ऋषि मुनिजन राहाती जेथे।।

होऊनियां पक्षी कामोर कोकिळा।
वेष्टियेले स्थळा ब्रह्माबोधे।।"[10]

संत नामदेव वन, वृक्ष आणि वेली यांना ईश्वरासमान मानतात. तुळशी महात्म्य' सांगून तुळशी या वृक्षाचे महत्त्व विशद करतात. नामदेवाच्या समकालीन असणाऱ्या संत ज्ञानेश्वरांनी आपल्या काव्यातून निसर्गाचा विविध अंगाने वेध घेतलेला आहे. ज्ञानेश्वरांकडे दूरदृष्टी होती. विचार काळाच्यापुढे होते. म्हणून त्यांनी भविष्यात भेडसावणारी पाण्याची समस्या जाणून जल आणि वृक्ष संवर्धनाचे महत्त्व तत्कालीन कालखंडात विशद केले आहे. 'ज्ञानेश्वरी' च्या चौदाव्या अध्यायात जलाशयाचे आणि वृक्षाचे महत्त्व विशद करताना ज्ञानेश्वर म्हणतात –

"नगरेचि रचावी। जलाशये निर्मावी।
महावने लावावी। नानाविधें।।"[11]

पाण्याचे व वृक्षाचे, ढग, पाऊस, नदी, तळे, सरोवर, समुद्र, पक्षीसृष्टी, प्राणीसृष्टी, पृथ्वी, अग्नी, वायू, कृषी, संस्कृती इ. निसर्गातील घटकांचा काव्याच्या माध्यमातून वेध घेतलेला आहे. नैसर्गिक पर्यावरणाची विविध रुपे ज्ञानेश्वरांच्या काव्यसृष्टीत पहायला मिळतात. संत सावता माळी हे शेतकरी असल्याने त्यांनी आपल्या काव्यातून कृषी संस्कृतीचे चित्रण केलेले आहे ते आपल्या काव्यात म्हणतात –

"कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।।
लसून मिरची कोथिंबिरी। अवघा झाला माझा हरी।।"[12]

त्यांनी आपल्या कवितेतून पारंपारिक व्यवसायाला भक्तीची जोड दिली. सावता माळी यांची कविता ग्रामीण संस्कृतींशी शेती, शेतकरी आणि निसर्गाशी नाते जपणारी कविता आहे. याच परंपरेतील महत्त्वाचे संत तुकाराम यांनी आपल्या अभंगात निसर्गप्रेम उत्कटपणे व्यक्त झालेले आहे. निसर्गसृष्टीचे वर्णन करताना तुकाराम म्हणतात –

'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे।
पक्षीही सुस्वरें आळविती।।'[13]

तुकाराम निसर्गाशी एकरुप होतात, त्याचबरोबर स्वतःशी अंतर्मुख होतात. वृक्ष संवर्धनाचे महत्त्व तुकारामांनी सतराव्या शतकातच सांगितले आहे. तुकारामांनी आपल्या अभंग वाणीतून निसर्गाचे प्रतिकूल रुप देखील वर्णन केले आहे. दुष्काळ पडल्यानंतर पर्यावरणात होणाऱ्या बदलांचे वाईट परिणाम होतात याचे देखील वर्णन तुकाराम आपल्या अभंगात करतात. तुकाराम म्हणतात –

'दुष्काळे आटिले द्रव्ये नेला मान।
स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली।।
लज्जा वाटे जीवा त्रासलो या दुःखे।
व्यवसाय देखे तुटी येतां।।'[14]

दुष्काळामुळे मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचे चित्रण तुकारामांनी आपल्या अभंगातून केले आहे. प्राण्यांबद्दलचे प्रेम, अहिंसा वृत्ती, दुष्काळाचे, चित्रण, वृक्ष संवर्धन आदी नैसर्गिक पर्यावरणवादी विचार दिसून येतात. तुकारामांची कविता निसर्गाशी जवळीकता साधणारी आहे.

संत एकनाथ हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संतकवी आहेत. त्यांनी आपल्या अभंगवाणीतून प्राणीमात्रांवर दया करावी, असा संदेश दिला. निसर्गातील विविध प्रतिमांचा वापर एकनाथांनी काव्यात केला आहे. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत रामदास, संत सावतामाळी, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत सोयराबाई, संत सखुबाई, संत बहिणाबाई, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत गोरा कुंभार, संत बंका आदी संतकवींचा नैसर्गिक पर्यावरणाच्या संदर्भात नामोल्लेख करणे महत्त्वाचे ठरते.

एकूणच मध्ययुगीन कालखंडामध्ये निर्माण झालेल्या साहित्यातून निसर्गाचे वर्णन मोठया प्रमाणात येते. महानुभाव साहित्य तसेच नामदेवांपासून ते तुकाराम–रामदासांपर्यंत तसेच पंडिती, शाहिरी कवीपर्यंत सर्वांनीच नैसर्गिक पर्यावरणाचे चित्रण आपापल्या साहित्यातून केलेले आहे.

आधुनिक कालखंडात मराठी साहित्यात काही निवडक साहित्यीकांनी निसर्गविषयक चित्रण आपल्या साहित्यात केले आहे. निसर्गाचा आणि मानवी अनादिकाळापासून ऋणानुबंध आहे. निसर्गाच्या मदती शिवाय मानव स्वतःचे जीवन जगू शकत नाही. म्हणूनच निसर्गाविषयी मानवाला आस्था, प्रेम असलेले दिसते. मराठी साहित्यात निसर्गविषयक चित्रण मोठया प्रमाणात आलेले आहे.

हरी नारायण आपटे यांनी आपल्या 'काळ तर मोठा कठीण आला' (1818) या कथासंग्रहातून तत्कालीन कालखंडात पडलेल्या दुष्काळाचे वर्णन केलेले आहे. दुष्काळामुळे निर्माण झालेल्या विदारक परिस्थितीचे वर्णन यात आलेले आहे. धर्नुधारी यांनी 1903 साली प्रसिद्ध केलेली 'पिराजी पाटील' ही कादंबरी तत्कालीन नैसर्गिक पर्यावरणाचे चित्रण करताना दिसते. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दुष्काळ हा शेतकऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेला होता. दुष्काळाचे प्रभावीपणे चित्रण 'पिराजी पाटील' या कादंबरीतून साकार झालेले आहे. पर्यावरणातील निसर्गाचे उग्र स्वरुप या कादंबरीतून व्यक्त झालेले आहे. कृष्णराव भालेराव यांच्या 'बळीबा पाटील' (1818) या कादंबरीतून दुष्काळात शेतकऱ्यांची होणारी वाताहत दिसून येते. निसर्ग कोपतो आणि त्याचे पडसाद समाजजीवनावर उमटतात. याचे वर्णन 'बळीबा पाटील' मध्ये केलेले आहे.

आधुनिक कालखंडात शेतकरी वर्गाचा कैवार घेणारे महात्मा ज्योतीराव फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्यांचा असुड' (1883) या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या दयनीय परिस्थितीचे वर्णन केलेले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी वर्गाचे मोठया प्रमाणावर हाल होतात याचे वर्णन म. फुलेंनी 'शेतकऱ्यांचा आसुड' मधून केलेले आहे.

केशवसुतांनी निसर्गाचे आपल्या कवितेतून आत्मनिष्ठ वर्णन केलेले आहे. परंतु केशवसुतांची निसर्गविषयक कवितेत मावळत्या संध्येचे वर्णन आहे. या संदर्भात 'वातचक्र' ही उत्कृष्ठ अशी कविता आहे.

''पर्जन्याचे दिवस उलगले

थंडीचेही बरेच गेले .........

गर गर गर गर धरणीपासूनि चढत असे
तो गगनात''[15]

केशवसुतांनी पावसाचे, थंडीचे वर्णन करुन चक्राकार फिरणारा वारा, आकाश, धूल, पक्षी, गवत, काडया, वृक्षाची पाने या निसर्गातील विविध प्रतिमांचा वापर या कवितेत केला आहे. आधुनिक कवीपचकातील निरार्गकवी म्हणून ओळखले जाणारे बालकवी म्हणजे त्र्यंबक बापूजी ठोंबरे होय. जीवन आणि निसर्ग यांच्यातील अव्दैत त्यांच्या कवितेतून शब्दाशब्दातून जाणवते. निसर्ग हा बालकवींच्या 'संध्यारजनी', 'फुलराणी', 'औदुंबर', 'निर्झरास', 'बालविहग', 'श्रावणमास', 'अरुण' यासारख्या कवितांच्या रुपातून साकार झालेला आहे. बालकवींच्या या कवितेत निसर्गातील विविध रुपातील प्रतिमा दिसतात. या कवितेतील निसर्गचित्रे ही प्रसन्नतेची निदर्शक ठरतात. हिरवळ, टेकडी, शेतमळे, कुरणे, झरा, बेट, पायवाट, काळा डोह, औदुंबर, वृक्ष इ. निसर्गचित्रे या काव्यात आलेली आहेत. एकंदरीतच नैसर्गिक पर्यावरणाच्या संदर्भात आधुनिक मराठी साहित्यांत झालेले लेखन हे तत्कालीन समाजाचे वास्तव चित्रण आहे. महात्मा फुले, हरी नारायण आपटे, धनुर्धारी, केशवसुत, बालकवी यासारख्या लेखक कवी मनातून पर्यावरणीय चित्रण साकारते. यामध्ये वास्तवाची जोड तर दिसतेच त्याचबरोबर कवीमनाचा कल्पनाविलासही दिसून येतो. निसर्गाचे विदारक, दाहक आणि मनोहारी असे दोन्ही स्वरुपाचे रुप पहायला मिळते.

अलिकडच्या काळातील ना.धो. महानोर, विठ्ठल वाघ, प्रतिमा इंगोले, आनंद यादव, शंकर पाटील, रा.रं. बोराडे, मारुती चित्तमपल्ली इ. लेखकांनी पर्यावरणाशी संबधीत बरेच लेखन केलेले आहे. विठ्ठल वाघ यांनी–

काळया मातीत मातीत, तिफन चालते ..... इ. कवितेतून ग्रामीण संस्कृतीचा गोडवा गायला आहे. तर कवी विठ्ठल वाघ यांनी ग्रामीण निसर्ग जीवनव्यवहाराचे चित्रण आपल्या काव्यात केलेले आहे.

आखाडीले जारे माहा माहेर पंढरी .......

या दोन्ही कवींच्या निसर्गाचे चित्रण आढळते. लेखक शंकर पाटील, शं.रं. बोराडे, आनंद यादव यांनी आपल्या ग्रामीण कथेत ग्रामीण निसर्ग, पशु–पक्षी, प्राणी यांची दुष्काळामुळे होणारी आबाळ आणि शेतीची होणारी दुरावस्था आपल्या कथेत मांडली आहे. ग्रामीण भागातले वास्तव चित्रण असले तरी ग्रामीण पर्यावरणाचा होणारा ऱ्हास आणि त्याला कारणीभूत व्यवस्था याचे चित्रण या साहित्यीकांनी आपल्या कथेत केलेले आहे. मारुती चित्तमपल्ली यांच्या निसर्गकथा या पर्यावरणाशी जवळ जाणाऱ्या कथा आहेत. सदानंद देशमुख यांच्या 'तहान', 'बारोमास' या कादंबरीतही पर्यावरणाशी संबंधीत पाण्याच्या दुर्भिक्षेचे चित्रण आलेले आहे. अलिकडच्या काळातील इंद्रजीत भालेराव, राजन गवस, रविंद्र शोभणे इ. साहित्यकारांनी पर्यावरणाशी संबंधीत समस्येचे चित्रण त्यांच्या साहित्यात केलेले आहे.

पर्यावरणात पृथ्वीवरील सर्वच सामाजिक, सांस्कृतिक, नैसर्गिक घटकांचा अभ्यास केला जातो. त्यामुळे पर्यावरणाचा व सामाजिक, नैसर्गिक शास्त्रांचा जवळचा संबंध येतो.

कोणत्याही शास्त्राचे स्वरुप नेहमीच परिवर्तनशील असते. त्या शास्त्रात गतिमानता असते. पर्यावरण हे केवळ एकटया मानवासाठी नाही; तर ते सर्वच प्राणी, पक्षी, वनस्पती यांच्यासाठीही आहे. मनुष्य आपल्या स्वार्थापोटी निसर्गातील साधन–संपत्तीचा दुरुपयोग करीत आहे. त्यामुळे निसर्गातील असंतुलनाचे परिणाम मानवाला भोगावे लागत आहे. मनुष्याच्या ऱ्हासाला मनुष्यच कसा कारणीभूत आहे हे निसर्ग जेव्हा दाखवून देतो. तेव्हा त्याचे पडसाद इतर क्षेत्राप्रमाणेच साहित्यातही पडताना दिसतात. त्यामुळे साहित्याच्या माध्यमातून निसर्गाच्या बिघडत जाणाऱ्या परिस्थितीला मानव कसा कारणीभूत आहे आणि त्याने आता कसे जागृत झाले पाहिजे हे साहित्याव्दारे समाजापूढे मांडून समाजजागृती करता येते. साहित्याद्वारे समाजावर जसे संस्कार केले जातात तसेच पर्यावरण जागृती सुद्धा करता येऊ शकते. साहित्याने जर पर्यावरणाचा विचार करुन आपली लेखनी हातात घेतली तर पर्यावरण विषयक अनेक प्रश्न मार्गी लागून समाजातील आमचा भयावह असा पर्यावरण असंतुलनाचा भस्मासुर आपल्याला दुर सारता येईल अशी आशा बाळगायला हरकत नाही. त्यासाठी साहित्यीकाने या प्रश्नाकडे डोळसपणे पाहणे गरजेचे आहे. मानवानेच निर्माण केलेल्या समस्यांवर मानवानेच उपाय शोधून निसर्ग समृद्धी घडवून आणणे आवश्यक झाले आहे.

## संदर्भ ग्रंथ


1) प्रा. सप्तर्षी, मोरे, उगले – 'भूगोल आणि नैसर्गिक आपत्ती', डायमंड प्रकाशन, पुणे 2009 पृ.क्र. 2

2) तत्रैव पृ.क्र. 2

3) तत्रैव पृ.क्र. 2

4) डॉ. खंदारे उशा – 'संवर्धन पर्यावरणाचे', कोमल प्रकाशन, ठाणे 2009 पृ.क्र. 2

5) प्रा. जाधव रा.ग. – 'पर्यावरण प्रबोधन आणि साहित्य', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे 1996 पृ.क्र. 12

6) तत्रैव पृ.क्र. 12, 13

7) तत्रैव पृ.क्र. 21

8) तत्रैव पृ.क्र. 50

9) प्रा. सप्तर्षी, मोरे, उगले – 'भूगोल आणि नैसर्गिक आपत्ती', डायमंड प्रकाशन, पुणे 2009 पृ.क्र. 1

10) संत नामदेव – श्री नामदेवाची गाथा, गीताप्रेस, गोरखपूर, दहावी आवृत्ती पृ.क्र. 158

11) संत ज्ञानेश्वर – 'ज्ञानेश्वरी', गीताप्रेस, गोरखपूर, प्रथम आवृत्ती पृ.क्र. 313

12) डॉ. केजकर प्रकाश – संत कविता एक दृष्टीकोन, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, 2006 पृ.क्र. 159

13) संत तुकाराम – सार्थ श्री तुकाराम गाथा, शारदा साहित्य, पुणे 1999 पृ.क्र. 379, 380

14) संत तुकाराम – श्री तुकाराम महाराजांची गाथा, गीताप्रेस, गोरखपूर, चौथी आवृत्ती पृ.क्र. 145

15) खांडेकर वि.स. – केशवसुत काव्य आणि कला, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे 2001 तृतीया आवृत्ती, पृ.क्र. 148

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625

E-ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

August 2020

Special Issue 252




**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar.
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts, Science & Commerce College,
Harsul, Dist - Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 29 | वाल्मीकि रामायण में न्याय एवं दण्ड - व्यवस्था | पंकज देवी | 144 |
| 30 | सावधान ! नीचे आग है' उपन्यास में जीवन मूल्य संक्रमण | डॉ. अशोक तायडे | 148 |
| 31 | संत तुकाराम के अभंगो की प्रासंगिकता | डॉ. बलीराम भुक्तरे | 150 |
| 32 | आदिवासींच्या अस्तित्वाचा संघर्ष | डॉ. अंजली मस्करेन्हस | 154 |
| 33 | बांबूरांझी चरातून पर्यावरण संवर्धनात्मक शाश्वत विकास | डॉ.कुंदन दुफारे, डॉ. वीणा जंबेवार | 158 |
| 34 | नागरिकत्व सुधारणा (दुरुस्ती) कायद्याचे राजकीयीकरण राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेतील अडथळा | प्रा.एकनाथ खरात | 161 |
| 35 | मराठी राजकीय कादंबरीचे संकल्पनात्मक स्वरूप | श्री. गिरीधर काचोळे | 172 |
| 36 | महिला खेळाडूंना प्रशिक्षण व क्रीडा स्पर्धा दरम्यान साहित्य व सुविधांच्या समस्यांचे अध्ययन | डॉ. वंदना इंगळे, डॉ. ललिता पुन्नय्या | 180 |
| 37 | आद्य आदिवासी सेवक : ठक्कर बाप्पा | डॉ. भास्कर शेळके | 182 |
| 38 | पोवारी बोली – एक गौरव | डॉ. रामलाल चौधरी | 185 |
| 39 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक क्षेत्रातील योगदान | डॉ. माधुरी देवतळे | 190 |
| 40 | शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी योग | प्रा. भाऊसाहेब थोरात | 193 |
| 41 | शाहीर परशराम यांच्या काव्याचा जनमानसावरील प्रभाव | डॉ. संदीप सांगळे | 197 |
| 42 | ऑनलाईन शिक्षण | डॉ. सुनंदा देशपांडे | 203 |
| 43 | लोकहितवादी यांचा स्त्री सुधारणा विषयक विचार | प्रा. गणपती मोरे | 207 |
| 44 | लोकसाहित्यातील समाजदर्शन | प्रा. संदीप कोरडे | 209 |
| 45 | ज्ञानेश्वरीतील 'प्रकाश' प्रतिमा | डॉ. सौ. अलका इंदापवार | 213 |
| 46 | प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या वर्तनविषयक समस्यांचे अध्ययन (लाखनी तालुका) | डॉ. सौ. अनिता दाणी | 218 |
| 47 | माध्यम निर्मित समाज बदलासाठी बुद्ध तत्वज्ञानाची गरज : एक विश्लेषणात्मक अध्ययन | डॉ. विनोद निताळे, डॉ. सुधीर भटकर | 221 |
| 48 | जळगांव जिल्ह्यातील घटते स्त्री-पुरुष प्रमाण - रावेर तालुक्याचा क्षेत्रीय अभ्यास | डॉ. सुरेश ढाके | 229 |
| 49 | 'लोकसंस्कृती' संकल्पना | डॉ.संतोष चतुर | 234 |
| 50 | आदिवासींच्या आर्थिक समस्या | डॉ. बी. व्ही. गव्हाळे | 238 |
| 51 | मंगेश पाडगावकर यांचे काव्यलेखन | डॉ. उज्ज्वला देवरे | 246 |
| 52 | हिंदी कलात्मक चित्रपट : एक आकलन | डॉ. सुहास पाठक | 251 |
| 53 | काश्मीर प्रश्न व पाकिस्तानची वास्तविकता | डॉ. माधुरी देवतळे | 257 |
| 54 | लालन सारंग यांच्या 'जगले जशी' या आत्मचरित्रातून व्यक्त होणारा स्त्रीवाद | प्रा. अमृता डोरलीकर | 261 |
| 55 | सावित्रीबाई फुले : एक तेजस्वी तारा | डॉ. प्रेमा लेकुरवाळे | 268 |
| 56 | मारुती चितमपल्ली यांच्या साहित्यातील निसर्ग | डॉ. शकुंतला भारंबे | 272 |
| 57 | प्रसार माध्यमांची भाषाशैली : एक अभ्यास | डॉ. सुहास पाठक | 275 |
| 58 | पालक - बालक संबंधात भावना व्यवस्थापनाचे महत्त्व | डॉ. सौ. अनिता दाणी | 280 |
| 59 | भारतीय शेती : समस्या आणि उपाययोजना | डॉ. मेघा सावरकर | 283 |
| 60 | महिला लोकप्रतिनिधींचा राजकीय सभांमधील सहभाग (कर्जत तालुका) : एक विशेष अभ्यास | डॉ. चंद्रकांत गोंधळी | 288 |
| 61 | माहिती तंत्रज्ञान : मराठी अध्यापनामध्ये वापर | डॉ. ज्योती माने | 293 |
| 62 | बहुआयामी व्यक्तिमत्त्व : डॉ. वसंतराव नाईक | डॉ. गायत्री गाडेकर | 297 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 252
Peer Reviewed Journal

E-ISSN : 2348-7143
August 2020

# लालन सारंग यांच्या 'जगले जशी' या आत्मचरित्रातून व्यक्त होणारा स्त्रीवाद

प्रा. अमृता डोरलीकर
डॉ.मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. महा. नागपूर.
भ्रमणध्वनी : ९३२६२३४२८२
cmpamruta1234@gmail.com

**प्रस्तावना**

स्त्रियांची आत्मचरित्रे ही पुरूषांच्या आत्मचरित्रापेक्षाही वाचनीय झालेली आहेत. विविध क्षेत्रात काम करणाऱ्या यशस्वी स्त्रियांनी आपली आत्मचरित्रे लिहिली. राजकारण, समाजकारण, कलाक्षेत्र, सिनेक्षेत्र इ. यासर्व क्षेत्रात स्त्रियांनी आपली यशस्वीपणे कारकीर्द घडविली आहे. यासर्व क्षेत्रापैकी सिने नाटय क्षेत्राने आपले वेगळे स्थान समाजात निर्माण केले आहे. या क्षेत्रात अनेक अभिनेते अभिनेत्री यशस्वी झालेले आहेत. १९८० ते २००० या कालखंडात प्रसिद्ध झालेल्या आत्मचरित्रापैकी लालन सारंग यांचे आत्मचरित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे असे म्हणता येते कारण १९७५ हे आंतरराष्ट्रीय 'स्त्रीवर्ष' म्हणून जाहीर झाले त्या कालखंडात तटस्थपणे एक स्त्री म्हणून स्वत:ला वाटणाऱ्या स्त्रीवादी स्वतंत्र विचारांना वाट मोकळी करून दिलेली आहे. तत्पूर्वी 'स्त्रीवाद' म्हणजे काय याची थोडक्यात संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

**'स्त्रीवाद' म्हणजे काय ?**

स्त्रीच्या वेदना फार प्राचीन काळापासून साहित्यातून व्यक्त झालेल्या आहेत. लोकगीते, ओवी, म्हणी, यातून त्यांची साक्ष मिळते. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांची पूजा बांधली पण तिच्या दुय्यम जाणीवा समजून घेतल्या नाहीत. कुटूंबातील तिचे स्थान दुय्यम राहिले स्त्रीवादाविषयी बोलताना उषा देशमुख म्हणतात, "स्त्रीवाद म्हणजे इतरांवर अधिकार गाजविणे नव्हे तर स्त्रीप्रश्नासंबंधी समाजात एक व्यापक दृष्टिकोन निर्माण करून त्यानुसार समाजाचे पुनर्निर्माण करणे हे खरे स्त्रीवादाचे ध्येय धोरण आहे".[१]

स्त्रीवादाच्या संदर्भात मंगला वरखेडे म्हणतात, "स्त्रीवाद म्हणजे पुरुषाच्या बरोबरीने स्त्रियांना कायदेविषयक, राजकीय, सामाजिक, आर्थिक इ. सर्व क्षेत्रात बरोबरीचे स्थान दर्जा हवा या विचारसरणीचा संप्रदाय"[२]

स्त्रीवादाचा सुसूत्र प्रारंभ करून देणारा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे सिमॉन द बोव्हा यांचा 'द सेकंड सेक्स' (१९४९) हा ग्रंथ होय स्त्रियांच्या दमनाचे सर्वांगीण भान देणारा हा ग्रंथ आहे. निसर्ग निर्मित स्त्री आणि पुरुष या दोन भेदांचा उपयोग करून पुरुषप्रधान समाज व्यवस्थेने स्त्रीला किती पातळ्यांवर कमी लेखले आहे हे या ग्रंथात विविध उदाहरणांनी स्पष्ट केले आहे. "स्त्री ही जन्माने स्त्री नसते तर तिला तशी घडविली जाते"[३] हे या ग्रंथात विस्ताराने स्पष्ट केलेले आहे. मानवी मादी जे रुप समाजात प्रदर्शित करते ते जीवशास्त्र, मानसशास्त्र अथवा आर्थिकतेने नियत केलेले नसून संपूर्ण समाज व्यवस्थेने त्या रुपाची निमिती केलेली असते हे या ग्रंथात विस्तारित रूपात मांडण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येते की, आधुनिक काळ व त्या काळची बदलणारी मूल्ये आणि समाजजीवन यात वावरणारी नवीन स्त्री स्त्रीवादी साहित्यातून दिसू लागली. स्त्री कडे एक 'व्यक्ती' म्हणून समाजाने बघावे एक 'माणूस' म्हणून तिचे मन समजून घ्यावेत, तिचे विचार तिच्या भावना समजून घ्याव्यात असा दृष्टीकोन या स्त्रीवादी साहित्यातून मांडण्यात आला. स्त्री–पुरुषांचे मुलभूत मानवी संबंध

हे कोणत्याही गरजेवर आधारित नसावेत तर ते व्यक्ती–व्यक्तीमधील आत्मीयतेवर आधारलेले असावेत असाही एक नवीन दृष्टीकोन या स्त्रीवादी साहित्यातून दिसून येते.

अश्विनी धोंगडे यांच्यामते, ''स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्वतःचा सवतासुभा निर्माण करणे नव्हे तर संस्कृतीच्या हजारो वर्षांच्या इतिहासाने बाईचे मानवपण नाकारून तिला पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली त्यातून बाहेर पडून, आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे''[4]ज्या वेळी स्त्री मोकळेपणाने श्वास घेवून पुरुषा इतके जीवन जगू शकेल त्यावेळी स्त्रीवाद खऱ्या अर्थाने व्यक्त झाला असे म्हणता येईल. केला एकंदरीत स्वाभिमान, आत्मगौरव, यशाची इच्छा, नैपुण्य, आत्मविश्वास, स्वातंत्र्य, स्वावलंबन यासंदर्भात स्त्रीच्या नैसर्गिक इच्छांचा झालेला कोंडमारा या विरुद्ध विद्रोह करणारी विचार प्रणाली म्हणजे 'स्त्रीवाद' होय.

मराठी साहित्यातून आविष्कृत होणारा स्त्रीवादाचा विचार करता स्त्रियांनी केलेले लेखन त्यातही स्त्रियांची आत्मचरित्रे ही आवडीने वाचली जातात.यात अभिनेत्रींच्या आत्मचरित्रांना विशेष पसंती आहे. मराठी सिनेमा सृष्टीतील अनेक कलावंतानी आत्मचरित्र लिहिलेले आहे. यामध्ये अभिनेते–अभिनेत्री, गायक, गायिका, गीतकार संगीतकार, दिग्दर्शक आणि अभिनेते गोविंदराव टेंबे यांनी सन १९३९ साली लिहिलेले 'माझा संगीत व्यासंग' हे मराठी सिनेमा सृष्टीतील कलावंताचे पहिले आत्मचरित्र आहे. त्यांनीच १९४८ साली लिहिलेले 'माझा जीवन विहार' हे दुसरे आत्मचरित्र लिहिले. १९४० मध्ये लिहिलेले 'जाऊ मी सिनेमात' हे मराठी सिनेमासृष्टीतील स्त्री कलावंताचे पहिले आत्मचरित्र आहे. १९७० मध्ये हंसा वाडकर यांचे 'सांगते ऐका' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. त्यानंतर 'स्नेहांकिता' हे स्नेहप्रभा प्रधान यांचे १९७३ मध्ये प्रसिद्ध झाले १९८१ मध्ये 'चंदेरी दुनियेत' हे लीला चिटणीस यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले १९८२मध्ये 'मी दुर्गा खोटे' हे दुर्गा खोटे यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. १९८६ मध्ये प्रकाशित झालेले 'अशी मी जयश्री' जयश्री गडकर यांचे आत्मचरित्र तसेच १९८९ मध्ये 'उषःकाल' हे उषा किरण यांचे आत्मचरित्र, १९९० मध्ये 'कशाला उद्याची बात' हे शांता हुबळीकरांचे आत्मचरित्र 'जगले जशी' हे लालन सारंग यांचे १९९२ मध्ये प्रकाशित झालेले आत्मचरित्र 'बाई मी भाग्याची'हे १९९३ मध्ये प्रकाशित झालेले ललिता जोगळेकर यांचे आत्मचरित्र, 'माझी जीवनयात्रा' हे १९९६ मध्ये प्रकाषित झालेले लीला पेंढारकर यांचे आत्मचरित्र ,१९९८ मध्ये प्रकाशित झालेले 'तुमची ज्योत्स्ना भोळे' हे ज्योत्स्ना भोळे यांचे आत्मचरित्र', सीमा देव यांचे 'सुवासिनी' हे आत्मचरित्र इ. सर्व सिनेक्षेत्रातील आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली. ''कलावंताच्या आत्मचरित्रातून त्यांची कलाविषयक भूमिका, जीवनविषयक दृष्टी, मानवी मनाचा वेध घेण्याचा त्यांचा आवाका, आशयाभिव्यक्ती करताना त्यांच्या ठिकाणी असलेली कल्पनाशक्ती, तत्कालीन राजकीय व सामाजिक स्थितीचे या कलावंताच्या ठिकाणी असलेले भान इ. अनेक गोष्टीचा आपल्याला वेध घेता येतो यादृष्टीने अभिनेत्या कलावंताची ही आत्मचरित्रे अभ्यासकांसाठी एक चांगली उपलब्धी आहे''[5] यावरून कलावंताच्या आत्मचरित्राच्या अभ्यासाचे महत्व स्पष्ट होते नातलगांचा आग्रह, पतीची इच्छा, कुटूंबाची बिघडलेली आर्थिक स्थिती इ. कारणाने त्यांनी हे क्षेत्र निवडलेले आहे असे त्यांच्या आत्मचरित्रातून प्रत्ययास येते.

मराठी साहित्यात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचा अभ्यास वेगवेगळया संदर्भात महत्त्वपूर्ण असा आहे .आत्मकथनपर लेखनाला इंग्रजांच्या काळापासून प्रारंभ झाला असला तरी स्त्रियांची स्वतःला व्यक्त करण्यासाठीची मौखिक परंपराही दिसते १९१० मध्ये 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' या रमाबाई रानडे यांच्या आत्मकथनपर लेखनाला सुरूवात झाली पतीनिष्ठा स्वातंत्रपूर्व काळातील आत्मचरित्रांमध्ये दिसून येते

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रियांच्या आत्मचरित्रात तटस्थता, प्रांजळ निवेदन, सत्यकथनावर भर दिला जाऊ लागला. १९७५ ते आजतागायत स्त्री कलावंतानी आत्मचरित्रात भर घातली. स्त्री चे स्वतंत्र अस्तित्व,कौटुंबीक स्थान, सामाजिक स्थान ,राजकीय स्थान, निर्माण झाले यातून तिचा पतीकडे, कुटूंबाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. व्यक्ती म्हणून जगण्याचे अधिकार स्त्रिला प्राप्त झाले. सर्वच क्षेत्रात अग्रेसर ठरल्याने तिच्या कार्याचे प्रतिबिंब आत्मचरित्रात उमटते.

कलावंताच्या आत्मचरित्राची संख्या बरीच आहे. कारण याचे आकर्षण सर्व समाजाला नेहमीच राहिले आहे. यातील कलावंत लोकप्रिय असल्याने त्यांच्या जीवनाबद्दल सर्वसामान्यांना कुतूहल असते. त्यामुळे ही आत्मचरित्रे लोकप्रिय झालेली दिसतात.

प्रस्तुत शोध निबंधात 'जगले जशी' या लालन सारंग यांच्या आत्मचरित्राचा स्त्रीवादी अंगाने अभ्यास करण्याच्या दृष्टीने परामर्श घेण्यात आलेला आहे.

'जगले जशी' हे मराठी नाट्यसृष्टी आणि चित्रपटसृष्टीतील प्रतिभासंपन्न अभिनेत्री लालन सारंग यांचे आत्मचरित्र पुर्वाश्रमीच्या लालन पैंगणकर मुळचे गोव्यातील असल्या तरी मुंबईत लॅमिंग्टन रोडवर त्यांचे घर होते. मुंबईत सात भावंड आणि वडिलांचा लॉंड्रींचा व्यवसाय त्यामुळे तुटपुंज्या मिळकतीत त्यांना घर चालवावे लागायचे म्हणून लालन सारंग यांनी मेहनतीने शिष्यवृत्ती मिळवून शिक्षण पूर्ण केला. अठरा वर्ष पूर्ण होण्याआधीच केवळ आर्थिक गरजेपोटी घडयाळाच्या दुकानामध्ये 'टायपिस्ट' म्हणून नौकरी करतात. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच स्पर्धात्मक नाटकाच्या निमित्ताने त्यांचा कमलाकर सारंग यांच्याशी परिचय झाल्यानंतर त्यांच्याशी विवाहबद्ध होवून कौटूंबीक जीवनाची वाटचाल सुरू झाली. मुंबईतील जागेचा प्रश्न, संसारातील रुसवे–फुगवे, गृहिणी म्हणून पार पाडावी लागणारी जबाबदारी आणि नाटकांचे प्रयोग सांभाळताना करावी लागणारी कसरत आणि पती कमलाकर सारंग यांच्या स्वभावाची वैशिष्टये यांचे वर्णन त्यांनी आपल्या आत्मचरित्रात केले आहे. कलाक्षेत्रात पुरुषांपेक्षा स्त्रियांना प्रापंचिक जबाबदाऱ्या सांभाळून याक्षेत्रात स्वत:चे स्थान मिळविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. याचे वास्तव चित्रणही त्यांनी आत्मचरित्रात केले आहे. एकदरीत 'जगले जशी' या आत्मचरित्रामध्ये लालन सारंग यांनी आपल्या वीस–पंचवीस वर्षाच्या कलाक्षेत्रातील कारकिर्दीचा आढावा घेतला आहे तसेच कौटूंबीक जीवनातले बरे–वाईट अनुभवही त्यांनी सांगितले आहेत.

लग्ना नंतर एक उत्तम कलावंत म्हणून त्या प्रसिद्ध तर झाल्याच परंतु एक कुशल गृहिणी बनण्याचा आटोकाट प्रयत्नही त्या करताना दिसतात. लेखिका तापट प्रसंगी चिडचिड करणारी आणि स्पष्टवक्ती स्वभावाची होती तर त्यांच्या पतीचा स्वभाव शांत आणि संयमी क्षमाशील होता कुठल्या कारणाने त्यांना राग आलाच तर ते टोकाची भूमिका घेत दोघांमध्ये ही परस्पराविषयी प्रेम, निष्ठा, विश्वास त्यांच्या आत्मकथनातून दिसून येतो. नाट्यसृष्टी सोबतच सिनेसृष्टीतही त्यांनी यशस्वी कारकीर्द पार पाडली. अभिनयाची उपजत जाण कलेविषयीची असलेली आवड तसेच कुटुंबाविषयी असलेली तितकीच आपुलकी त्यांच्या आत्मकथनात दिसून येते असेच एका प्रसंगाचे वर्णन त्या करतात कमलाकर सारंग यांच्या धाकट्या बहिणीच्या लग्नाचा मुहर्त व नाटकाचा प्रयोग सांभाळताना कराव्या लागणाऱ्या कसरतीविषयी त्या म्हणतात ''कन्यादान करताना माझं सारं लक्ष सारखं घड्याळाकड होतं साडे आठ वाजताचा प्रयोग करू शकणार की नाही या काळजीत मी: दोन्ही गोष्टी माझ्या दृष्टीने तेवढ्याच महत्वाच्या एका बाजूला कर्तव्य तर दुसऱ्या बाजुला कला व्यवसाय''[६] लेखिकेला कला व्यवसायात जितकी गोडी तितकीच कुटंबाविषयी देखील जिव्हाळा असलेला दिसून येते. दोन्ही आघाड्यांवर काम करणे त्यांना मनापासून आवडत असल्याचे त्या आवर्जुन सांगतात. नातेसंबंध सांभाळण्यालाही त्या महत्त्व देताना

E-ISSN : 2348-7143
August 2020

दिसतात. कर्तव्य आणि व्यवसाय यात त्यांनी कधी तडजोड केली नाही लेखिकेने साकारलेल्या नाटकातील विविध भूमिकांमुळे लेखिकेचे 'स्व' त्व भान जागे झाले. वैचारिकदृष्ट्या त्यामुळे त्यांना प्रगल्भता प्राप्त झाली. जीवन आणि स्त्रीप्रश्न याकडे पाहण्याची एक नवी दृष्टी त्यांना प्राप्त झाली त्यांच्या व्यक्तिमत्त्वात त्यामुळे अधिकच भर पडत गेली सामाजिक प्रश्नाचे भान त्यांना आले.

लेखिका सर्वसामान्य कुटुंबातील असल्यामुळे शिक्षणासाठी अर्थार्जन करणारी कष्टाचे मोल जाणणारी अशी सक्षम स्त्री आहे. विवाहानंतर अभिनय क्षेत्रात काम करताना 'कुटूंबा' ला प्राथमिकता देतात. त्यामुळे अभिनय क्षेत्रात कितीही धावपळ झाली तरी त्याबद्दल त्या सबबी सांगत नाही दोन्हीमध्ये संतुलन साधण्याचा त्या प्रयत्न करतात. ही तारेवरची कसरत करतानाच स्वतःच्या चारित्र्याशी तडजोड करीत नाही. व्यावसायिक व कौटूंबीक जीवन दोन्ही पातळयांवर यशस्वी झालेली अभिनेत्री कलाक्षेत्रातील एक मेहनती व संवेदनशील, सतत धडपड करणारी स्त्री, एक जबाबदार सहचारिणी आपल्या डोळयासमोर उभी राहते. नाट्यक्षेत्रात काम करताना 'सखाराम बाईंडर' या नाटकातील 'चंपा' ची भूमिका 'चक्र' मधील 'ती' आणि 'कमला' मधील 'सरिता' या भूमिका म्हणजे त्या अभिनयात किती मुरलेल्या आहेत. याची साक्ष देतात यासर्व भूमिका साकारताना त्यांनी जे निरीक्षण केले त्याच्या आधारे या भूमिकेचे अभ्यासपूर्ण विश्लेषणही त्यांनी या आत्मचरित्रात केले आहे.

लालन सारंग यांनी काही वृत्तपत्रामधून, मासिकांमधून लेखन केले आहे. त्यामुळे त्यांना लेखनाची चांगली जाण आहे. हे त्यांच्या लेखनातून दिसून येते त्यांच्या निवेदन शैलीत साधेपणा आहे. स्वतःविषयी, कुटूंबाविषयी, पतीविषयी, स्वतःच्या कलाप्रवासाविषयी निवेदन करतात, साध्या सोप्या प्रसंगवर्णनातूनही त्यांनी आपले जीवनदर्शन वाचकांना घडविले आहे. उदा – 'त्यावेळी पार्ल्यात राहत होतो माझा मुलगा राकेश माझ्या आईकडे लॅमिंग्टन रोडवर असायचा त्याला भेटायला रोज जातच असे''[७] किंवा 'आमच्या दोन संस्था' कलारंग आणि अभिषेक कलारंग तर्फे आम्ही अगदी प्रायोगिक नव्हे. पण नव्या स्वरूपाची, वैचारिक, थोडक्यात तद्दन धंदेवाईक असा शिक्का मारता येणार नाही अशी नाटके करत होतो''[८] वरील वाक्यातून लालन सारंग यांच्या स्वभावातील साधेपणा त्यांच्या भाषेतही उतरलेला दिसून येतो. छोटी छोटी वाक्यांची रचना, सोपे शब्द ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ठये त्यांच्या आत्मकथनातून दिसून येतात. त्यांच्या भाषेत कलात्मकता व लालित्यही आढळून येते. तसेच काही प्रसंगावर त्या भाष्यही करतात. उदा. ''आज आपली समाज रचना, आपल्या मनावर वर्शानुवर्षे झालेले पारंपारिक संस्कार यात स्त्रीचे स्थान काय ? तिच्या स्वातंत्र्यांची मर्यादा किती ? बरोबरीने शिक्षण घेणे, नौकरी करणे अनेक कार्यात खांद्याला खांद्या लावून वावरणे म्हणजे स्वतंत्र होणे आहे का ?''[९] इ. वाक्यातून त्यांनी चिंतनशीलता दिसून येते. स्त्रियांचे प्रश्न, समस्या यावर त्या समर्थपणे भाष्य करताना दिसतात.

लालन सारंग यांनी कलावंत म्हणून काम करीत असताना पती कमलाकर सारंग यांच्यापेक्षा दोन पावले पुढेच राहून त्यांनी आपल्या कलाक्षेत्रा बरोबरच कौटूंबीक जीवनही घडवले असे त्यांचे आत्मकथन वाचताना प्रकर्षाने जाणवत राहते. नाटकामध्ये काम करीत असताना नाटकातून प्रत्येक भूमिका हा आपल्याच प्रत्यक्ष जीवनाची अवस्था आहे. असे त्याना वाटते आणि ते त्यांनी लेखणीतून समर्थपणे मांडलेलेही आहे. अर्थपूर्ण, संवेदनशील, म्हणवणाऱ्या स्वतः स्त्रीलाही न जाणवलेली स्त्रीची व्यथा ही तेंडूलकरांनी आपल्या नाटकातून मांडली याबद्दल त्यांना दादच द्यायला हवी असे मत लेखिका व्यक्त करतात. आणि ते त्यांनी लेखणीतून समर्थपणे मांडलेलेही आहे. लालन सारंग यांनी नाटकातून ज्या विविध स्त्री व्यक्तीरेखा केल्या त्या करीत असताना स्त्री जातीचेच रूप या भूमिकांतून अनुभवतात आणि अस्वस्थ होतात. ''एकंदर भारतीय स्त्रीची व्यथा मला जाणवू लागली'' म्हणून कबुलही करतात आणि म्हणूनच आपली व्यथा, तक्रार ही अनियंत्रित अशा पुरुषी

सत्तेतूनच निर्माण झाली असे त्यांना वाटते लेखिका आणि त्यांचे पती दोघेही दमून भागून घरी येतात पण पती आरामशीर बसतो आपण मात्र कामाला लागतो. ती पण थकलेली असेल, मदत करायला पाहिजे हे त्याच्या लक्षातच येत नाही. सांगितल्यावर ऐकतो एवढीच जमेची बाजू समाजामध्ये स्त्री–पुरुष ही संसाररूपी रथाची दोन चाके असल्यामुळे दोघांनाही यागोष्टीची जाणीव हवी. पुरुष व्यवस्था टिकून ठेवायला स्त्री मनावर पिढ्यान् पिढ्या केले गेलेले संस्कार कारणीभूत आहे याचे भान येणे ही स्त्री मनाची मानवी जाणीव आहे यातून तिने स्वतःला आणि पुरुषालाही बाहेर आणायला हवे असा विचारही लालन सारंग व्यक्त करतात.

लालन सारंग यांच्या आत्मकथनातून व्यक्त होणारी आधुनिकता म्हणजे त्यांच्या व्यवसायात त्या ठामपणे आपल्या स्वयंपूर्ण व्यक्तिमत्त्वानिशी उभ्या आहेत त्यांनी स्वतःचे स्थान स्वतःचे विश्व पूर्णपणे स्वकर्तृत्वावर उभे केले आहे. तसेच तटस्थपणे आत्मकथनामध्ये स्वतःचा आत्मशोध त्यांनी घेतलेला आहे. प्रापंचिक जबाबदारी सोबत कलाक्षेत्र सांभाळत असताना त्यांनी ज्या विविध भूमिका केल्या. त्या समाज वास्तव मांडणाऱ्या होत्या. त्या भूमिका करता करताच पात्रामध्येच त्या कशा एकरूप झाल्या याचे वर्णनही आत्मकथनात वाचण्यासारखे आहे.

एक स्त्री आत्मचरित्रकार म्हणून आपल्या क्षेत्रातले अनुभव मांडताना त्यांनी स्वतःचा आत्मशोधच त्यातून घेतलेला दिसतो त्यांचा स्वभावातला स्पष्टवक्तेपणा त्यांच्या नाट्यक्षेत्रातील भूमिकांमधूनही दिसून येतो. नाटकात काम करताना जी विविध स्त्री पात्रे त्या रंगवतात त्या भूमिकेत त्या एकरूप होतात आणि नकळतपण समाजातील शोषित, पिडीत असलेल्या स्त्रियाचे जगणेच जणू आपण या पात्राद्वारे जगतो आहे असे त्यांना वाटायला लागते. पुरुष चौकट मोडून त्याच्या बाहेर स्त्रीने पडायला पाहिजे असे त्यांना वाटते समाजातल्या सगळ्याच स्तरातील स्त्रियांविषयी त्यांना कळवळा आहे. नाटकातल्या स्त्री भूमिका म्हणजे आपल्या आजूबाजूच्या अन्यायग्रस्त स्त्रिया आहे असे त्यांना वाटते म्हणून प्रत्येक स्त्री ने व्यक्ती म्हणून स्वतःचा विचार करायला हवा. त्याशिवाय तिची प्रगती होऊ शकत नाही असे त्यांना वाटते. त्यांनी रंगविलेल्या नाटकातील काही स्त्री व्यक्तीरेखांवर टिकाही झाली पण ते प्रसंगही अत्यंत संयमीपणे त्यांनी हाताळलेते दिसतात. या सगळ्यांचे वर्णनही त्यांनी अत्यंत संयमशीलपणे केलेले आहे. त्यांच्या प्रापंचिक जीवनातली जी उदाहरणे त्यांनी दिली आहे ती प्रातिनिधीक आहे. स्त्री ची ओढाताण, दमने पुरुषाच्या लक्षातच येत नाही असे लेखिकेला वाटते अजूनही समाजातली पुरुषी मानसिकता बदलली नाही असे लेखिकेला येथे सांगावयाचे आहे.

दोन दशकापासून मराठी रंगभूमी गाजवणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री लालन सारंग यांचे "जगले जशी" हे आत्मकथन म्हणजे त्यांच्या कलाक्षेत्रातील कारकिर्दीचे विश्लेषण करणारे आत्मकथन आहे." एक कलावंत म्हणून एक व्यक्ती कसा घडत जातो याचा आत्मशोध म्हणजे कलावंताचे आत्मकथन 'जगण्या' चे 'जीवन' करण्याचे सामर्थ्य असलेल्या कलावतीचा हा आत्मशोध आहे"[८] असे मत तारा भवाळकर व्यक्त करतात.

लालन सारंग यांनी विविध नाटकातून भूमिका केल्या काही भूमिका लालन सारंग यांच्या व्यक्तीमत्त्वाचा तावा घेऊन बसल्या विशेषतः पेंडसे यांच्या 'चक्र' मधल्या 'ती' ने त्यांना झपाटून टाकले. 'कमला' मधील 'कमला' आणि 'सरिता', सखाराम बाईंडर मधल्या 'चंपा' आणि 'लक्ष्मी' या भूमिका म्हणजे भारतीय स्त्रीजीवनाची स्थितीगती आहे असे त्यांना वाटते लालन सारंग समस्त स्त्री जातीचेच रूप या वेगवेगळ्या भूमिकांमधून अनुभवतात आणि एकंदर भारतीय स्त्रीची व्यथा मला जाणवू लागली म्हणून त्या आपले मनोगत व्यक्तही करतात आणि मनात बंडखोरीचा भाव निर्माण होत जातो एक व्यक्ती म्हणून आपली व्यथा, तक्रार पुरुषी सत्तेतूनच निर्माण झाल्याचे त्यांना वाटत राहते.

लालन सारंग यांचे आत्मचरित्र वाचताना वाचकाला त्यांच्या आत्मकथनातील बाह्य घडामोडीपेक्षा कलावंताच्या मनातल्या घडामोडी अधिक जाणून घ्यावयाशा वाटतात. जितक्या सजगपण एक कलावंत म्हणून त्याचे याक्षेत्राशी निर्माण झालेले नाते त्यांचे परस्पर परिणाम आणि एक व्यक्ती म्हणून व्यक्त झालेले व्यापक भान हे या आत्मकथनाचे अनन्य साधारणत्व आहे असे म्हणता येते.

लालन सारंग यांचे 'जगले जशी' हे आत्मकथन म्हणजे त्यांच्या नाट्यक्षेत्रातील कारकिर्दीचा प्रवास आहे. अत्यंत संवेदनशील आत्ममग्न असलेल्या लेखिका जशा नाटकात दिसतात. तशाच त्या आत्मचरित्रातूनही अभिव्यक्त होताना दिसतात. या आत्मकथनातून बाह्य घडामोडी सोबत एक स्त्री म्हणून त्यांच्या मनात चाललेला विचारांचा संघर्षही त्यांनी आत्मकथनातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. नाटकातून वेगवेगळ्या स्त्री भूमिका करीत असताना एक स्त्री म्हणून भारतीय स्त्रिचे एक नवीन भान जागृत करते एक स्त्री म्हणून तिचे दुःख खूप मोठे आहे असे त्यांना वाटत राहते. परंपरेमुळे भारतीय स्त्रिच्या अंगी आलेला कणखरपणा, सामर्थ्य पुरुषप्रधान संस्कृतीमुळे तिची झालेली अगतिकता त्यामुळे तिची होणारी होरपळ ही एकूणच स्त्रीची शोकांतिका आहे असे लेखिकेला वाटते आणि त्यांचे व्यक्तिमत्व ढवळून निघते.

''जगले जशी'' या आत्मचरित्रातून अभिनेत्री संसारी स्त्री या दोन्हीचा तोल साधताना होणारी त्यांची द्विधा मनस्थिती आणि क्षणात स्वतःला सावरणारी स्त्री ठळकपणे दिसून येते कमलाकर सारंग यांच्या सारख्या नाट्यक्षेत्रातील दिग्दर्शक, कलावंत, समंजस पती लाभल्यामुळे आपला अभिनय प्रवास यशस्वी होऊ शकला याचे भानही त्यांना आहे. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र असली तरी सर्व क्षेत्रात उल्लेखनीय काम करत असली तरी भावनिक आणि मानसिक पातळीवर ती कुटूंबव्यवस्थेशी जोडली असल्यामुळे घराची ओढ तिला वाटत असते त्यामुळे त्यातून होणारा मनःस्तापही ती सहन करते 'स्त्री स्वातंत्र्या विषयी' चे त्यांचे हे चिंतन लक्षणीय असे आहे.

एक व्यक्ती म्हणून आपली व्यथा ही पुरुषी सत्तेतूनच निर्माण झाली असे त्यांना वाटते म्हणून पुरुषांच्या बरोबरीने वागून समान हक्क मिळणार नाही तर त्यासाठी आधी आपले मन स्वतंत्र केले पाहिजे असे त्यांना वाटते आणि भारतीय स्त्रिला असे मुक्त होता येणे जमणार नाही तर तिने भविष्याकडे नजर लावून पहात बसायचे असा शेवट त्यांनी आपल्या आत्मकथनाचा केलेला आहे. या त्यांच्या वक्तव्यातून त्यांनी आपले मनोगतच व्यक्त केले आहे असे म्हणता येते.

एकंदर एक कलावंत जरी असली तरी आपण सुद्धा या व्यवस्थेतून पूर्णपणे स्वतंत्र झालेलो नाही, सुटू शकलेलो नाही ही खंत त्यांना वाटत राहते. 'जगले जशी' या आत्मचरित्रा व्यतिरिक्त लालन सारंग यांनी 'नाटकांमागील नाट्य', 'मी आणि माझ्या भूमिका', ''बहारदार किस्से आणि चटकदार पाककृती' आदी पुस्तके ही त्यांनी लिहिली कणकवली येथे झालेल्या ८७ व्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते अशा या गुणी स्वतंत्र व्यक्तीमत्वाच्या अभिनेत्रीचे ०८ नोव्हेंबर २०१८ रोजी वयाच्या ७९ व्या वर्षी निधन झाले. नाट्य सिनेक्षेत्रातला एक ताराच निखळून पडला असे त्यांच्या बाबतीत म्हणता येते.

**संदर्भ ग्रंथ**

१) देशमुख उषा – 'स्त्रीवादी समीक्षेची भूमिका'–आकांक्षा मासिक, नागपूर. ऑक्टो., डिसें. १९९९ पृ. ६७
२) डॉ. वरखेडे मंगला – 'स्त्रीत्वाची संहिता' (लेख) युगवाणी, अंक ऑक्टो, नोव्हे, डिसे. २०१३ पृ. ६
३) बोव्हुआ सिमॉन द –'दि सेकंड सेक्स' (अनुवाद – करुणा गोखले), पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१२,

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue - 252
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
August 2020

दुसरी आवृत्ती, पृ.२५

४) धोंगडे अश्विनी – 'स्त्रीवादी समीक्षा संकल्पना व उपायोजन', दिलीपराज प्रकाशन, पृ.२

५) डॉ. देशपांडे सुनंदा – 'अभिनेत्या कलावंताची आत्मचरित्रे', ऋचा प्रकाशन, नागपूर, १९९७, पृ. १७८

६) सारंग लालन – 'जगले जशी', डिंपल प्रकाशन, मुंबई,०४, पृ. ३३

७) तत्रैव – पृ. ४५

८) तत्रैव – पृ. १५६

९) तत्रैव – पृ. १६०

१०) भवाळकर तारा – 'तीन बिंदूच्या शोधात' – सुगावा प्रकाशन, पुणे ३०

t 2:44 PM

# तिफण

ISSN 2231-573X, UGC Care Listed Journal
MAH MAR 34737/13/1/2009-TC



वैयक्तिक निरक्षा, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, शाखा कन्नड, आणि प्रेमरूपन संस्थान हतनूर आयोजित राज्यस्तरीय क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त तिफण कविता महोत्सवाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध कवी व चित्रपट गीतकार डॉ. दासू वैद्य यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करतांना संशोधन परिषदेचे पदाधिकारी



हतनूर ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गझलकार शम्स जालनवी, व मान्यवर

---

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक, शिवाजी हुसे यांनी महाराष्ट्र ऑफसेट सिडको, औरंगाबाद येथे छापून 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे प्रसिद्ध केला.
Email - huseshivaji@yahoo.com

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



# तिफण

वर्ष : ११ वे अंक : २ रा व ३ रा
जुलै ते डिसेंबर – २०२०

## लोककला विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष अकरावे, अंक- २रा व ३रा, जुलै-डिसेंबर २०२० (जोडअंक)

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

- संपादक -

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३,
मोबा. ९४०४०००३९८

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक / लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|
| * | लोककला विशेषांकाच्या निमित्ताने... - डॉ. शिवाजी हुसे | |
| * | संपादकीय - प्रा. डॉ. चंद्रशेखर कणसे (अतिथी संपादक) | |
| १. | 'कीर्तन' समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम: एक अभ्यास - डॉ. चंद्रशेखर कणसे (परळी वैजनाथ, बीड) | ९ |
| २. | महाराष्ट्रातील लोककला : कीर्तन - प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस (दापोडी, पुणे) | १८ |
| ३. | वारकरी दिंडी लोककला : एक आनंदयात्रा - धन्यकुमार प्रल्हाद तारळकर (ता. फलटण जि. सातारा) | २४ |
| ४. | 'सोंगी भारूडी भजन' - डॉ. आनंद बल्लाळ (आजरा, कोल्हापूर) | ३२ |
| ५. | प्रयोगात्मक लोककलाप्रकार - 'भारूड' - डॉ. नाना झगडे (पुरंदर) | ३९ |
| ६. | विदर्भातील झाडीपट्टी येथील लोककला 'दंडार' - प्रा. अमृता डोरलीकर (नागपूर) | ४७ |
| ७. | महाराष्ट्रातील लोककला 'बोहडा' - डॉ. भास्कर शेळके (अकोले) | ५२ |
| ८. | गोमंतकीय लोककला : विशेष संदर्भ 'धालोत्सव' - डॉ. नीता तोरणे (पेडणे, गोवा) | ५५ |
| ९. | 'गोंधळ : स्वरूप आणि आविष्कार' - डॉ. पांडुरंग भोसले (हडपसर, पुणे) | ६७ |
| १०. | महाराष्ट्रातील लोककला : 'गोंधळ' - डॉ. पद्माकर तामगाडगे (मुंबई) व प्रा. राजू शनवार (ठाणे) | ७१ |
| ११. | महाराष्ट्राचे विधिनाट्य 'गोंधळ' आणि 'जांभूळ आख्यान' - प्रा. शिल्पा नेवे (मुंबई) | ७५ |
| १२. | 'गोंधळ' कला प्रकाराचे बदलते स्वरूप - डॉ. जयदेवी पवार (बाभळगाव, ता. जि. लातूर) | ८९ |
| १३. | गोंधळ : महाराष्ट्राची लोककला - डॉ. वैशाली श्रीकृष्ण भालसिंग (अहमदनगर) | ९५ |

# विदर्भातील झाडीपट्टीची लोककला : दंडार

- प्रा. अमृता डोरलीकर
- डॉ. मधुकरराव वासनीक
पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालय, नागपूर.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिकतेला पुरातन अशी परंपरा आहे. माणसांना एकत्रित करण्याचे सामर्थ्य सांस्कृतिक परंपरातून निर्माण झालेल्या लोककलांमध्ये आहे. अस्सल मातीतल्या या लोककला आजच्या बदलत जाणाऱ्या काळातली ग्रामीण भागात अजूनही टिकून आहे. निसर्गाची विविध रूपे मानवी भावभावनांचा सहज आविष्कार लोककलांमध्ये उत्कटपणे साकार झालेला दिसतो. त्यामुळे लोककला अधिक समृद्ध सहजस्फूर्त बनत जातात.

लोकसाहित्याची निर्मिती लोकसमूहात होत असते. लोकसाहित्य परंपरेने लोकजीवनात प्रचलित असते. लोककलेच्या माध्यमातून लोकजीवनाचा लोकमनाला आविष्कार घडत असतो. लोककला लोकरंजनाचे लोकप्रबोधनाचे काम करतात. जनसामान्यांच्या जीवनाचे प्रतिबिंब असलेल्या लोककलांनी महाराष्ट्राची संस्कृती समृद्ध झाली आहे. त्यात वैदर्भीय कलाप्रकारांचाही मोठा वाटा आहे. विदर्भातील गोंधळ, पोवाडे, डहाका गीते, तुंबडी गीते, खडीगंमत, दंडार, हे लोककलेचे प्रकार विदर्भातील झाडीपट्टीत विशेष प्रसिद्ध आहेत. झाडीपट्टी म्हणजे महाराष्ट्राच्या पूर्वेकडचा भाग होय. गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा व गोंदिया या चार जिल्ह्यांचा समावेश झाडीपट्टीत केला जातो. वैनगंगा नदीच्या पूर्वकिनाऱ्यावर बोलल्या जाणाऱ्या बोलीला झाडीबोली असे संबोधले जाते. 'झाडीपट्टी ही झाडांनी वेढलेली, भरपूर तलाव यामुळे संपन्नता आलेली आहे. त्या संपन्नतेचा परिणाम लोकांच्या जीवनपद्धतीवर पडला आहे. त्यामुळे जीवन जगण्यात थोडा संथपणा आलेला आहे.''[१] हा संथपणा झाडीबोलीतही उमटलेला दिसतो. या बोलीचे स्वरूप लोककलांमध्येही दिसून येते. लोककलांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीला समृद्ध केले. तसेच विदर्भातील लोककलांमध्ये 'दंढार' हे लोकप्रिय असे लोकनाट्य आहे. काही ठिकाणी त्याला 'दंडार' असेही म्हटले जाते.

या कलेचा उगम प्राचीन काळात झाला असावा याविषयी डॉ. हरिश्चंद्र बोरकर म्हणतात, 'शेतातील खळ्यावर अमाप पीक आल्याचे पाहून शेतकऱ्यांनी शेजारच्या झाडाच्या फांद्या तोडल्या आणि आपल्या मित्रासह ते आनंदाने नाचू लागले ही दंढारीची सुरुवात असावी. आजही दिवाळीला गोंड आणि ढिवर अशाप्रकारे नाच करताना दिसतात.'[२]

झाडीपट्टी लोककलांचे अभ्यासक डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांच्या विधानात तथ्य असल्यामुळे आजही दिवाळीच्या वेळी भाऊबीजेच्या दिवशी गावात मंडईचे आयोजन असते तिथे मंडईत दंढार सादर केली जाते. यावरून या लोकनाट्याची प्राचीन अशी परंपरा असून त्याचे मूळ लोकपरंपरेत आहे असे म्हणता येते. काळानुसार तिच्यात परिवर्तन होत गेले परंतु त्याचा आशय मात्र कायम आहे. अडाणी, अशिक्षित, रांगड्या लोकांनी नाचगाण्यांनी रंगमंचावर सादर करण्याची कला म्हणजे 'दंढार' होय. दंढारीचा विषय हा ऐतिहासिक, पौराणिक कथाभागावर आधारलेला असला तरीही त्यातून लौकिक जीवन प्रकट होताना दिसते. 'दंढार' हा झाडीपट्टीतील जनपद नाट्यप्रकार आहे. 'लोकांच्या पारंपारिक धारणा संस्कृती संवर्धन त्यांच्या श्रद्धा, अंधश्रद्धा, सण, उत्सव, नृत्य, नाट्य, संगीताद्वारे होणारे रंजन अशा बहुआयामी दृष्टीने दंढार या नृत्यनाट्य प्रकाराला लोकजीवनात व समाजजीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे.'[३]

'दंढार म्हणजे दंड, शासन, शिक्षा, दंड, काठी किंवा सोटा, दंड दोन तुकडे शिवण्याचा (दंड करणे) झाडीपट्टीतील प्रकार म्हणजे दंढार, फांदीवर फांदी आदळणे.'[४] असा अर्थ सांगितला जातो.

'दंढार' या लोककलेचा उगम फार पूर्वी झाला. दंडारीतील 'दंड' म्हणजे 'टहारा'. टहारा या मूळ शब्दाचा अर्थ 'डहाळी' या शब्दामध्ये शोधता येतो. डहाळी म्हणजे फांदी. याचाच अर्थ 'फांदीचा तुकडा' म्हणजे 'टहारा' होय. झाडाची हातभर काती व काठी आजही 'दंढार' या लोककलेत वापरली जाते. पूर्वीच्या काळी शेतकरी आपल्या शेतातील आलेल्या पीकाकडे पाहून आनंदाने नाचू लागला असावा अशातच त्याने शेतातील झाडाच्या फांद्या तोडून त्या एकमेकांवर आदळून बेभान अवस्थेत नाचायला सुरुवात केली असावी, नाचून आनंद व्यक्त करणारा शेतकरी त्याच फांद्या घेऊन गावात आला, फांद्याची पाने गळून गेली. कालांतराने सायंकाळी गावात आल्यावर काठ्यावर काठ्याचा आघात करून आनंद व्यक्त करण्याची प्रथा रूढ झाली. झाडाच्या फांद्याची पाने गळून फक्त टहारा नामक काठी तेवढी शिल्लक राहिली. काही दिवसानंतर हे एक मनोरंजनाचे साधन बनले. दंढारीतील प्रमुख वाद्य म्हणून 'टहारा' याचा उल्लेख होतो. तरीही सुरुवातीच्या फांद्यावर फांद्या आदळणारा कलाकार आजही दंढारीत दिसून येतो. विदुषकाच्या कमरेला बांधलेल्या झाडाच्या फांद्या हे दंढारीतील आद्यदंढारीचे प्रतीक अजूनही टिकून असलेले दिसते.

डॉ. मधुकर वाकोडे यांच्या मते, "अनेक शतकांची परंपरा 'दंढार' या लोकनाट्यशैलीत आहे. द्वंद्व (भांडण) + आर = उंच सूरात म्हणावयाचे गाणे. दंड टिपऱ्या धारण केलेल्या लोकांनी गाण्याच्या तालावर सादर केलेला खेळ. थोडक्यात म्हणजे दांडग्या लोकांनी आपल्या रांगड्या पद्धतीने लोकमंचावर सादर करावयाचा नाट्यसंगीत प्रकार म्हणजे

'दंडार' किवा 'दंढार'.[५] 'दंडार' हा शब्द शब्दकोशातला अर्थ म्हणजे 'खेडेगावात करमणुकीसाठी शिकविलेल्या मुलांचे नाचगाणे, सोंगे इत्यादींचा कार्यक्रम', असा अर्थ दिलेला आढळतो.

विदर्भातील दंढाराविषयी सुधीर तुपकर म्हणतात, 'विदर्भाच्या 'दंढार' या नाट्यात प्रथम महादेवाचा गौरव असतो. दुसरे गणेश वंदन करण्यात येते. यात नमनाची पद्धत सारखीच आहे. पुढे टिपरी नृत्य दंढारीत सादर केले जाते. या टिपरी नृत्यातही बरेच साम्य आहे. यावरून दंढार लोकनाट्याच्या विकासात आदिवासी नृत्य नाट्याचा वाटा असावा असे वाटते.'[६] दंढारीचा उगम विदर्भात झाला, ती बहरली याच विदर्भाच्या मातीत, तमाशाचा प्रभाव असलेले पण तमाशापेक्षा सर्वस्वी भिन्न लोक परंपरागत एक आगळेवेगळे लोकनाट्य 'दंढार' होय.

'दंढार' या लोकनाट्याची सुरुवात विदर्भाच्या ग्रामीण भागात गणेश चतुर्थीपासून पोर्णिमेपर्यंत दंढारीचे विशेष कार्यक्रम होतात. दिवाळीनंतर या कार्यक्रमाला बहर येतो. 'दंढार' या लोकनाट्य प्रकाराला 'दंढार' हे नाव का प्राप्त झाले. याविषयी सुधाकर गायधनी म्हणतात, 'दंढारीचे आकर्षण म्हणजे टिपरी नृत्य प्रामुख्याने या नृत्यात राधाकृष्ण रासक्रीडेचा प्रकार असतो. परंतु कालपरत्वे यासबदलही दिसून येतो. वैदर्भीय 'दंढार' ही एक नृत्यनाट्य पारंपारिक कला आहे. दंढारीत ८-१० पुरुष कलावंतापैकी काही निम्मे कलावंत राधेची तर उरलेले कृष्णरूपाची वेशभुषा करतात. त्यांच्यापैकी प्रत्येकाजवळ एक लाकडी टिपरी (दांडा) असते वादक गायन करतात. कलावंतही त्यांना साथ देतात. ध्रुपद आळवितांना नृत्याला गती येते. गायक वादक तथा कलावंत समूह मागेपुढे गतीने सरकत व लाकडी दांडा परस्परावर ठेक्यात आदळीत (गरबा) नृत्याप्रमाणे मनोवेधक नृत्यगायन करतात. दांड्याच्या आविष्कारामुळेच या लोककलाप्रकाराला 'दंढार' संबोधण्यात आले असावे.'[७]

'दंढार' या लोकनाट्याचे पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन भाग पडतात. पूर्वरंगात नमन, गण, गौळण व टिपरीनृत्यादी बाबींचा समावेश होतो.

उत्तररंगात लावणी, छक्कड, पौराणिक कथाभागावर आधारित नाट्यप्रवेश इत्यादींचा भाग असतो. शंकराच्या स्तवनाने गणाला सुरूवात होते. कोणत्याही कलेच्या आरंभी श्रीगणेशाला वंदन करण्याची परंपरा आहे. दंढारीच्या गणात गणेशवंदन केले जाते.

पडतो मी पाया पाया जी - लाज राख माझी गणराया
पडतो मी पाया पाया जी ।।धृ।।[८]

गणानंतर मनाचा ठाव घेणारी गौळण 'दंडार' या लोकनृत्यात असते. 'दंडार' या लोकनृत्याची गौळण परंपरागत मौखिक असते. या गौळणीत राधा-कृष्ण आणि गौळणी

यांच्या निरनिराळ्या रूपातील वर्णने येतात. दंढारीच्या गौळणीतील शब्द बोलीभाषेतील असतात. त्यामुळे ते शब्द लोकजीवनाशी जवळीक साधतात.

गौळणीनंतर दंढारीत टिपरीनृत्य सादर केलेजाते. या टिपरीनृत्यात दहा –बारा पुरुष कलावंत हातामध्ये टिपऱ्या घेऊन रांगेत उभे असतात त्यांच्या मधोमध एक कलावंत श्रीकृष्ण किंवा देवदेवतांच्या वेशात उभा असतो. त्याच्या दोन्ही बाजूला महिलांच्या वेशातील पुरुष कलावंत असतात. कलावंत हातातील टिपऱ्यांचा आवाज करतात. ढोलकी, झांज, बासरी, हार्मोनियम, डफ, पखवाज, तूणतुणे आणि एकतारी अशी वाद्ये साथीला असतात. वाद्यांच्या तालावर टिपऱ्यांचा आघात सुरू होतो. संगीतातील लय जसजशी वाढते तसतशी नृत्यातील गती वाढू लागते. कलावंत नृत्यांत धुंद होतात. प्रामुख्याने या नृत्यात राधा-कृष्ण रासक्रीडेचा प्रकार असतो. 'दंढारीचा' चा पूर्वरंग अशा प्रकारे सादर होतो.

'दंढारी'च्या उत्तररंगात लावणी, छक्कड, पौराणिक, सामाजिक, काल्पनिक, ऐतिहासिक घटनाप्रसंगावर आधारलेले नाट्यप्रसंग उत्तररंगात सादर केले जातात. उत्तररंगात कथानकला अनुसरून मधे-मधे सोंगे काढली जातात. हाच प्रकार दंढार लोकनाट्य म्हणून ओळखला जातो.

दंढारीत सादर केली जाणारी आख्याने परंपरेने पिढ्यान्‌पिढ्या मौखिकरीत्या चालत आलेल्या कथेवर आधारलेली दिसून येतात. दंढारीचा आकृतिबंध हा एक विश्वात्पत्तीबंधाचा आकृतिबंध असतो. कृष्ण या खेळाचा प्रारंभ करतो. ब्रह्मा, विष्णू, महेश या तिघांना आवाहन करतो ही रंगसभा म्हणजे दंढारीचे विश्व प्रेक्षकांसमोर साकार केले जाते. श्रीकृष्ण या खेळात मध्यवर्ती तिन्ही भूमिकांच्या मधून स्वतः वावरत असतो. दंढार लोकनाट्यात प्रमुख रसश्रृंगार असतो. करुण, वीर व भक्तीरसही दंढारीत असतात. लौकिक जीवनातील तात्कालीक अशा स्वरूपाचे विषयही दंढारीत येतात. कडासणी, लावणी संभाषणे असे सोंगाचे तीन प्रकार प्रामुख्याने दंढारीत असतात. दंढार लोककलेत अधूनमधून राजा हरिश्चंद्र, चांगुणा, श्रावण बाळ इत्यादी पौराणिक कथाही सोंगाच्याद्वारे सादर केल्या जातात. अलिकडच्या काळातील प्रश्नांशी संबधित दारूबंदी, हुंडाबळी, पर्यावरण, कुटूंब नियोजन प्रौढ शिक्षण इ. विषयांवर आधुनिक दंढारीत सोंगे आणि लावण्या सादर केल्या जातात, पोवाडेही गायले जातात. अशाप्रकारे उत्तरोत्तर दंढार रंगत जाते.

ग्रामीण जनतेच्या रंजनासाठी व त्यांच्या धार्मिक उदिष्टांची पूर्ती करण्यासाठी लोकजीवनातून आकाराला आलेली दंढार ही प्रायोगिक कला आहे. झाडीपट्टीतील प्रदेशात झाडीबोली आणि दंढार ही दोन सांस्कृतिक वैशिष्ट्ये म्हणता येईल. दिवसा आणि रात्रभर चालणारी दंढार ही इथल्या भागातील लोकांना आकर्षित करणारे मनोरंजन करणारे प्रभावी माध्यम आहे. परंपरेने चालत आलेली ही दंढार आपला एक सांस्कृतिक वारसा म्हणून

येथील ग्रामीण लोकांनी जपून ठेवलेला आहे. अडाणी, अल्पशिक्षित, असंस्कृत अशा ग्रामीण जनतेची ही लोककला कित्येक वर्षापासून परंपरेने मनोरंजनाचे साधन बनली आहे. व ती त्यांनी स्वीकारलेली आहे.

बैठी दंढार, खडी दंढार, परसंगी खडी दंढार, भडकी दंढार, मंडई, पट या सर्वातून बहुजन समाज आपले मनोरंजन करून घेतो. गोंधळ, तमाशा, दंढार या लोककलेने जनतेचे कित्येक वर्ष मनोरंजन केले. 'दंढार' ही लोककला मनोरंजनाचे साधन बनली. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात या लोककला मागे पडताना दिसतात. 'दंढार' तमाशाचे कार्यक्रम व्यावसायिक स्वरूपात का होईना आजही ग्रामीण भागात लोककलेच्या विकासासाठी समृद्धीसाठी सादर होतात. या लोककलेचा आणखी विकास व्हायचा असेल तर लोकाश्रयाबरोबरच शासकीय आश्रय प्राप्त होणे गरजेचे आहे. लोककलांचे हे भांडार जपणे, अस्तगत होत चाललेल्या या लोककलेला पुनरूज्जीवन देणे त्यावर संशोधन होऊन त्याचे सादरीकरण नागर समाजापुढे होणे ही या लोककलेच्या संदर्भात आजच्या काळाची गरज आहे असे म्हणावेसे वाटते.

**संदर्भग्रंथ: -**


१. श्री. लांजे हिरामन - 'समग्र झाडीपट्टी' – विवेक प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती २००६

२. डॉ. बोरकर हरिश्चंद्र - 'झाडीपट्टीची दंढार' – पुणे १९९९

३. डॉ. खंदारे साहेबराव – 'लोकसाहित्य शब्द आणि प्रयोग' – प्रतिमा प्रकाशन, पुणे २००४

४. श्री. लांजे हिरामन - 'समग्र झाडीपट्टी' – विवेक प्रकाशन, प्रथमावृत्ती २००६

५. डॉ. वाकोडे मधुकर - 'लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे' लोकवाङ्मय संग्रह

६. श्री. तुपकर सुधीर – 'विदर्भाची लोककला, दंढार. (लोककला दंढार) लोकमत साहित्यजत्रा, नागपूर, ७ मार्च १९९३.

७. डॉ. गायधनी सुधाकर - 'वैदर्भीय लोककला' - लोकमत साहित्यजत्रा, नागपूर ४ जून १९८९.

८. शेंडे ना. रा. - लोकसाहित्यसंपदा, नागपूर १९६४.


* * * * *

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor - 6.625

E-ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-February-March 2021

Vol.-VIII, Issue-I (B)

Multidisciplinary Issue




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक | लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 01 | आदिवासी लोकगीतातील स्त्रीवास्तव | प्रा.राजू शनवार | 05 |
| 02 | दशावतार : एक लोककला | डॉ. अंजली मस्करेन्हस | 09 |
| 03 | तडवी समाज आणि संस्कृती | डॉ. धनराज धनगर | 15 |
| 04 | आंध्र प्रदेशातील विठ्ठल भक्तीचे स्वरूप | डॉ.प्रभाकर घोडके | 24 |
| 05 | देवदासी प्रथा धार्मिक व सांस्कृतिक परंपरा | डॉ.गजानन भामरे | 29 |
| 06 | तुकारामाची कविता - एक चिंतन | डॉ. निशा जोशी | 32 |
| ✓07 | रामदासांचे 'मनाचे श्लोक' : एक विश्लेषणात्मक चिंतन | प्रा. अमृता डोर्लीकर | 37 |
| 08 | ओवीगीतातील आई | डॉ. अनिता सोनवणे | 42 |
| 09 | राष्ट्रसंताच्या अभंग गाथेतील विविध देवता | डॉ. प्रवीण कारंजकर | 46 |
| 10 | उपेक्षितांचे जीवनदर्शन घडविणारी श्रेष्ठ कादंबरी 'बळी' | डॉ. रेखा वडिखाये | 51 |
| 11 | अण्णाभाऊ साठेंच्या महाराष्ट्र संस्कृतीची यशोगाथा गौरवणाऱ्या पद्यरचना | प्रा. सोमनाथ पावडे | 57 |
| 12 | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील भटक्या जमातींचे लोकजीवन | डॉ. राजेश्वर दुडूकनाळे | 61 |
| 13 | साठोत्तरी मराठी कवितेतील महानगरी आशयसूत्रे | डॉ. भरतकुमार भालेराव | 64 |
| 14 | ग्रामीण कादंबरीतील बदलते ग्रामवास्तव | डॉ. वाल्मिक आढावे | 71 |
| 15 | 'अजूनही बरंच काही बाकी' - दिनकर मनवर यांची कविता : एक चिंतन | डॉ. सुरेश वर्धे | 76 |
| 16 | मायबापाच्या जीवनाची व्यक्त झालेली विचार माळ : 'सूर्याची मशाल बाप माझा' | डॉ. प्रमोद गारोडे | 85 |
| 17 | डॉ. दिलीप धोंडगे यांचे ललित स्तंभलेखन : एक दृष्टीकोन | प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. सुरेश जाधव | 91 |
| 18 | 'हरवलेली माणसं' निघालीत माणुसकीच्या शोधात ! | डॉ. मारोती घुगे | 95 |
| 19 | आदिवासी कादंबरीतील भिल्ल जमातीच्या लोकसंस्कृतीचा आविष्कार | प्रा. विनायक राऊत, डॉ. कांचन नलवडे | 102 |
| 20 | युवकांना आत्मबळ देणारा ग्रंथ : कर हर मैदान फतेह | डॉ. भाऊसाहेब गमे | 107 |
| 21 | भगतसिंग यांचे धार्मिक विचार | डॉ. राजेंद्र रासकर | 113 |
| 22 | भुसावळ तालुक्याचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभाग | डॉ. जगन्नाथ गोपाळ | 118 |
| 23 | १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यादरम्यान रायगड जिल्ह्यातील सरकारी केंद्रावरील हल्ले | डॉ. भानुदास शिंदे | 123 |
| 24 | राजर्षी शाहू महाराज यांची कल्याणकारी राजकीय व्यवस्था | डॉ. देविदास नरवाडे | 126 |
| 25 | आधुनिक संदर्भात महात्मा गांधी यांच्या श्रमविषयक विचारांची उपयुक्तता | डॉ. जी. डी. घोडे | 130 |
| 26 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची वाचन अभिरुची व ग्रंथसंपदा | डॉ. प्रशांत पगाडे | 134 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'मूकनायक' आणि 'सामाजिक न्याय' विचार | डॉ. संभाजी पाटील, प्रा. बापूसाहेब जवळेकर | 138 |
| 28 | पंडित जवाहरलाल नेहरूंच्या परराष्ट्र धोरणाची प्रस्तुतता | डॉ.सुनिल पिंपळे | 149 |
| 29 | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे अस्पृश्य निवारणाचे कार्य : एक चिंतन | प्रा. सुनिलदत्त गोडसे | 153 |
| 30 | महिला सशक्तीकरण धोरणांचा आढावा | डॉ. चांगदेव मुंढे | 156 |

# रामदासांचे मनाचे श्लोक एक विश्लेषणात्मक चिंतन

प्रा . अमृता डोर्लीकर
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालय, नागपूर
cmpamruta1234@gmail.com.
भ्रमणध्वनी:९३२६२३४२८२

महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले जाते. या संतांनी जात पात विरहित समाज ही भावना समाजामध्ये रुजविली. परकीयमनेपासून जागृत केले लोकांना अध्यात्माकडे बळविले. चांगल्या गुणांची शिकवण सर्व सामान्य जनतेला दिली. यामध्ये संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या संतकवींनी पाच शतक आपल्या अक्षर वाङ्मयातून गुंफली आणि आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग सर्वासाठी खुला केला अनुभवाचे बोल जसे संत तुकारामांच्या अभंगातून प्रगटतात तसेच रामदासस्वामीं चे दासबोध, मनाचे श्लोक, करूणाष्टके इ. रचना म्हणजे त्यांच्या प्रचीतीचे बोल आहेत असे म्हटले जाते .

सर्वसाधारणपणे मनाचे श्लोक हे पूर्वीच्या काळी रामदासी बाण्याचे लोक भिक्षेला बाहेर पडायचे. मनाच्या श्लोकातील एक श्लोक म्हटला की त्यांच्या झोळीत भरपूर भिक्षा पडत असे 'जय जय रघुवीर समर्थ' हे खड्या सुरात गंभीर वाणीने म्हटलेला श्लोक ऐकून सगळेजण हातातील कामे टाकून अंगणात येते आणि ऐपतीनुसार रक्कम झोळीत टाकली जात असे .

समर्थांच्या मनाच्या श्लोकांची निर्मिती कशी झाली त्या संबंधीची एक कथा सांगितली जाते . चाफळ या गावी रामदास स्वामींनी रामनवमीचा उत्सव सुरु केला याउत्सवासाठी लागणारी शिधा सामुग्री शिवाजीमहाराजांकडून येत असे. एकवर्षी काही कारणाने ही शिधासामुग्री आली नाही. उत्सव कसा पार पडेल या विवंचनेत असताना एकारात्रीतून समर्थ रामदासांनी मनाच्या श्लोकांची निर्मिती केली . दहा - बारा शिष्यांनी श्लोकांच्या प्रती तयार करून घरोघरी जाउन मनाचे श्लोक म्हणू लागले असे करताच पुरेसे अन्नधान्य झोळीत पडल्याने उत्सव पार पडला . अशी आख्यायिका मनाच्या श्लोकांच्या निर्मितीची सांगितली जाते .

श्री समर्थांची वाङ्मयीन मूर्ती म्हणजे श्री दासबोध आणि त्या वाङ्मयीन मुर्तीचे मन म्हणजे "मनाचे श्लोक". बाह्यांगाने सोपी वाटणारी ही रचना जेव्हा मनाला स्पर्श करते तेव्हा त्यातले अध्यात्म मानवी मनात खऱ्या अर्थाने रुजायला लागते.

गणाधीश जो ईश सर्वा गुणांचा ।
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।
नमू शारदा मूळ चत्वार वाचा ।
गमू पंथ आनंत या राघवाचा ॥ ( मनाचे श्लोक क्र .१)

या पहिल्याच श्लोकात समर्थांनी श्री गणेशाला वंदन करून प्रकाशाची वाट दाखविली आहे राघवाचा मार्ग हाच अंतीम सत्याचा मार्ग आहे असे श्री समर्थ रामदासांनी म्हटले आहे.

समर्थांनी मनाशी सुसंवाद केला आहे. मनाने कुठल्या गोष्टीपासून सतत दूर राहिले पाहिजे याची जाणीव समर्थ आपल्या प्रत्येक श्लोकातून देतात त्यासाठी मनाच्या श्लोकात त्यांनी मनाला समजवण्याचा प्रयत्न केला आहे.

मनाला किंवा चित्ताला उद्देशून लेखन करण्याचा अन्य मराठी कवींनी प्रयत्न केलेला आढळतो. तथापि प्रासादिक ओघवती भाषा आणि सुत्ररूप परंतु आशयसंपन्न विचार यामुळे रामदास कृत श्लोकांचे जनमानसातील स्थान अढळ राहिलेले आहे. अनेक वर्षाचे पारमार्थिक चिंतन व सामाजिक अवलोकन यांचा परिपाक पुढील श्लोकात झालेला दिसतो.

" जगी सर्व सुखी असा कोण आहे ।
विचारी मना तुच शोधुनी पाहे ॥" ( मनाचे श्लोक क्र.१०)

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Vol.-VIII, Issue-I (B)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

या श्लोकातून समर्थ रामदासांनी मानवाला सुखी राहण्याविषयीचे तत्वज्ञान समाजाला दिले. विचार करणाऱ्या मनास सुख शोधण्यासाठी प्रवृत्त केलेले दिसते. समर्थांनी मनाशी सुसंवाद केला आहे मनाने कुठल्या गोष्टीपासून सतत दूर राहिले पाहिजे याची जाणीव संत रामदास समर्थ आपल्या प्रत्येक श्लोकातून देतांना दिसतात.

मनाच्या श्लोकाप्रमाणेच "करुणाष्टके" ही रामदासांची करुणरसपूर्ण काव्यरचना आहे. मनाला धीर देण्याचा प्रयत्न त्यात केलेला दिसतो' अनुदिन अनुतापे तापलो रामराया" या श्लोकातून रामदासांच्या मनातील आर्तता, आततायीपणा व्यक्त झालेला दिसतो. मनाला चांगल्या मार्गाने नेणारे हे काव्य असल्याने त्याला स्फूर्ती देणारे काव्य ही म्हटले जाते.

मनाच्या श्लोकांवर बऱ्याच साहित्यिकांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्यामते, "मनाच्या श्लोकात समर्थांचे धन्योद् गार ऐकू येत असल्यामुळे त्याची रचना परिणतप्रत अवस्थेत व कदाचित दासबोधाच्या पाठोपाठही झालेली असावी "[१] असे मत तुळपुळे व्यक्त करतात .

प्रा. के. वी. बेलसरे म्हणतात, "संस्कृत भाषेतील अध्यात्म वाङ्मयात उपनिषदास जे महत्व आहे. तेच मराठी भाषेतील अध्यात्म वाङ्मयात उपनिषदास मनाच्या श्लोकास आहे."[2]

"मनाचे श्लोक" हा काव्यग्रंथ भक्तियोग व अध्यात्मतत्व यांचे प्रतिपादन करणारा आहे. साधे शब्द, लयबद्धता, गेयता यामुळे या श्लोकांचे सौंदर्य वाढलेले आहे.

"मनाचे श्लोक" भुजंग प्रयात वृत्तातील असून एकूण श्लोकसंख्या २०५ असून "मनोबोध" यानावानेही ओळखले जातात. मनाच्या श्लोकातील विचार सुटे आणि विविध प्रकारचे असले तरी त्यांची अर्थसंगती लावण्याचा प्रयत्न झालेला आहे. मनाच्या श्लोकातील अनेक श्लोक किंवा वचने यांना मराठी भाषेत नित्याच्या व्यवहारातील सुभाषितांची थोरवी मनाच्या श्लोकांना प्राप्त झालेली दिसते.

क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
समाधान ते सज्जनाचेनि योगे ।
जगी सर्व सुखी असा कोण आहे ?
मना चंदनाचे परीत्वां झिजावे ।
परी अंतरी सज्जना नीववावे ।
तुटे वाद संवाद तो हितकारी । ( मनाचे श्लोक क्र.११३,१५३,११,८,१०८)

वरील प्रमाणे मनाच्या श्लोकांची सुभाषितवजा रचनाही केलेली दिसून येते .

भाषाशैलीच्या दृष्टीने विचार करता मनाच्या श्लोकांची भाषाशैली ही आलंकारिक स्वरूपाची आहे. त्यात उत्प्रेक्षा, यमक, अनुप्रास, दृष्टांत अशी अलंकाराने शोभीवंत अशी भाषा आहे.

दिनाचा दयाळू मनाचा मवाळू
स्नेहाळू कृपाळू जनी दासपाळू
तया अंतरी क्रोध संताप कैचा
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥ (मनाचे श्लोक क्र५६)

या श्लोकात अनुप्रास गतीने मनाच्या श्लोकाचे सौंदर्य वाढत गेलेले आहे. एकाच शब्दाची पुनरावृत्ती हे अनुप्रास अलंकाराचे विशेष आहे . तसेच _

कळेना कळेना कळेना ढळेना।
ढळे नाढळे संशयोही ढळेना ॥
गळेना गळेना अहंता गळेना ॥
बळे आकळेना मिळेना मिळेना ॥ ( मनाचे श्लोक क्र. १४२)

वरील श्लोकात अनुप्रास अलंकार आलेला आहे भाषाशैलीच्या दृष्टीने हा श्लोक सर्वांगसुंदर आहे. दृष्टांत अलंकाराचाही एक भक्तीमार्गपर श्लोक आलेला आहे.

महाभक्त प्रल्हाद हा दैत्यकुळी ।
जपे रामनामावली नित्यकाळी ॥
पिता पापरूपी तया देखवेना ।
जनी दैत्य तो नाम मुखें म्हणेना ॥( मनाचे श्लोक क्र .९६)

या श्लोकात दृष्टांत, रुपक वापरून समर्थांनी भक्त प्रल्हादाची ईश्वर भक्ती सिद्ध केली आहे. भक्ती केल्याने नीतिमान पुरुष ईश्वराच्या दर्शनास पात्र होतो असे समर्थ रामदास म्हणतात.

वाङ्मय सौदर्याच्या दृष्टीने पुढील श्लोकही महत्वाचे मानले जातात.

जया चक्षुने लक्षितां लक्षवेना ।
भवा भक्षितां रक्षितां रक्षवेना ।
क्षयातीत तो अक्षयी मोक्ष देतो ।
द्या दक्ष तो साक्षिने पक्ष घेतो ।( मनाचे श्लोक क्र.१७४)

तसेच ,

तुटेना फुटेना कदा देवराणा
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा ।।
कळेना कळेना फरा लोचनासी ।
बसेना दिसेना जगी मी पणासी ॥( मनाचे श्लोक क्र.१७७)

परमेश्वर हा कधी तुटत नाही, फुटत नाही , चळत नाही, ढळत नाही, चक्षुंना तो कधी कळत नाही . परमेश्वराला पाहण्यास अहंभाव सोडून नम्र व्हावे लागते असे श्री समर्थ म्हणतात.

मनाच्या श्लोकांचे विश्लेषण करताना असे म्हणता येते की, मनाचे सामर्थ्य प्रचंड आहे प्राणीमात्राकडून जे व्यापार होतात त्यासर्वांचे मुळ मन होय. मनाच्या योगानेच इतर प्राण्यांपेक्षा मनुष्याला श्रेष्ठत्व आले. मानव म्हणजे मन असलेला, मनन करणारा प्राणी याचा अभ्यास पाश्चात्यमानव शास्त्रज्ञांनी केलेला आहे. सर्व जगाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य मनुष्याजवळ आहे आणि म्हणून या मनालाच समर्थ रामदास स्वामींनी बोध केलेला आहे.

मनाच्या श्लोकांचा मानसशास्त्राशी जवळचा संबंध मानण्यात येते. मानसशास्त्राचे काम मन जाणण्याचे आहे. मन वळवण्याचे आहे. मनाच्या श्लोकात हे सहजपणे घडताना दिसते. मनाच्या श्लोकांचा आणि मानसशास्त्राचा असा सहज संबंध दिसून येतो.

मनाच्या श्लोकांचा तत्त्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून विचार केल्यास माणसाचे जीवन या विश्वजीवनापासुन वेगळे काढता येत नाही इतकेच नव्हे तर माणूस विश्वाची छोटी प्रतिकृती आहे हे असे तत्वज्ञानविषयक विचार संत रामदासांनी मनाच्या श्लोकातून मांडलेले आहे .

मनाच्या श्लोकांचा अर्थ अनेकांनी वेगवेगळ्या पद्धतीने लावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो कोणाला त्यात दीन मनाचा प्रत्यय येतो तर कोणी त्यात शुद्धमनाची संगती शोधू पाहतात. श्लोक साधे सोपे असून त्यात समर्थांनी मनाच्या निमित्ताने जनास बोध केला मनाच्या श्लोकांमध्ये रामदासांनी निरनिराळे विचार पुष्प एकत्रित गुंफलेले दिसतात.

पारमार्थिक आणि सामाजिक जीवनाला सदैव मार्गदर्शक ठरणारी अनेक सुभाषित वजा वाक्ये मनाच्या श्लोकात आलेली असून रामदासांच्या प्रतिभाशक्तीचा प्रत्यय देणारी आहेत.' मना सज्जना भक्ती पंथेचि जावे', ' प्रभाते मनी राम चिंतित जावा', या श्लोकात आदर्श भक्तीची गुणवैशिष्ट्ये नोंदलेली आहे.

रामदासांनी मनाला आळवण्यासाठी पापच नव्हे तर पापाची संकल्पना सुद्धा पापाने सोडून द्यावी असे रामदासांनी मनाच्या श्लोकात म्हटलेले आहे एखादा विकार मनात शिरला म्हणजे तो मेंदूतील सगळ्या चांगल्या पेशी नष्ट करून टाकतो . म्हणून विषय वासनेची कल्पना सुद्धा नको असे त्यांनी म्हटलेले आहे .

E-ISSN : 2348-7143
Jan.-March 2021

'देह त्यागितां कीर्ती मागे उरावी ।
मना सज्जना हेचि क्रिया धरावी ॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावे
परी अंतरी सज्जना नीववावे ॥ (मनाचे श्लोक क्र.८)

म्हणून माणसाने नेहमी चांगलीच कर्मे करावी अशी शिकवण संत रामदासांनी मनाच्या श्लोकातून दिलेली आहे.

तसेच समर्थांनी मनाच्या श्लोकात त्रिकालाबाधित सार्वजनिक सत्य सांगितलेले आहे.

मरे एक त्याचा दुजा शोक वाहे ।
अकस्मात तोही पुढे जात आहे ।
पुरेना जनी लोभ रे क्षमश्चा त्याते ।
म्हणोनी जनी मागुता जन्म घेते । ( मनाचे श्लोक क्र.१६)

रामदासांचे मनाचे श्लोक भुजंगप्रयात वृत्तातील असले तरी छंदोभंग अनेक ठिकाणी झालेला दिसतो. या मनाच्या श्लोकातील भाषा ही व्याकरण दोषांनी भरलेली आहे अशी टीका काही अभ्यासकांनी केलेली आहे. या संदर्भात शिवाजी भावे यांनी असे म्हटले आहे की, "मनाचे श्लोक हे जरी वृत्तबंध असले तरी त्याला काव्य म्हणता येणार नाही. सरळ उपदेशाला काव्य म्हणता येणार ना असे असले तरी समर्थ रामदास स्वामींनी मनाच्या आणि वाणीच्या शुद्धतेचा महत्व दिले. मन चंचल असते रामदासांच्या शब्दात अचपळ असते. वाणीच्या माध्यमातून भक्ती प्रगट होऊ लागली की, मनाला शिस्त लागते."3 ।

मनाच्या श्लोकांचे वैशिष्ट्य म्हणजे रामदासांना श्लोकांचे सामुदायिक पठन अपेक्षित होते. रामदासांच्या काळात परकीय सांस्कृतिक आणि राजकीय आक्रमणाला प्रत्युत्तर देणे आवश्यक होते. शिवाजी महाराजांनी राजकीय आक्रमणाला प्रत्युत्तर दिले परंतु असे प्रत्युत्तर देण्यासाठी व्यक्तीच्या आणि समाजाच्या मनाची नीट जोपासना व्हावी लागते. ही जोपासना मनाच्या श्लोकाने केलेली दिसते. मनाच्या श्लोकात कठोर आत्मपरिक्षण आहे आणि त्या आत्मपरिक्षणातून आत्मविकासाचा मार्ग जातो असे मनाच्या श्लोका संदर्भात म्हटले जाते. मनाच्या श्लोकातील शेवटच्या श्लोकात समर्थांनी

' मनाची शते ऐकता दोष जाती ।
मतीमंद ते साधना योग्य होती ।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्य अंगी ।
म्हणे दास विश्वासतां मुक्ति भोगी ( मनाचे श्लोक क्र.२०५)

असे प्रतीपादन केले आहे. जो हे श्लोक मनन करेल त्याला ग्रंथाची फलश्रुती कळेल असे समर्थ रामदास म्हणतात. कारण मनाला एकाग्र करण्याचे सामर्थ्य मनाच्या श्लोकात आहे असे म्हटले जाते.

आजचे जग फार वेगाने पुढे जात आहे माणूस हा चिंता आणि व्याधींनी ग्रासलेला आहे. अशा मनाला समर्थ रामदास धीर देतांना दिसतात , जे काही चांगले वाईट घडायचे आहे ते अचानक घडून जाते, जे घडते ते भोगावेच लागते .म्हणून सामान्य माणसाने उगाच अवास्तव अपेक्षा ठेवण्यात अर्थ नाही असा संदेश मनाच्या श्लोकातून देण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे हे मनाचे श्लोक आजच्या काळातही समाजमनाला तेवढेच संस्कारक्षम ठरतील यात शंका नाही. मनाच्या श्लोकांचे नित्यनेमाने पठन केल्याने वाचनाची आवड, पाठांतराचा सराव तसेच मनाची शुद्धी होते, भरकटलेले मन निश्चल होते. मनाची एकाग्रता वाढण्यास मदत होते.

मनाच्या श्लोकांना' परिणतप्रज्ञ' अशा रामदासांच्या या रचनेचा 'अपौरुषेय वाणी', 'दासोपनिषद', अशा शब्दांनी यथार्थपणे गौरव झालेला आहे.२०५ श्लोकांच्या या काव्याला 'मनोबोध' किंवा 'मनाची शते' अशी नावे दिलेली असली तरी 'मनाचे श्लोक' हेच त्याचे शीर्षक सर्वमान्य झालेले आहे असे म्हणता येते.

**संदर्भ ग्रंथ : -**

1. शं.गो. तुळपुळे-पाच संतकवी- पृ.४२३- सुविचार प्रकाशन मंडळ, तिसरी आवृत्ती, सदाशिव पेठ,१९८४, पुणे,
2. प्रा. के. वि. बेलसरे - सार्थ मनाचे श्लोक- पृ. ३श्री समर्थ सेवा मंडळ सज्जनगड, सातारा, १९८० .-
3. शिवाजी नरहर भावे - श्री मनाचे श्लोक संगती आणि सार- पृ.६ ग्रामसेवा मंडळ , आवृत्ती २ पवनार, वर्धा
4. संत रामदास समर्थ – मनाचे श्लोक

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION


Impact Factor - 6.625

E-ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal



PEER REFEREED & INDEXED JOURNAL

May 2021

Special Issue 267 (B)

Multidisciplinary Issue




## BE ALERT & PREPARE FOR COVID 3rd WAVE

STAY HOME - STAY SAFE - WEAR MASK

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | पालघर जिल्ह्यातील आदिवासी लोकनृत्य | प्रा. राजू शनवार | 05 |
| 2 | लोकसाहित्य आणि दैवत कथा | प्रा. भैय्या पाटील | 10 |
| 3 | सूफी संप्रदाय : मराठी साहित्य | डॉ. अंजली मस्करेन्हस | 13 |
| 4 | संत नामदेवांच्या अभंगातून येणारे ग्रामीण संदर्भ | डॉ. मारोती घुगे | 16 |
| 5 | लक्ष्मण महाराजकृत ज्योतिर्लिंगपर अभंग | डॉ. प्रवीण कारंजकर | 25 |
| 6 | 'पाऊसपाणी' ह्या विठ्ठल वाघांच्या काव्यसंग्रहाचे वेगळेपण | प्रा. गजानन जाधव | 29 |
| 7 | भालचंद्र नेमाडे यांचा देशीवाद : संकल्पना व स्वरूप | डॉ. अमृता डोर्लीकर | 32 |
| 8 | कादंबरी वाङ्मय : संकल्पना व स्वरूप | डॉ. बिभीषण देशमुख | 36 |
| 9 | कविता सावरकरांची | आनंद डूडूल | 45 |
| 10 | 'हाल्या हाल्या दुध दे' कादंबरीचा भाषिक अभ्यास | डॉ. व्ही.बी. राठोड | 49 |
| 11 | ह. मो. मराठे यांच्या 'पक्षिणी' कथासंग्रहातील प्रतिमांचा विचार | यशवंत सुरोशे | 54 |
| 12 | 'वाटा पळवाटा' नाटकातील तीन पिढ्यांतील जीवन संघर्ष | प्रा. आर.डी.कांबळे | 58 |
| 13 | नव्वदोत्तरी मराठी नाटकांचे वेगळेपण | गोपीचंद धनगर, प्रा. शिरीष पाटील | 62 |
| 14 | अस्वस्थ वर्तमानातील चिंता आणि परिवर्तनवादी नाटक | प्रा. भरतकुमार भालेराव | 65 |
| 15 | 'बॉन्डेड' प्रखर समाज वास्तवाची धग | डॉ. एन. व्ही. शिंदे | 74 |
| 16 | कवी भंडारे यांची 'मरणाच्या दारात तारणाऱ्या माणसाची' कृतज्ञता व्यक्त करणारी कविता | डॉ. जितेंद्र गिरासे | 78 |
| 17 | 'झाड फुलांचे लावावे'च्या निमित्ताने | प्रा. माधव कांडणगिरे | 83 |
| 18 | विद्रोहाची कैफियत सौंदर्याचा आविष्कार : 'पऱ्हाटी आणि खापराचे दिवे' | प्रा. जाधव गजानन | 88 |
| 19 | 'काय डेंजर वारा सुटलाय !' या नाटकातील आशय आणि अभिव्यक्तीचे चित्रण | गोपीचंद धनगर, प्रा. शिरीष पाटील | 92 |
| 20 | प्रतिमा जोशी यांच्या कथांचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून आकलन | यशवंत सुरोशे | 95 |
| 21 | तौलनिक साहित्य : प्रवृत्तीगत व मूल्यतत्त्वगत अभ्यास | प्रा. पी. डी.जाधव | 101 |
| 22 | तौलनिक साहित्यसंशोधन पद्धती | श्री. जालिंदर येवले | 106 |
| 23 | हस्तलिखित शास्त्र आणि योग : एक विश्लेषणात्मक अध्ययन | श्री. गौरव कडलग, प्रा. मधुसूदन पेन्ना | 110 |
| 24 | 'पातंजल योगसूत्रे' आणि 'विवेकमार्तंडनुसार' ध्यानाचा अभ्यास | रश्मी कुमट, डॉ. कलापिनी अगस्ती | 118 |
| 25 | मानवी कल्याण साधण्यासाठी तथागत बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची आवश्यकता | प्रा. नारायण गाढे | 125 |
| 26 | कोरडवाहू शेती विकासाचे तंत्र, जाणीव जागृती आणि शासकीय उपक्रम | डॉ. नीता वाणी | 130 |
| 27 | जामनेर तालुक्यातील सीमांत शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा तौलनिक अभ्यास | डॉ. सुरेश ढाके | 134 |
| 28 | राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची मुलभूत तत्त्वे : एक मीमांसा | डॉ. राजेसाहेब मारडकर | 140 |
| 29 | उत्तर महाराष्ट्रातील द्राक्ष उत्पादनाचा आणि विपणनाचा विश्लेषणात्मक अभ्यास | प्रा. शशिकांत खेमनर, प्रा.जे. आर. भोर | 150 |

E-ISSN : 2348-7143
May- 2021


| | | | |
|---|---|---|---|
| 30 | सांप्रदायिकतेचा विकास आणि भारताचा स्वातंत्र्य संघर्ष | प्रा. प्रवीण चव्हाण | 159 |
| 31 | महाराष्ट्राच्या राजकारणात घराणेशाहीची भूमिका | सुवर्णरेखा पहाडे | 165 |
| 32 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबंधी विचार | प्रा. एस.डी. गायकवाड | 167 |
| 33 | भारत बांग्लादेश संबंध | प्रा. शरद वाघ | 169 |
| 34 | नाशिक जिल्ह्यातील आदिवासी महिलांचे मानवाधिकार : एक विश्लेषणात्मक अभ्यास | सुवर्णरेखा पहाडे | 175 |
| 35 | डी.एड. अध्यापक विद्यालयातील विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक मूल्यांचा अभ्यास | डॉ. योगिता बारी | 177 |
| 36 | संसर्गजन्य रोग : व्यक्ती व समाजाची भूमिका | प्रा. नवनाथ शिंदे | 179 |
| 37 | दुष्काळ : संकल्पना व स्वरूप | प्रा. निवृत्ती मिसाळ | 186 |
| 38 | महाराष्ट्र लोकसभा निवडणूक १९८० | प्रा. सुरेश देवरे | 189 |
| 39 | मराठा स्वतंत्र युद्ध : रामाराणी ताराबाई | डॉ. जी.एस. पाटील | 194 |
| 40 | पुंडलीक नायका हांच्या सूर्यसावट नाटकांतल्या प्रतिकांचो अभ्यास | दीपराज सातर्डेकर | 199 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

E-ISSN : 2348-7143
May- 2021

# भालचंद नेमाडे यांचा देशीवाद : संकल्पना व स्वरूप

डॉ. अमृता डोर्लीकर
डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस महाविद्यालय, नागपूर.
भ्रमणध्वनी :९३२६२३४२८२
मेल:empamruta123@rediffmail.com

"देशीवाद" हा मराठी साहित्यामध्ये वेगाने विकसीत होणारा एक प्रवाह आहे. देशीवाद किंवा देशीयता ही संकल्पना साठोत्तरी साहित्यात भालचंद्र नेमाडे यांनी मांडली आहे. त्यातून देश्य जाणिवांचे वेगळेपण, त्यांचे खरे स्वरूप व मोठेपणा प्रतिपादन करण्याचा प्रयत्न नेमाडेंनी केलेला दिसतो. देशीवादाला मराठीतील संतसाहित्य, लोकसाहित्य, आणि अन्य देशी साहित्याच्या परंपरेत शोधण्याचा प्रयत्न केला गेलेला दिसतो देशीयतेचा संबंध भाषा आणि वाङ्मयाशी जुळलेला असल्यामुळे त्या अंगाने या संकल्पनेचा विचार केला गेलेला आहे.

देशीवाद किंवा देशीयता या संकल्पनेचा आविष्कार प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन साहित्यापर्यंत झालेला दिसतो. आज एकूणच सत्याचे व वास्तवाचे भान जागृत झाल्यामुळे ग्रामीण, दलित, आदिवासी इ. अनेक साहित्यप्रकार स्वतंत्रपणे प्रवाहित झालेले दिसतात. 'देशीयता' ही संज्ञा मराठीत प्रथम भालचंद नेमाडे यांनी १९८० मध्ये वापरली आहे. नेमाडे यांनी आपली देशीवादाची भूमिका 'टीकास्वयंवर' या ग्रंथात सडेतोडपणे मांडली आहे. त्यांनी देशीवादाची संकल्पना इंग्रजीतील **Nativism** वरून नव्हे तर देशातल्या पूर्वपरंपरेतून मांडलेली आहे. नेमाडेंनी देशीयतेचे मूल्य एकूणच साहित्य व्यवस्थेत अत्यंत महत्वाचे मानले आहे. कोणत्याही साहित्याचे किंवा वाङ्मयीन चळवळीचे मोल आंतरराष्ट्रीय मूल्यांनी ठरत नसून देशीपणातूनच ठरत असते असे नेमाडे मानतात. त्यांच्यामते कोणताही साहित्यीक आपापल्याकाळापुरता स्वतःच्या समुहाकरिता लिहितो. नेमाडे यांनी मांडलेल्या देशीवादी भूमिकेमुळे संस्कृती या संकल्पनेला महत्व प्राप्त झालेले आहे.

देशीवाद किंवा देशीयता ही संकल्पना प्राचीन व मध्ययुगीन साहित्यात वेगवेगळ्याप्रकारे आविष्कृत झालेली दिसते. दंडीने "रीतारात्मा काव्यस्य" हे सूत्र मांडताना 'काव्यादर्श' या ग्रंथात 'देशी' हा शब्द योजला आहे. तत्सम, तद्भवरतमा, देशी अशा तीन प्रकाराचा उल्लेख केला आहे. दहाव्या शतकापर्यंत देशी व मार्गी या संकल्पना मानल्या जात होत्या. भरतमुनीने आपल्या नाट्यमीमांसेत देशी आणि मार्गी हे शब्द वापरलेले दिसतात देशी म्हणजे विशिष्ट भूप्रदेशाशी निगडीत तर मार्गी म्हणजे मार्ग दाखविणारी देशी हा शब्द अनेक संताच्या साहित्यातही वापरला गेलेला दिसतो. ज्ञानेश्वरांच्या 'ज्ञानेश्वरी' त देशी, देशीयता हा शब्द मराठी बोली भाषा या अर्थाने आलेला असावा. देशी याचा अर्थ लोकभाषेत लिहिलेली असा होत असावा.

देशियेचेनि नागरपणे । शांत शृंगाराने जिणे ॥

तरी ओवियां की होती लेणे । साहित्यासी ॥

(अ. १० : ओ.४२२)

देशी भाषेत मी कथा निरूपण करणार आहे. त्या मराठी भाषेतील सौदर्यमुळे शांतरस शृंगार रसावर फिका पडेल माझ्या ओव्या साहित्यालाही अलंकारा प्रमाणे सुशोभित करतील असे संत ज्ञानेश्वर म्हणतात. याठिकाणी त्यांनी देशीयतेचा गौरव केलेला दिसतो. संत एकनाथांनी 'संस्कृत वाणी देवे केली । प्राकृत काय चोरापासून आली?' या ओवीतही देशी भाषेचा पुरस्कार केलेला दिसतो. "माझा मराठाची बोलू कवतुके" ही भावना तर "अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे अरसिके मेळवीन" ही जणू एक प्रतिज्ञाच होती. तुकारामांच्या अभंगांमध्येही देशी लोकभाषेचा प्रभाव होता. हे त्यांच्या अभंगाच्या लोकप्रियतेतून प्रत्ययास येते. चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाचे तत्वज्ञान मराठी भाषेतच सांगितले आहे' महाराष्ट्री वसावे आणि मराठी बोलावे" असे ते म्हणतात. फादर स्टीफन्सने 'खिस्त पुराणा'तून मराठीचा गौरव केलेला आहे.' भाषांमध्ये मानू थोरू मराठिदेशी", 'भाषांमाजी चोखळा भाषा मराठी भाषांमाजी साजिरी मराठिया" यातून

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 267 (B) : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
May- 2021

मराठी भाषेचा गौरव केलेला दिसतो. यासर्वांनी आपल्या देश्य भाषेला महत्त्व दिले. यातून संतानी आपल्या साहित्यातून केलेला देशीयतेचा पुरस्कार प्रत्ययास येते.

'देशीवाद' किंवा 'देशीयता' ही संकल्पना पाश्चात्य 'नेटिव्हिजम' या शब्दांशी जोडली जाते. इंग्रजीतील 'नेटिव्ह' शब्दाचे मूळ लॅटिन 'नेटिव्हस' या शब्दात आढळते. 'नेटिव्ह' या शब्दाचा अर्थ भोळा भाबडा नागरिक किंवा खेडूत आपल्या जमिनीशी इमान राखणारा असा आहे. भारतीय संदर्भात देशीयतेच्या बाबतीत हाच अर्थ घेतल्या गेलेला दिसतो. विसाव्या शतकात इंग्रजांच्या काळातच मराठी साहित्यातही देशीयवादी विचार रुजविण्याचे प्रयत्न सुरू झाले त्यात का. बा. मराठे यांचे "नावल आणि नाटक" तसेच इतिहासाचार्य राजवाडेंच्या "कादंबरी" या दोन निबंधांनी देशीयवादी विचारांची मराठी साहित्यात मुहूर्तमेढ रोवली .देशीवादावरून साहित्यात दोन वर्ग तयार झाले. एक वर्ग देशीयवादाचा पुरस्कार करणारा तर दुसरा वर्ग ही संकुचित आणि अस्पष्ट अशी संकल्पना असून देशीयवादी अशी विचार प्रणालीच अस्तित्वात नाही अशा मताचा एक वर्ग आहे. रा.भा. पाटणकर, म.सु. पाटील हे विचारवंत या पहिल्या वर्गाचे प्रतिनिधित्व करतात तर आनंद पाटील, हरिश्चंद्र थोरात, विलास सारंग आदी लोक देशीयवाद ही संकल्पना संभ्रम निर्माण करणारी असून ती संकुचित असल्याचे प्रतिपादन करतात अशी वर्गवारी किशोर सानपानी आपल्या 'भालचंद्र नेमाडे यांची समीक्षा' या ग्रंथात केलेली आहे.

किशोर सानप यांच्यामते देशीपणा, देशीकरण, देशीयता आणि देशीवाद, देशीयतावाद अशा चार टप्यांवर त्यांनी 'देशीयवाद' या संकल्पनेचा पुरस्कार केलेला आहे.

**देशी–देश्य** :– वस्तू, कला, साहित्य, संस्कृतीची ओळख आणि अस्तित्व सिद्ध करणारी संज्ञा आहे.

**देशीपणा** :– देशी – देश्य वस्तू, साहित्य संस्कृती ह्यात देशीपणा असतो. देशीपणा हीच देश्य असण्याची खूण असते म्हणून देश्य, देशी आणि देशीपणा ह्या पूरक संज्ञा आहेत.

**देशीकरण** :– आपले देश्यत्व , देशीपणा कायम ठेवून जेव्हा एखादी संस्कृती परसंस्कृतीच्या मौलिक घटकांना आपल्या प्रमाणकांच्या जोखडातून स्विकारते, तेव्हा देशीकरणाची प्रक्रिया स्वाभाविकपणे पार पडत असते.

**देशीयता** :– ही गुणात्मक संकल्पना समजली जाते. कारण देशीयतेत मुल्यव्यूह अध्याहूत असतो. देशीयतेचा मूल्यव्यूह हा बहुमुखी आणि बहुगुणी असतो. त्यात भूमी, भौगोलिकता मातृभाषा, संस्कृती, परंपरा, लोकजीवन आदींचा एकत्रितपणे विचार अपेक्षित असतो.

देशीयवाद या संकल्पनेचा विचार करताना किशोर सानप यांनी "देशीयवाद जागतिकीकरण आणि मराठी कादंबरी" या आपल्या निबंधात देशीयतेचा मूल्यविचार हा केंद्रस्थानी असतो असे मानले म्हणूनच या संकल्पनेला मूल्यविषयक संकल्पना मानायला हवी असे म्हणताना त्यांनी मूल्ययुक्त पारिभाषिक शब्दांना मूल्यसंज्ञा मानायला सांगितले आहे ही संकल्पना देशी वस्तू, कला, साहित्य आणि संस्कृतीची ओळख जपणारी संज्ञा आहे. उदा. खेड्यातील लोकांच्या वेशभुषा, अजिंठ्याची चित्रशैली, भारतीय संगीत, आदिवासी कला संस्कृतीची आधुनिक आणि नैतिक बैठक इ. चा विचार केलेला आहे.

**देशीवाद आणि देशीयवाद** :–

देशी या शब्दाशी वाद जोडला की देशीवाद होतो. केवळ देशी असणे आणि देशीपणाचा वाद निर्माण करणे हा अर्थ संदिग्ध आहे. देशीयतेचा आग्रही मुल्यविचार मांडणारी संकल्पना म्हणजे देशीयवाद होय.

**देशीयतेच्या संदर्भात** :–

"देशीयवाद ही अशी मूल्य व्यवस्था आहे की जिच्यात भूमितत्व भौगोलिकता, भाषा, वंश, धर्म–आध्यात्मिकता, पारलौकिकता, परंपरा, ऐतिहासिकता, संस्कृती संयोग, संस्कृती, देशीकरण स्थितिशीलता– गतिशीलता, आधुनिकता आक्रमकता, ननैतिकता आदी मूल्यांना प्रेरित आणि प्रभावित करून सामाजिक माध्यमातून आणि कला माध्यमातून त्यांची

E-ISSN : 2348-7143
May- 2021

एकसमयदेच्छेदे करून आविष्कार करणारी मूल्यनिष्ठ आणि मूल्यनिर्मिती करणारी मानवी समूहाला अस्मिता, अस्तित्व, आत्मतेज, आत्मसन्मान, जाज्वल्यवृत्तीचं तीव्र आणि आग्रही भान देणारी विचारप्रणाली होय."[3] देशीयतेची ही व्याख्या देशीवादाचे विस्तृत भूमिका स्पष्ट करते.

भालचंद्र नेमाडे देशीयतेची संकल्पना साहित्यात रुजविण्यासाठी देशीयतेचा पुरस्कार करताना दिसतात."देशी याचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे असा प्रायः होतो वस्तुतः देशीपणा ही अत्यंत स्वयंभू झाडाझुडपांसारखी सोशिकपणे आपापल्या जागेवर उगवणारी व टिकून राहणारी संकल्पना आहे."[2] अशी भूमिका मांडताना दिसतात या संदर्भात पुढे नेमाडे म्हणतात "देशीपणा हा अशा भावना, जाणीवा, विचार, प्रबोधन आणि स्मृती यांच्या पुंजाला आवाहन करतो, जी विशिष्ट भूप्रदेशाच्या साहचर्यानेच वाढत आलेला असतो. त्यामुळे देशीपणाच्या जाणिवेत भावनाप्रधान काव्यात्मता अधिक असते, तर विवेकशीलता त्यामानाने कमी असते. परंपराभिमुखता जास्त आणि आधुनिकता कमी असते तसेच तिचे तोंड भविष्यकाळापेक्षा भूतकाळाकडे जास्त वळलेले असते. देशीपणा हा मागच्या व पुढच्या सबंध समूहगणाचा प्रतिसाद असतो. संबंध समूहाच्या वंशाची ती जीवनशैली असते समाजाची सामूहिक चिंतनशक्ती आणि भावशक्ती देशीपणात प्रकट होते स्थूलमानाने पाहता देशीपणाचे तत्व गतिशील असण्याऐवजी स्थितिशीलतेच्या जवळ जाणारे वाटते."[4] ही देशीयतेच्या बाबतीत नेमाडेची भूमिका येथे स्पष्ट होते.

देशीयवाद ही संकल्पना केवळ साहित्यापुरती मर्यादित नाही तर समाजशास्त्रीय, मानववंशशास्त्रीय संकल्पनाही मानली गेलेली आहे. देशीयता ही समाजाच्या प्रत्यक्ष जगण्याशी निगडीत असलेली अपरिहार्य प्रक्रिया आहे देशीयतेचा जीवन व्यवहारातून होणारा आविष्कारही तितकाच सहजस्वभावी असतो असे या संदर्भात म्हणता येते.

**देशीवादाचे स्वरूप :–**

देशीयवाद किंवा देशीवाद ही बहु स्तरीय – बहुकेंद्री संकल्पना मानली गेली आहे. मूल्य संघर्ष हा देशीयतेचा आवश्यक घटक असून तो देशीयतेला समाज सन्मुख आणि काल सन्मुख करण्यासाठी उपयोगी ठरतो असे म्हटले गेले आहे. मानवी जगण्याला समृद्ध करीत देशीयता अमुर्तपणे तर कधी जाणीवांच्या रुपात आविष्कृत होताना दिसते आणि तिचा परिणाम कला, साहित्य आदी सांस्कृतिक पर्यावरणावर होताना दिसतो. त्यातूनच कलांमध्ये देशीयता येत असते असे मानले जाते. माणसाला व्यक्तिगत आणि सामुहिकतेच्या देशीय वर्तुळात त्याचे मानवी अस्तित्व घडविण्यास उपकारक असणारी देशीयता ही महाव्यवस्था आहे असे देशीयतेच्या संदर्भात म्हटले गेले आहे.

भालचंद्र नेमाडे यांना देशकाल परिस्थितीचे आणि भोवतालच्या समाजाचे त्यातील परंपराचे आणि मूल्यांचे महत्व प्राथमिक वाटून आंतरराष्ट्रीय मूल्यांना महत्व देवून देशीयतेला संकुचित ठरविणे भालचंद्र नेमाडेंना मान्य नाही त्यामुळे त्यांची देशीयतेची संकल्पना 'स्वदेशी' चाच शैलीनिष्ठ आविष्कार आहे असे म्हटले जाते मनुष्य ज्या भूमीत प्रदेशात जन्माला येतो त्या भूमीच्या वातावरणाचा प्रभाव त्याच्यावर पडतो आणि त्यातूनच त्याची जडणघडण होते म्हणजेच व्यक्तीप्रमाणेच त्या त्या भूभागाचेही महत्व देशीयतेतून सिद्ध होताना दिसते. त्यामुळे देशीयता हे मूल्य परकीय मूल्यांना नकार देते तसेच दुसऱ्या संस्कृतीत वाढलेल्या देशीय असणाऱ्यांनाही नकार देते असे देशीयतेच्या संदर्भात म्हणता येते.

संस्कृती संयोग देशीय मुल्यांमध्ये कशाप्रकारे दिसतो यासंदर्भात भालचंद्र नेमाडे म्हणतात," बाहेरून आदळणाऱ्या विविध मूर्त आणि अमूर्त गोष्टीचे देशीकरण करून कोणत्याही जोमदार संस्कृतीचे पोत भक्कम होत जाते ह्या प्रक्रियेमुळेच मानवबाहय विश्वातील घटना, सचेतन व अचेतन वर प्राणी आणि वनस्पती इत्यादींना संस्कृती आपल्या पोटात घेत असते, देशीकरणाची ही प्रक्रिया अव्याहत चालू असते. नव्या साहित्यीकाला आपली मुळे परिसराभिमुख परंपरेत खोलवर रुजलेली असल्याचे आपोआप जाणवते"[5]. देशीयतेच्या संदर्भात भालचंद्र नेमाडे यांचे वरील विचार यथायोग्य वाटतात. देशीयतेचा उघडपणे पुरस्कार न करणाऱ्यांवर टीका करताना भालचंद्र नेमाडे म्हणतात." देशीयता ही संकल्पना राष्ट्रीयता, आंतरराष्टीयता, जागतिकीकरण अशा सर्वच व्यापक अर्थाने वापरल्या जाणाऱ्या परंतु मुळात ह्यांच्या माध्यमातून छुपे राजकारण करणाऱ्या मूठभरांच्या गनिमीकाव्याचा भाग असतो." अशी प्रतिक्रिया ते देतात.

देशीयता हे स्वयंभू आणि सार्वत्रिक मूल्य असून देशीयतेचा आविष्कार हा देशीय वादी चळवळी प्रमाणेच आपले स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करणारा असतो असे म्हणण्यास वावगे होणार नाही." हिंदुस्थानातील वाढत्या फॅसिस्ट हिंदूत्ववादाशी यशस्वी मुकाबला करू शकेल असा एकमेव विचार"[3] म्हणून देशीयवादाचा गौरव केला आहे. या देशीयवादावरच्या अभिप्रायातूनच देशीयतेचे सामाजिक आणि वाङ्मयीन महत्व सिद्ध होताना दिसते.

"मराठीच्या नशिबी आपल्या स्वत्वातच पूर्णी गुरफटून घेऊन केंद्रोत्सर्गी सौंदर्यव्यवस्थांकडे पूर्ण दूर्लक्ष करणारी उच्च दर्जाची आत्ममग्न देशी निर्मिती घडवणारा सुवर्णकाळ कधी येईल तेव्हा येवो, तोपर्यंत देशीवादाला मरण नाही".[4] या ऑलिव्हर पेरी आणि भालचंद्र नेमाडे यांनी दिलेल्या प्रतिक्रिया आजच्या युगात देशीवादाचे महत्व सिध्द करणाऱ्या आहेत असे म्हणता येते.

देशीयता ही स्वयंसिद्ध संकल्पना मानली जाते. देशीवाद हा एक नवीन प्रवाह भालचंद नेमाडे यांनी साहित्यात आणलेला आहे. देशीयता ही विचारप्रणाली आणि मूल्यसंकल्पना मानली गेली आहे तिचा संबंध साहित्यासोबतच मानवंशशास्त्राशी आणि समाजशास्त्राशी जुळलेला दिसून येतो. आपली सांस्कृतिक अस्मिता आणि अस्तित्वासाठी आग्रही भूमिका बाळगणे ही देशीवादाची संकल्पना मानली गेली पाहिजे असे या संदर्भात म्हणता येते.

संदर्भ ग्रंथ :–

1. चंद्रकांत पाटील – "उद्धृत आणि म्हणूनच", प्रतिमा प्रकाशन, पुणे.
2. भालचंद्र नेमाडे – "टीका स्वयंवर," साकेत प्रकाशन, औरंगाबाद , 3 नि. पृ.८०
3. तत्रैव
4. तत्रैव
5. भालचंद्र नेमाडे – "साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण" – साकेत प्रकाशन – उ. नि. पृ.८
6. किशोर सानप – "भालचंद्र नेमाडे यांची समीक्षा", – साकेत प्रकाशन, पहिली आवृत्ती – २००५.

IMPACT FACTOR (SJIF) 2021-7.380

SRJIS

ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL - JUNE,2021, VOL- 10, ISSUE-55

## राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक, मराठी विभाग, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, (जि. चंद्रपूर) महा.

**मुख्य-संपादक**
डॉ. सुबोध कुमार सिंह
प्राचार्य

**संपादक**
डॉ. जयश्री शास्त्री
मराठी विभाग प्रमुख

अनुवादित



स्त्रीवादी



अदिवासी



ग्रामीण



दलित



## नव्वदोत्तरी मराठी साहित्य

## समकालीन मराठी साहित्य : चिंतन आणि चिकित्सा

नाटक

कादंबरी

कविता

कथा

समीक्षा

ललित

| | | |
|---|---|---|
| 25 | **समकालीन मराठी दलित कविता**<br>*डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे* | 174-182 |
| 26 | **समकालीन आदिवासी साहित्य**<br>*अंकुश माणिक सोनुने* | 183-186 |
| 27 | **नव्वदोत्तरी दलित—आंबेडकरी कथा**<br>*अमित वासुदेव गजभिये* | 187-201 |
| 28 | **समकालीन मराठी कादंबरी**<br>*सहा. प्रा. उषा सिताराम पाटील* | 202-205 |
| 29 | **समकालीन आदिवासी कादंबरी**<br>*श्री. हर्षल गेडाम, डॉ. कोमल ठाकरे* | 206-215 |
| 30 | **समकालीन कवितेच्या प्रवाहात नवदोत्तरीतील स्त्री कवयित्रीच्या स्त्रीवादी कविता**<br>*डॉ. अमृता डोर्लीकर* | 216-226 |
| 31 | **समकालीन मराठी साहित्य:चिंतन आणि चिकित्सा**<br>*भूषण प्रदीपकुमार देशमुख, डॉ. प्रा. वंदना भोयर* | 227-231 |
| 32 | **स्त्रीचे वस्तूकरण म्हणजे हरण**<br>*डॉ. जयदेवी पवार* | 232-235 |
| 33 | **समकालीन समाजजीवनाचे आकलन मांडणारे कादंबरीकार रंगनाथ पठारे**<br>*डॉ. कोमल ठाकरे* | 236-243 |
| 34 | दलित कांदबरीतून प्रकट होणारा आंबेडकरी विचार :मिमांसा<br>*विकास गवई* | 244-247 |
| 35 | समकालीन आदिवासी कादंबरीतील जीवनदर्शन<br>*प्रा. चिन्नना मेंगाजी चालुरकर* | 248-253 |
| 36 | **शेतकरी जीवनाचा सर्वांगीण वेध घेणारी कादंबरी : बारोमास**<br>*डॉ. संभाजी शिवाजी जाधव* | 254-256 |
| 37 | समकालीन वैदर्भीय समिक्षक आणि समीक्षा<br>*प्रा. डॉ. बदु चौधरी* | 257-260 |
| 38 | दलित कविता आणि समकालिन वास्तव<br>*डॉ. जगदिश्वर मेश्राम* | 261-265 |

## समकालीन कवितेच्या प्रवाहात नवदोत्तरीतील स्त्री कवयित्रीच्या स्त्रीवादी कविता

डॉ. अमृता डोर्लीकर
*डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालय, नागपूर*

इ.स. १९५० ते १९७५ हा कालखंड म्हणजे नवकाव्याचा आरंभ मानला जातो. स्त्री मुक्तीच्या चळवळीचा आरंभ ही या काळात झालेला आहे. या काळात स्त्री जाणीवा अधिक प्रगल्भ झालेल्या दिसतात. स्त्रीने बाईपणाची कात टाकत प्रतिमा, प्रतिके,रुपके इ.रुपातून जाणिवांचे अनेकविध पदर याकाळातील कवितेतून व्यक्त होतात. या कालखंडातील महत्वाच्या कवयित्री म्हणजे इंदिरा संत, पद्मा गोळे, शांता शेळके, संजीवनी मराठे, शिरीष पै इ. होत. त्यांच्या कविता मुख्यत: सौंदर्यवादी जाणिवा व्यक्त करणाऱ्या आहेत शिवाय त्यात शहरी, मध्यमवर्गीय स्त्री जाणिवांच्या परंपरागत चौकटीत राहूनच स्त्रीची जुळलेली नाळ या कवितेतून प्रगट झालेली दिसते. १९७५ नंतर प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, रजनी परुळेकर, अश्विनी धोंगडे, हिरा बनसोडे, मल्लिका अमरशेख, नीरजा, आसावरी काकडे, अंजली कुळकर्णी इ. कवयित्री या कालखंडात मोठ्या प्रमाणात काव्य लेखन करून स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कवितेत संवेदना आणि जाणिवा यामध्ये वेगळेपण आढळते. या कालखंडातील कविता अधिक डोळस होताना दिसते १९९०नंतरही यातील बऱ्याच कवयित्री सातत्याने कविता लेखन करीत आहे. प्रस्तुत शोधनिबंधात नवदोत्तरी कालखंडातील स्त्री कवयित्रींच्या कवितेतील 'स्त्री जाणीवा' चा परामर्श घेतलेला आहे.

नवदोत्तरी कविता प्रवाहामध्ये रजनी परुळेकर यांच्या कवितामध्ये स्त्री जीवनातील आजचे प्रखर वास्तव व्यक्त होताना दिसते. त्यांच्या कवितांमध्ये 'मी' चे अस्तित्व आणि या अस्तित्वाभोवती असणारी विविध माणसे कवितेतून प्रकट होताना दिसतात. स्त्रियांच्या भावविश्वावर भरपूर कविता लिहिल्या आहेत त्यांच्या कवितांपैकी 'पुन्हा दीर्घ कवितामधील' मिलाड, स्नेहसंमेलन, रिसेप्शन आणि स्वागत, फेर, एका विद्यार्थिनीस, 'स्विकार', 'मधील', 'शोध', 'सोबत', 'भिती', 'बी', 'निरोप', 'वाळूवर दोघीजणी', 'राणी', 'सभेवर नग्न सत्य', 'वेश्यांच्या वस्तीजवळ', 'तुझ्या कानातली झुबरं', 'तिचा चेहरा', 'डायरीतल्या शिरगणतीत', 'आणि पहाट होईल', 'माझी कुरूप मनोस्वप्न', 'येते ग', अशा अनेक कवितामधून रजनी परुळेकर यांनी स्त्रियांच्या भावना, दु:ख, वेदना पुरुषांचे अत्याचार, समाजाने त्यांना आखून दिलेल्या चौकटी, स्त्रीला दुसऱ्या स्त्री विषयी वाटणारी मैत्री, आपुलकी, स्नेह, सहानुभूती अशा अनेक छटा त्यांनी काव्यातून व्यक्त केलेल्या दिसतात.रजनी परुळेकर यांच्या कवितेसंदर्भात

प्रभा गणोरकर म्हणतात, 'मी' चे अस्तित्व आणि या अस्तित्वाभोवती असणारी विविध माणसे याच्यातल्या क्रिया प्रति क्रिया याने गुंतागुंतीचे आकार गुंफलेले असतात'"

याच समकालीन कविता प्रवाहातील दुसऱ्या महत्वाच्या कवयित्री म्हणजे मलिका अमरशेख यांचा (२०००) मध्ये प्रसिद्ध झालेला 'महानगर' हा काव्यसंग्रह आणि (२००६) मध्ये 'माणूसपणाचं भिंग बदलल्यावर' या दोन्ही कविता संग्रहातील प्रत्येक कविता संवेदना, भावना आणि विचार या तिन्हींचा स्फोट घडवणाऱ्या कविता आहेत मलिका अमरशेख यांच्या कवितेसंदर्भात प्रभा गणोरकर म्हणतात, 'मलिका अमरशेख' सारख्या विलक्षण प्रखर संवेदनक्षमतेने कविता लिहिणारी 'स्त्री' च्या नजरेने 'स्त्री' च्या संवेदनक्षमतेने अतिशय भेदकपणे भोवतीच्या वास्तवाचा आणि स्वत:च्या आंतर विश्वाचा वेध घेते"

'रस्त्याला डाव्या हाताने बाजूला करून
उजव्या हाताने चूल पेटवणारी बाई ..........
न् भिरीभिरी फिरणारी अनाथ पोरं — — — '

(महानगर : पृ. ७)

स्त्रीत्वाच्या दुर्दशेचे वर्णन करताना कवयित्री मल्लिका अमरशेख म्हणतात —

'जगातल्या कुठल्याही बाईसारखीच
अवघड, दुर्गम,
जी जगते,
पणाला लावून अवघे आयुष्य
दु:खाला दावणीला बांधून
ती पेलते कृष्णाइतक्याच सहजतेनं
हा आधिभौतिक डोलारा — — — —

(माणूसपणाचं भिंग बदलल्यावर : पृ. ८८)

पुरुषी प्रधान समाज बाईचे सामर्थ्य समजून न घेता तिची उपेक्षाच करीत आला आहे. तिचे शरीर म्हणजे एक वस्तू आहे. एवढेच तिला महत्व आहे.

साध्या जवळच्या बायका
न् त्यांची मनं पाहू शकत नाही तुम्ही? — — —

(महानगर : पृ. ३८)

याशब्दात कवयित्री आपल्या भावना व्यक्त करतात याच काळातील महत्वाची कवयित्री म्हणजे अरुणा ढेरे याचे 'प्रारंभ' (१९८७), यक्षराज (१९८७), हे काव्यसंग्रह प्रकाशित झाले. १९९० नंतर 'मंत्राक्षर' (१९९०), 'निरंजन' (१९९४), 'जावे जन्माकडे' (१९९८), हे कवितासंग्रह प्रकाशित झाले या संग्रहातून त्यांच्या जाणिवांच्या विकासाच्या वाटा स्पष्ट होतात अरुणा ढेरे

याच्या कवितेसंदर्भात प्रभा गणोरकर म्हणतात, 'त्यांच्या कवितेमध्ये लोकगीते आणि आधुनिक काळातील सौंदर्यवादी जाणीवा व्यक्त होतात. त्यांच्या कवितेने स्त्रीच्या आदिम दु:खाशी स्वत:ची नाळ जोडून घेत स्त्री पुरुष नात्यांच्या नव्या दृष्टीने शोध घेत स्त्रीवादी जाणिवेच्या काही छटा त्यांच्या काव्यात आढळून येतात आत्मलक्ष्यी कवितेकडून स्त्रीलक्ष्यी कवितेकडे त्यांचा काव्यप्रवास सरकत जातो'[3]. अरुणा ढेरे यांच्या बहुतांश कविता स्त्री पुरुष नात्यांच्या वेगवेगळ्या छटा दाखवणाऱ्या आहेत

'सरली वो रात, बाई दळण घालते
ओवी काजळ झोपेची, जात्या ईश्वरा सांगते
गरगरा हात, सरसरा गळे पीठ
मुके दु:ख पाडीवर, शांत चोखताही गूढ
जे जे वाटे हवे, केर त्याचाच लोटते
बाई घराघरासाठी मन मोकळे करते'

(मंत्राक्षर : पृ.६)

किंवा

'भर माध्यान्ही
नदीवर खळबळून जातात
चुबकून निघतात, धुव्यागत बायका
ओल्या दु:खाचे पिळे घेऊन घराकडी परतून
येतात — — — — —
चुलीतल्या जाळाबरोबर
मग धगधगून उठतात बायका — — — —'

(निरंजन: पृ.१०)

अरुणा ढेरे यांच्या कवितावर लोकगीतांचा संस्कार झालेला दिसतो. जीवनातील सुख दु:खावर प्रेम करणारी, नात्यांचा शोध घेणारी, चिंतनशीलतेकडे झुकणारी अशी ही कवयित्री आहे. देशीपरंपरा आणि संस्कृती यामुळे त्यांची कविता समकालीन कवितेहून वेगळे अस्तित्व प्रस्थापित करते

'स्त्री' असण्याचे स्वतंत्र भान घेऊन जगत असताना स्वत:च्या आणि इतर स्त्रियांच्या जीवनासंबंधी त्यांच्या सुखदु:खासंबंधीचे चिंतन कवितेतून करणारी कवयित्री म्हणजे उषा मेहता त्यांचा 'आभास' (१९८३) मध्ये प्रकाशित झालेला पहिला कवितासंग्रह. त्यानंतर 'अरूप'हा कविता संग्रह (१९९८) मध्ये प्रकाशित झाला. त्यांच्या कवितेमध्ये

'मैत्री, प्रेम वगैरे वगैरे ओलांडून
आघात, प्रत्याघात, विश्वासघात आणि घातही
अधूनमधून
असं तर किती तरी – – – – – उंबरठ्यबाहेर
आत आणखी काही जीवघेण्या ठेचा – – – –
(अमूप पृ.५३)

किंवा

'सोसून देखील सारं सारं मुक्या जनावरा सारखं
पाहू या की आता जरा जगून माणसासारखं'

असे म्हणणारी कणखर स्त्री आहे घुसमट सहन करणारी स्त्री ही आहे. कोणत्याही परिस्थितीत जगत असताना स्वतःच्या मुलांचा विचार करीत राहणारी स्त्री ची रूपे त्यांनी अनेक कवितांमधून रंगविलेली आहे.

१९९०नतरच्या कवितेमध्ये नव्या पिढीने अत्यंत मोकळेपणाने आणि विविध तऱ्हांनी आपले जीवनानुभव आविष्कृत केले आहेत. जगण्यातील प्रत्येक क्षण या कवयित्रीने कवितेतून व्यक्त केलेला दिसतो. कवयित्रीन्च्या या नव्यापिढीने स्त्री पुरुष नात्यातले सुक्ष्म ताण आणि धागे समजून घेतलेले आहेत. स्त्री पुरुष नात्याची गरज या नव्या पिढीने निःसंकोचपणे स्विकारलेली दिसते.

याच कालखंडातील कवयित्री हेमा लेले यांचा' क्षण अस्तित्वाचे' (२०००) मध्ये प्रकाशित झालेल्या कविता संग्रहात त्यांनी स्वतःच्या 'बाईमाणूस' असण्याचे आणि त्या जाणिवेसह जगताना मिळणाऱ्या नैसर्गिक बळाचे, सौंदर्याचे, भावनेचे आणि आसक्तीचे भाव व्यक्त करणारा संग्रह आहे. 'स्त्री' त्वाचे आवरण झुगारून आयुष्याची आसक्ती या संग्रहात व्यक्त झालेली दिसते.

'एकाच जन्मात मी किती वेळा जन्मले'
याचा प्रत्यय घेऊन
'ईश्वराचे दशावतार स्वतःत मीच सामावून घेतले
मीच ती – – – – आदिशक्ती' आदिमाया 'आद्यस्वरूपिनी'
(क्षण अस्तित्वाचे)

हा विलक्षण प्रत्यय व्यक्त करणाऱ्या स्त्री जीवनाच्या सर्व शारिरीक, मानसिक, आत्मिक अवस्था प्रस्तूत संग्रहात हेमा लेले यांनी व्यक्त केल्या आहेत. 'स्त्री' म्हणून जगताना येणाऱ्या सर्व भूमिका मनापासून आवडीने आणि आनंदाने पार पाडण्यात धन्यता मानणारी ही स्त्री आहे.

याउलट जीवन जगताना जाणिवाचे विस्तृत होत गेलेले प्रदेश आसावरी काकडे यांच्या कवितातून आढळतात. त्यांचे १९९० नंतर एकूण सहा कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत 'आरसा' (१९९०), 'आकाश' (१९९१), 'लाहो' (१९९५), 'मी एक दर्शनबिंदू' (१९९९), 'रहाटाला पुन्हा गती दिलीय मी' (२००५), 'स्त्री असण्याचा अर्थ' (२००६) या सहा संग्रहातून त्यांनी जीवन जगत असताना मनात भावना, विचार, चिंतन याची अनेकविध स्पंदने कवितेत आविष्कृत झालेली आहेत. त्यांच्यामते ''कोणत्याही रुपातली प्रत्येक प्रामाणिक कविता अभिव्यक्ती असते 'एकेका आकलनाची, ते आकलन असतं, स्वत विषयीच, नात्याविषयीच समाजस्थितीच, निसर्गाचे किंवा या सगळयाच्या मुळाशी असू शकेल अशा एखाद्या तत्वाचं — — —— —'' (मनोगत रहाटाला पुन्हा गती दिलीय मी)

कवयित्री आसावरी काकडे याच्या कवितामधून जीवनविषयक आकलन आणि जीवनातल्या विविध अनुभवाविषयीचे चिंतन व्यक्त झालेले आहे.

परीघ नसलेल्या वर्तुळाच्या
केंद्रबिंदूशी मी,
सर्वांगाला जाणिवेचे डोळे
भोवती असंख्य अस्थिर वाटा — — —

(आरसा पृ. २१)

किंवा

'जुनी होतातच नाती — — — जुनी झाली की विरतात — —
कितीही काळजीपूर्वक विणलेली असली तरी
— — — — यात दोस कुणाचाच नाही !
आपण समजूनच घ्यायला हवं
की नात्यानाही आयुष्य असतं !'

(लाहो पृ. ४२—४३)

या कवितेतून नात्यांचा सुक्ष्म शोध, त्या नात्याविषयीच्या सत्याची जाणीव व्यक्त होताना दिसते.

एक प्रकारचा शांत समंजस सूर आसावरी काकडे यांच्या कवितेत दिसुन येतो.

'केंव्हा सपेल' —या कवितेत,

तू तिथे कंबरे इतक्या पाण्यात उभी राहून
रोखू पाहते आहेस — — — — — —

(रहाटाला पृ. ७७)

असा मेधा पाटकर यांचा संदर्भ येतो. याच व्यापक संवेदनशीलतेने आसावरी काकडे स्त्री जीवनातील दु:खाकडे पाहतात. स्त्रियांचे जीवन, त्यांचे प्रश्न, त्यांच्या समस्या यांच्या संबंधीच्या उद्‌गारानी समाजजीवन ढवळून निघते. 'स्त्रीचे', 'स्त्री' म्हणून असलेले सामर्थ्य विपरीत स्थितीत ही उभी राहते. त्यांच्या कवितेतल्या स्त्रिया आई प्रमाणेच निमूटपणे सहन करणाऱ्या जगण्याचा वारसा जपणाऱ्या आहेत.प्रस्तुत संग्रहात वेगवेगळी संकटे, आव्हाने, समस्या यांना तोंड देत, स्वत:चा शोध घेत स्वत:चे सामर्थ्यपणाला लावून जगणाऱ्या अनेक स्त्रियांच्या कहान्या कवितेच्या रुपात आलेल्या आहेत.

१९९० नंतरच्या काळात स्त्रियांच्या दु:खाच्या, पुरुषांनी त्यांच्यावर लादलेल्या अत्याचारावर अनेक कविता लिहिलेल्या आहेत 'स्त्री' म्हणून भोवतीच्या सामाजिक परिवेशात पुरुषप्रधान व्यवस्थेत जगताना येणारी अस्वस्थता अंजली कुलकर्णी यांच्या कवितेत व्यक्त होते. आजच्या नव्या जाणिवासह जगणारी, परंपरेने दिलेल्या गोष्टी नाकारणारी ही स्त्री पुरातन संस्कृतीलाही नकार देते.

'पापपुण्याच्या भित्र्या संकेतांनी
अधोरेखित केलेली
इथल्या संस्कृतीची संचित पावले
तू या संस्कृतीकडून काय मागते आहेस ?
सार काही पाचवीलाच पूजल्याप्रमाणे
इथल्या प्रत्येकीच जगणं मरणं' — — — —
(मी: एक स्त्री जातीय अस्वस्थ आत्मा. पृ. २८)

कवयित्री अंजली कुलकर्णी बंडाची भाषा उच्चारतानाच
'मी करणार नाही अग्निप्रवेश
देणार नाही कसलीही परिक्षा — — —
मी वसवणार आहे नवा गाव — — — —
आज बागडणाऱ्या रानपऱ्यांच्या
मुक्त उद्यासाठी — — — —
(संबद्ध : पृ.२३)

कवयित्री अत्यंत संवेदनशीलतेने सभोवतालच्या गोष्टीकडे पाहताना दिसतात.

नवदोत्तरी साहित्यात स्वत:च्या कवितेचा स्पष्ट असा ठसा उमटवणाऱ्या कवयित्री म्हणजे नीरजा, प्रज्ञा लोखंडे आणि कविता महाजन. नीरजा यांनी आपल्या तीन कवितासंग्रहातून प्रामुख्याने स्त्रीकेंद्री आणि स्त्रीवादी जाणिवेची प्रखर कविता लिहिली. त्यांच्या 'निरन्वय'

(१९८५) या संग्रहात त्यांच्या कवितेचा समकालीन कवयित्रीपेक्षा वेगळया कविता लिहिल्या आहेत. संस्कृतीच्या जुन्या संकेताना त्यांच्या कवितेतील स्त्री जुमानत नाही. नीरजा यांच्या कविता उपरोधिक, उपहासात्मक शब्दांची तीक्ष्ण धार असणाऱ्या आहेत. आजची स्त्री नवीन बळ, ताकद घेऊन कवयित्री नीरजा यांच्या कवितेत येते संस्कृती विरुद्ध केलेल्या बंडाचे परिणामही कवयित्री नीरजा यांनी व्यक्त केले आहे.

'मी मोकळे केले शब्दाना सोनेरी पिंजऱ्यातून
तर रुसून बसले पैंजण दाराआड किणकिणणारे
शब्दाच्या भाले बर्च्या जेव्हा उगारल्या,
तथाकथित पुरुषार्थावर
तर चुलीतली ओली लाकडेही पेटून उठली – –
(वेणा : पृ.६७)

स्त्रीची पत्नी, माता या भूमिकांचे परंपरेने, संस्कृतीने केलेले उदात्तीकरण नीरजा यांनी तीक्ष्ण शब्दात खोडून काढलेले आहे. कवयित्री नीरजा यांनी स्त्री जातीचे दु:ख कवितेतून मांडले आहे.

'ती थिरकते आहे, अनादी काळापासून त्याच्या नजरेच्या तालावर – – –
– – – – – त्याच्या मनात उमटणाऱ्या चित्राप्रमाणे – – –
(स्त्रीगणेशा : पृ.४२–४३)

नीरजा यांची कविता स्त्रीकेंद्री नाही तर स्त्रीवादी आहे. कवयित्री नीरजा यांच्या कवितेसंदर्भात प्रभा गणोरकर म्हणतात, ''स्त्रीचे शरीर तिचे अस्तित्व, तिचे कुटूंबातील स्थान, कर्तव्ये यावर असलेली पुरुषांची मक्तेदारी लैंगिक शोषणाची, असहायतेची, वेदनेची अन्यायाची भावना नीरजा आपल्या कवितेतून व्यक्त करतात. स्त्रीनेही हे कसे स्वीकारले आहे ते दाखवून त्याविरूद्ध त्यांनी घेतली भूमिका स्पष्ट शब्दात कवितेतून त्या व्यक्त करतात. दीर्घत्वाकडे झुकणारी मुक्तछंदातील रचना हे त्यांच्या कवितेचे रूप आहे.''[५] या स्त्रीवादी वैचारिक भूमिकेमुळे नीरजांची कविता लक्ष वेधून घेते. प्रज्ञा लोखंडे यांचे तीन काव्यसंग्रह 'अंत:स्थ' (१९९३), 'उत्कट जीवघेण्या धगी वर' (२००२), 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' (२००७) प्रकाशित झाले पहिल्या संग्रहातच कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांनी स्त्री स्वातंत्र्याचा उघडपणे स्विकार केला आहे.

'तुझ्यातला अहं जागवला
न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति म्हणणाऱ्या मनूने
आणि तू ही स्वत:भोवती घातलेस व्यवस्थेच्या साक्षीने – –
(अंतस्थ : पृ. ३)

स्त्री म्हणून स्वत:कडे समाजाकडे पाहताना भावना, संवेदना विचाराची वलये कवयित्रीने आपल्या कवितेत उत्कटपणे व्यक्त केली आहेत. स्त्री – पुरुष नात्याचा शोधही त्यांच्या कवितेत दिसून येतो. 'उत्कट जीवघेण्या धगी वर' या कवितासंग्रहात स्वत:च्या दु:खाचे संदर्भ, अर्थ समजून घेतानाच ते दु:ख एकटीचे न राहता स्त्री जातीच्या सनातन दु:खाचा अन्वयार्थ शोधू पाहताना दिसतात 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा' या संग्रहात स्त्री पुरुष संबंधातली वेदना व्यक्त होते.

> 'प्रेम' या भावनेचा, जाणिवेचाही अर्थ नेमका कळत नाही
> नेमकं काय हवं असतं प्रेमाला
> इच्छांचा टोकदार दरवळ , की त्याहूनही अधिक काही?
> (मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा. पृ ३०)

या तीनही संग्रहात प्रज्ञा लोखंडे यांनी स्वत:च्या अस्तित्वाशी निगडित दु:खाचे नाते सर्व स्त्री जातीच्या दु:खाशी जोडून घेतलेले दिसते. त्यांच्या कविता आत्यंतिक दु:ख, त्यातून निर्माण झालेला संताप, उद्रेक, विद्रोह, नकार उत्कटपणे व्यक्त होतो स्त्रीवादी विचारप्रणालीची परिभाषा स्वतंत्र व्यक्तिमत्व धारण करताना दिसते.

१९९० नंतरच्या काळातील कवयित्रींमध्ये स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटवणारी कवयित्री म्हणजे कविता महाजन. त्यांचे 'तत्पुरुष' (२००५) आणि 'धुळीचा आवाज' (२००६) हे दोन संग्रह प्रकाशित आहेत. कविता महाजन यांची कविता आजच्या कठोर वास्तवात जगण्याची धडपड करू पाहणाऱ्या स्त्री ची कविता आहे. 'तत्पुरुष' या संग्रहात पुरुषाची 'मालक' म्हणून जी सत्ता असते, तिचे स्त्रीच्या दृष्टिकोनातून चित्रण केलेले आहे या संग्रहातील कविता स्त्री – पुरुषातील विषम नातेसंबंधावर ताशेरे ओढणाऱ्या आहेत. विवाहसंस्था स्त्रीला बहाल करीत असलेल्या तथाकथित सुरक्षिततेचे वर्णन कविता महाजन 'पिंजरा' हे रूपक वापरून करताना दिसतात. विवाहसंस्थेमुळे वहिवाटीचे समाजातील स्त्री पुरुषाच्या नात्यातील विषमतेचे सुक्ष्म सत्तास्पर्धेचे आणि बाईने आपणहून स्विकारलेल्या तर कधी नाइलाजाने पत्करलेल्या गुलामगिरीचे, लाचारीचे, भयाचे समाजव्यवस्थेचे स्त्री – पुरुषाकडे सोपविलेल्या भूमिकाचे निरीक्षण या कवितांमध्ये आढळते. स्त्री जाणिवेच्या वेगळ्या अनुभवाच्या कविता असे त्यांच्या कवितेच्या संदर्भात म्हणता येते.

> 'बाई नाकारते आता, रोजच्या रोज पहाटे आंघोळीनंतर
> स्वच्छ मोकळ्या कपाळावर कुंकू लावणं
> आणि दिवसाची सुरुवातच लालभडक पूर्णविरामानं करणं' –
> – – –
> (तत्पुरुष : पृ . ५२)

किंवा,

'भीती वाटतेय : घराबाहेर पडण्याची
आणि घरात थांबण्याची देखील
येत नाहीये अंदाज, की त्याच्या हातातल्या बाटलीत
माझ्यासाठी अत्तर असेल ॲसिड !'

(तत्रैव : पृ. ६५ )

ही भयानक दहशत, प्रखर वास्तव रोजच्या कुठल्यातरी स्त्रीला अनुभवावे लागणारे वास्तव 'तत्पुरुष' मधील कविता संग्रहातून प्रकट होते.

कविता महाजन यांची कविता अतिशय तरल, सूक्ष्म आणि स्त्रीवादी आहे. साध्या दैनंदिन तपशिलाच्या वर्णनातुन भोवती घुसमटणारे वास्तव, बाईपणाच्या अस्तित्वाशी निगडीत एकटेपण सूक्ष्मपणे त्यांच्या कवितेतून शब्दांकित होताना दिसते. कविता महाजन यांच्या कवितेतून प्रेमाची सहजीवनाची ऊब, स्त्री म्हणून जगताना अपेक्षाभंग, मानहानी कुंठितता, भय, दहशत, असुरक्षितता या विविध जीवनरूपाचे चित्रे प्रकटताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या कवितेत 'मी' विरुद्ध इतर हे व्दंव्द असून इतरांनी घेरलेल्या विश्वात तरल, संवेदनक्षम मन घेऊन जगू पाहणाऱ्या 'मी' ची भिती, दहशत आहे त्यामुळे त्यांची कविता अस्तित्ववादी कविता असल्याचे भासते.

'एकदा न्हाणीघरात फरशी कोरून
लाल मुंग्यांनी खोलवर घर केलं
ते सिमेंट ने बुजवल्यावर
मुंग्यांनी रात्रीतून कोरली नवी वाट
तेव्हापासून — — — अचानक बदलून गेली बाई' — —

(धुळीचा आवाज : पृ. ७२)

स्त्रीचे मन, संवेदनशीलता, संकोच, स्वभावधर्म घेऊन कवितेच्या आजच्या प्रवाहात त्यांच्या कविता दाखल झाल्या आहेत.

स्त्रीवादाचा एक तत्वप्रणाली म्हणून स्वीकार करून स्त्रीवादी कविता लिहिणाऱ्या कवयित्री म्हणजे अश्विनी धोंगडे यांचा 'अपौरुषेय' (१९९८), शैला लोहिया यांचा 'कविता गजाआडच्या' हा कवितासंग्रह, सुजाता शिरवळकर यांचा 'स्वत:तल्या परस्त्री बद्दल सात कविता', नीलिमा गुंडी यांचा 'स्पर्शरेषा' हा कवितासंग्रह इ. कवितासंग्रह स्त्रीवादी जाणीवा व्यक्त करतो. स्त्रीवादी आत्मभानातून दु:खाला नकार देण्याची भाषा येते तसाच आत्मशोधही येतो.

एकदरीत 'स्त्रीवादी' जाणिवातून कविता लिहिणाऱ्या आणि मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय संस्कृतीच्या मर्यादित वर्तुळातून कवितेला बाहेर काढणाऱ्या इतर कवयित्रींच्या कवितेत तळागाळातील स्त्रीही आलेली आहे.

दलित कवितासंग्रहातही समकालीन दलित कवयित्रींच्या कवितामध्ये सुगंधा शेंडे, कुमुद पावडे, आशा थोरात, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, निर्मला लेंढे, प्रतिमा अहिरे, राजानंद, माया वासनिक, उषा हिंगोणेकर, जोत्स्ना चांदगुडे, संध्या रंगारी, नीलांबरी शिर्के, धम्मजोती शेगोकार कावळे, मीना गजभिये, उसा आंभोरे, प्रज्ञा वडोले, या कवयित्रींचा समावेश आहे. यातल्या कित्येक कवयित्रींचे कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. दलितांचे असह्य दारिद्र्य, शोषण, दलित स्त्रीचे दु:ख, सवर्णांनी केलेले अत्याचार, विद्रोहाची गरज व हाक, स्त्रीचे नवे आत्मभान ही या कवयित्रींच्या कवितामधली प्रमुख आशयसुत्रे आहेत.

दलित ग्रामीण कवितेत लक्ष्मीकमल गेडाम, देवका देशमुख, अभंग रचना करणाऱ्या मयूरा देशमुख, सामाजिक प्रबोधन करणाऱ्या उर्मिला ठाकरे, सधजा मेश्राम, अरुणा पवार, इंदुमती लहाने, विजय एबडवार, विमल माडेकर अशा अनेक कवयित्रींना भर घातली आहे.

ग्रामीण भागातही स्त्रीवादी जाणिवेचे नवे भान काही कवयित्रींच्या कवितेत दिसते. प्रतिमा इंगोले, पद्मिनी कराड यांच्या कवितेत मुलात आणि मुलीत बाप भेदभाव करतो हे जाणवणारी आई दिसते.

आदिवासी कवितेत उषाकिरण आत्राम 'म्होरकी' (१९९७) आणि कुसुम अलाम 'रान आसवांचे तळे' (२०००) इ. सर्व आदिवासींचे आणि आदिवासी स्त्रीचे प्रतिनिधित्व करीत आदिवासींच्या दु:खाचे संदर्भ तपासणारी आणि जीवनसंघर्षाला सामोरी जाणारी कविता या कवयित्रींनी लिहिली आहे. 'स्व' त्वाची जाणीव या कवितामधून व्यक्त होते.

'आपल्या अंत:स्थ अहवर' (इनर सेल्फ) या कवयित्रींनी जवळजवळ अंध म्हणावी इतकी श्रद्धा आहे. या अंत:स्थ अंधश्रध्देतून एक अफाट आंतरविश्व अविर्भुत झाल्याचा वा त्या आंतरविश्वाचा परोपरीने शोध घेण्याचा प्रेरक विश्वासही या कवयित्रींनी बाळगलेला आहे. ¹²⁵

समकालीन साहित्यात कविता प्रवाहात कवयित्रींनी स्त्रीच्या दु:खाचे अनेक पदर उघडलेले आहेत. स्त्री या दु:खातून, शोषणातून अनेक तऱ्हेच्या आघातातूनही कशी स्वत:ला उभी करते ते सांगत जीवनाला कवितेच्या माध्यमातून वेगळे बळ पुरविले आहे असे म्हणता येते.

स्वत:च्या जीवनातले प्रेमभंगाचे, वंचनेचे, नैराश्याचे स्वप्न विरून गेल्याचे असहायतेचे, एकाकी असण्याचे दु:ख हा बहुसंख्य स्त्रियांच्या कवितेचा मुख्य आशय दिसतो. बहुसंख्य कवयित्रींची कविता व्यक्तिगत दु:खाचा आविष्कार करणारीच आहे. त्यामुळे या कवयित्रींच्या

काव्यसग्रहातून प्रगल्भता जीवनाकडे काहीशा तत्वज्ञ वृत्तीने समाधानीपणाने पाहणारी दृष्टी आणि आशावादी सूर हा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरतो.

स्त्रियाची कविता हा स्त्रियांच्या जाणिवाच्या, आत्मिक व बौद्धिक विकासाचा प्रवास दाखवणारा आलेखच आहे. आधुनिक काळातल्या स्त्रीच्या व्यक्तिमत्वाला लाभत गेलेली विविध परिमाणे गेल्या शतकातील स्त्रियाच्या कवितामधून प्रकटताना दिसतात. स्त्री जीवनाचा आणि मानवी जीवनाचा तत्वचितक वृत्तीने घेतलेला वेध या कवयित्रींच्या कवितामधून व्यक्त केला आहे. तो अनुभवताना 'स्त्री' च्या प्रगल्भ, आशाप्रेरित वृत्तीचा आणि मुक्त पक्षाप्रमाणे गगन भरारी घेणाऱ्या व्यक्तीमत्वाचा प्रत्यय येत राहतो

**संदर्भ ग्रंथ :**


१) प्रभा गणोरकर – ''मराठीतील स्त्रियांची कविता''– लोकवाङ्मय गृह, मुंबई, पहिली आवृत्ती–२०१५ पृ. १४९

२) तत्रैव – पृ. १६०

३) तत्रैव – पृ. १६५

४) तत्रैव – पृ. १८८

५) रा.ग. जाधव – ''आधुनिक मराठी कवयित्रीच्या कविता'' –प्रतिमा प्रकाशन १९९६, पुणे, पृ. ६४

July 2021

E-ISSN – 2348-7143

I N T E R N A T I O N A L  R E S E A R C H  F E L L O W S  A S S O C I A T I O N

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

Special Issue 270

Multidisciplinary Issue



**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhan[illegible]
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCHJOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 24 | बाल साहित्य में आदर्श बोध | डॉ. संतोष पवार | 117 |
| 25 | शोषित पीड़ितों के कवि राजेश जोशी | डॉ. कल्पना पाटील | 121 |
| 26 | वर्तमान जगत में परिवर्तनशीलता की साक्ष्य देता : नारी विमर्श | डॉ. रुपाली चौधरी | 126 |
| 27 | अनुवाद की प्रक्रिया, तकनीक और समस्याएँ | डॉ. लियाकत शेख | 130 |
| 28 | वैश्वीकरण में हिंदी की स्थिति और दिशा | डॉ. संतोष पवार | 136 |
| 29 | फिचर लेखन | प्रा.अरुण आहेर | 140 |
| | **मराठी विभाग** | | |
| 30 | आदिवासींची देवबांधणी : एक विधीनाट्य | डॉ. अंजली मस्करेन्हस | 143 |
| 31 | आदिवासी कोळी लोकमानसातील धार्मिक मण, समारंभाची पारंपारिक गीते | डॉ. एस. एस. भैरगुंडे | 147 |
| 32 | संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिक फलश्रुती | डॉ. रामलाल चौधरी | 153 |
| 33 | महाराष्ट्रातील संतांचे समाजप्रबोधनाचे कार्य | डॉ. कैलास वाघ | 158 |
| 34 | धर्मभोळेपणाचा नाश करणारा सत्यशोधक विचार | डॉ. श्रीराम गडकर | 164 |
| 35 | मराठी साहित्य आणि जीवनमूल्य : एक शोध | डॉ. नामदेव सोडगीर | 174 |
| 36 | 'लढत' कादंबरीचा अभ्यास : चिकित्सक अभ्यासाचे एक आदर्श प्रारूप | डॉ. शिवाजी एंडाईत | 178 |
| 37 | विठ्ठल वाघांच्या कवितेतील द्विकेंद्रीतता | डॉ. श्रीराम गव्हाणे | 182 |
| 38 | विदर्भाच्या मराठी गझलेतील कृषी जाणीव | डॉ. संजय पोहरे | 187 |
| 39 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर आणि चर्मकार समाज | डॉ. आर.एस.सुरवसे | 191 |
| 40 | शांताबाई हुबळीकर यांच्या 'आता कशाला उद्याची बात' मधून व्यक्त होणारा स्त्रीवाद | डॉ. अमृता डोर्लीकर | 194 |
| 41 | २००० नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्यांचे स्वरूप आणि विशेष | डॉ. शिवाजी हुसे | 200 |
| 42 | विजय पाटील यांचे ग्रामीण कथा विश्व | डॉ. पद्माकार वानखेडे | 206 |
| 43 | वर्तमानातील आदिवासी कवितेतील संवेदना (१९९५ ते २०२०) | डॉ. प्रकाश वट्टी | 210 |
| 44 | स्त्रियांचे ग्रामीण कादंबरीलेखन | डॉ. राजेंद्र वडमारे | 216 |
| 45 | संत गाडगेबाबांच्या कीर्तनातील वैज्ञानिक दृष्टी | डॉ. सौ. रजनी लुंगसे | 224 |
| 46 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील मानवी मूल्ये | प्रो. डॉ. वासुदेव वले, प्रा. छाया खर्चे | 227 |
| 47 | माणगाव परिषद : स्वरूप व परिणाम | डॉ. श्रीराम गडकर | 230 |
| 48 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि दलित चळवळ | प्रा.आर.एस.लोहकरे | 240 |
| 49 | विदर्भातील मराठी गझल : आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने स्वतंत्र वाटचाल करणारे निवडक गझलकार | डॉ. संजय पोहरे | 245 |
| 50 | स्त्रियांची समकालीन प्रवासवर्णने : काही निरीक्षणे | मनीषा औटी | 253 |
| 51 | स्वातंत्र्योत्तर मराठी व हिंदी भाषांमधील दलित कथांचा एकमेकांशी तुलनात्मक अभ्यास | डॉ. अर्जुन नेरकर | 259 |
| 52 | भारतीय महिलांची बदलती स्थिती | डॉ. अनंत देशमुख | 262 |
| 53 | मराठवाड्यातील चळवळी व त्यांनी मराठवाड्यातील कादंबरीला दिलेले वैशिष्ट्य | रा.ज.चाटे | 267 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Special Issue - 270 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
July- 2021

# शांताबाई हुबळीकर यांच्या ''आता कशाला उद्याची बात'' मधून व्यक्त होणारा स्त्रीवाद

**डॉ. अमृता डोर्लीकर**
डॉ मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर.
भ्रमणध्वनी :– ९३२६२३४२८२

मराठी साहित्यात आत्मचरित्र या वाङमय प्रकाराला एक विशिष्ट स्थान आहे. समाजातील विविध जाती धर्मातील, स्तरातील व्यक्तींनी जगण्याचा अनुभवाचा प्रत्यक्ष पट या आत्मचरित्राचा रूपाने वाचकांच्या समोर मांडलेला आहे. यात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्राला एक विशेष स्थान मराठी साहित्यात आहे. स्त्रीयांनी आपल्या जगण्याचे अनुभव आपल्या आत्मचरित्रातून साकारले आहे. त्यातही सिनेक्षेत्रात काम करणाऱ्या स्त्री आत्मचरित्राला वाचकांची विशेष पसंती असल्याचेही दिसते प्रस्तुत शोधनिबंधातून शांताबाई हुबळीकरांच्या "आता कशाला उद्याची बात" या आत्मचरित्राचा स्त्रीवादी अंगाने विचार मांडत आहे. तत्पूर्वी स्त्री कलावंताच्या आत्मचरित्राचा थोडक्यात आढावा घेणे गरजेचे आहे.

मराठी सिनेमा सृष्टीतील अनेक कलावंतांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. थोर संगीत दिग्दर्शक आणि अभिनेते गोविंदराव टेंबे यांनी सन १९३९ साली लिहिलेले 'माझा संगीत व्यासंग' हे मराठी सिनेसृष्टीतील कलावंताचे पहिले आत्मचरित्र होय. त्यांनीच १९४८ साली 'माझा जीवन विहार' हे दुसरे लिहिले. प्रसिद्ध सिने अभिनेत्री शांता आपटे यांनी सन १९४० मध्ये लिहिलेले ''जाऊ मी सिनेमात'' हे मराठी सिनेमासृष्टीतील स्त्री कलावंताचे पहिले आत्मचरित्र आहे. सिनेसृष्टीतील बरे वाईट अनुभव त्यांनी आपल्या आत्मचरित्रातून सांगितलेले आहे. हंसा वाडकर (१९७०) यांचे 'सांगत्ये ऐका' या आत्मचरित्रातून त्यांनी सिनेमासृष्टीचे वेगळे रूप उघड केले आहे. हे आत्मचरित्र मराठी आत्मचरित्राच्या इतिहासात महत्वाचे ठरले. त्यानंतर 'स्नेहांकिता' हे स्नेहप्रभा प्रधान यांचे (१९७३) मध्ये प्रसिद्ध झालेल्या आत्मचरित्रातून त्यांनी एकाकी आणि असमाधानी जीवनाची शोकांतिकाच मांडली आहे. त्यानंतर प्रकाशित झालेल्या आत्मचरित्रामध्ये लीला चिटणीस यांचे (१९८१) 'चंदेरी दुनियेत' दुर्गा खोटे यांचे (१९८२) 'मी दुर्गा खोटे', जयश्री गडकर यांचे (१९८६) 'अशी मी जयश्री', उषा किरण यांचे (१९८९) 'उषःकाल', शांताबाई हुबळीकर यांचे (१९९०) 'कशाला उद्याची बात', लालन सारंग यांचे (१९९२) 'जगले जशी' ललिता जोगळेकर यांचे (१९९३) 'बाई मी भाग्याची', ज्योत्स्ना भोळे यांचे (१९९७) 'तुमची ज्योत्स्ना भोळे', सीमा देव यांचे (१९९८) 'सुवासिनी' इ. आत्मचरित्रे प्रसिद्ध झाली. या आत्मचरित्रातून कलावंतांच्या आयुष्यातले बरे वाईट अनुभव वाचकांना कळतात त्याचबरोबर सिनेक्षेत्रातील काही गुपितेही उघड झालेली दिसतात अशा या कलावंतांच्या आत्मचरित्राविषयी डॉ. सुनंदा देशपांडे म्हणतात, ''कलावंताच्या आत्मचरित्रातून त्यांची कलाविषयक भूमिका, जीवनविषयक दृष्टी, मानवी मनाचा वेध घेण्याचा त्यांचा आवाका, आशयाभिव्यक्ती करताना त्यांच्या ठिकाणी असलेली कल्पनाशक्ती, तत्कालीन राजकीय व सामाजिक स्थितीचे या कलावंताच्या ठिकाणी असलेले भान इ. अनेक गोष्टींचा आपल्याला वेध घेता येतो. यादृष्टीने अभिनेत्या कलावंताची ही आत्मचरित्रे अभ्यासकांसाठी एक चांगली उपलब्धी आहे''[1] यावरून कलावंताच्या आत्मचरित्राच्या अभ्यासाचे महत्व स्पष्ट होते. या अभिनेत्रींच्या आत्मचरित्रातून त्यांचे या क्षेत्रात पदार्पण कसे झाले हे स्पष्ट होते. नातलगांचा आग्रह, पतीची इच्छा, कुटूंबाची बिघडलेली आर्थिक स्थिती, अभिनयाची आवड इ. कारणाने त्यांनी हे क्षेत्र निवडलेले आहे असे त्यांच्या आत्मचरित्रातून प्रत्ययास येते.

मराठी आत्मचरित्रामध्ये कलावंतांनी लिहिलेल्या आत्मचरित्राची संख्या बऱ्यापैकी आहे व त्यातील बरीच आत्मचरित्रे ही लोकप्रियही झालेली आहे. कारण कलावंताच्या जीवनासंबंधी सर्वसामान्यांना असलेली उत्कंठा हे त्यामागील मुख्य कारण ठरते. मराठी साहित्यात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मकथनांचा अभ्यास वेगवेगळया संदर्भात महत्वपूर्ण वाटावा असा आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात लिहील्या गेलेल्या स्त्रियांच्या आत्मचरित्रात पतीचा गुणगौरव केलेला दिसतो. तर स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आत्मचरित्रात तक्रारी, पतीविषयी नापसंती, पतीपासून विलग होणे या गोष्टीही आत्मचरित्रात दिसू लागल्या. लेखनात तटस्थ विवेचन, प्रांजळ निवेदन,

सत्यकथनावर भर दिला जाऊ लागला. १९७५ नंतर स्त्रीवादी जाणिवेने लेखन व्हायला सुरुवात झाली या स्त्रीवादी जाणिवा पुढे आत्मचरित्रातूनही प्रकट होऊ लागल्या. एक व्यक्ती म्हणून जगतांना वाट्याला येणारे संघर्ष, "स्व'' चा शोध ही स्त्रीवादी जाणीव प्रगल्भ होऊ लागली. शांताबाई हुबळीकर यांच्या या आत्मचरित्रातून ही स्त्रीवादी जाणीव प्रकर्षाने जाणवते म्हणून प्रस्तुत आत्मचरित्राचा स्त्रीवादी अंगाने विचार मी या शोधनिबंधात मांडत आहे. तत्पूर्वी स्त्रीवादाचा थोडक्यात परामर्श घेणे क्रमप्राप्त ठरते.

**स्त्रीवाद : –**

पितृसत्ताक समाजरचनेत स्त्रीचे होणारे शोषण थांबविण्यासाठी लिंगभेद रहित मूल्यांचा आग्रह धरणारी राजकीय भूमिका स्त्रीवादी साहित्यातून दिसून येते. आधुनिक काळ व त्या काळात बदलणारी मुल्ये आणि समाजजीवन यात वावरणारी नवीन स्त्री स्त्रीवादी साहित्यातून दिसू लागली. स्त्रीकडे एक 'व्यक्ती' म्हणून समाजाने बघावे तिचे विचार, भावना समजून घ्याव्यात असा दृष्टीकोन या स्त्रीवादी साहित्यातून मांडण्यात आला. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीच्या सर्वांगीण मुक्तीचा विचार करणारी विचारप्रणाली, स्त्रीने बाईपणाची कात टाकून माणूसपणाचे नवे रूप धारण करणी म्हणजे स्त्रीवाद होय.

'स्त्री' ही एक व्यक्ती आहे हे लक्षात घेऊन तिची सर्जनशीलता आपल्या पुरतीच मर्यादित न ठेवता जीवनाच्या विविध क्षेत्रात तिला कर्तृत्वाची उंच शिखरे गाठण्याची संधी मिळणे आणि त्यासाठी यथोचित परिस्थिती निर्माण करणे हीच बाब स्त्रीवादाच्या केंद्रस्थानी आहे हे लक्षात घ्यावे लागते. 'स्त्री' वादाचा सुसूत्र प्रारंभ करून देणारा महत्वाचा ग्रंथ म्हणजे सिमॉन द बोव्हा यांचा 'द सेकंड सेक्स' (१९४९) हा ग्रंथ होय. स्त्रियांच्या दमनाचे सर्वांगीण भान देणारा हा ग्रंथ आहे. ''स्त्री ही जन्माने स्त्री नसते तर तिला तशी घडविली जाते''[२] हे या ग्रंथात विस्ताराने स्पष्ट केलेले मुख्य सुत्र आहे.

मराठी साहित्यात स्त्रीवाद ही संकल्पना १९६० नतर वेगाने पुढे आली म्हणून ही एक समकालीन विचार प्रणाली आहे असे म्हटल्या गेले. १९७५ हे आंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष म्हणून जाहीर झाले. त्यानंतर स्त्रियांच्या मनोवृत्तीत बराच बदल झाला आहे १९७५ ते आजतागायत विविध क्षेत्रात कर्तुत्व करणाऱ्या स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रातील स्त्रीवादाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने स्त्रीयांच्या आत्मचरित्रात सिने क्षेत्रात काम करणाऱ्या बऱ्यात अभिनेत्रींची आत्मचरित्रे प्रसिद्ध झालेली आहेत. सिनेक्षेत्र खरे तर पैसा, प्रतिष्ठा देणारे क्षेत्र म्हणून आजच्या काळात सर्वश्रेष्ठ मानले जाते जिवघेणी स्पर्धा याक्षेत्रात होताना दिसते. अगदी सुरुवातीच्या काळात स्त्रियांनी या क्षेत्रात जे पदार्पण केले तेव्हा आर्थिक ही त्यांची महत्वाची बाजू होती त्या सिने कलावंत पैकी एक कलावंत म्हणजे शांता हुबळीकर. त्यांचे 'आता कशाला उद्याची बात' हे आत्मचरित्र सिनेक्षेत्रावर लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रापैकी महत्वपूर्ण असे आत्मचरित्र ठरते.

आपल्या आत्मचरित्र लेखनामागील हेतू स्पष्ट करतांना प्रसिद्ध सिने अभिनेत्री शांता हुबळीकर म्हणतात, ''सिनेमासृष्टीत राहूनही मी व्यसनांपासून दूर राहिले. मोह टाळत आहे मग माझी विपन्नावस्था का झाली ? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे माझे हे आत्मकथन आहे. 'उद्याची बात' गाणाऱ्या माणूसमधल्या मैनेची ही 'आजची बात' आहे. कदाचित माझ्या आयुष्यात झालेल्या चुका समाजाला मार्गदर्शक ठरण्याचीही शक्यता आहे म्हणून हे आत्मकथन''[३] कलावंताच्या आत्मचरित्र लेखनामागील हेतू शांताबाईंच्या वरील मनोगतावरून स्पष्ट होतो. कलावंताच्या आत्मचरित्राकडे वाचक वेगळ्या नजरेने पाहतात रुपेरी दुनियेबद्दल रसिकांना कायमच आकर्षण असलेले दिसते. पडद्यावर सुंदर व आकर्षक दिसणाऱ्या या कलावंताचे वास्तव जीवन किती काटाचे, व्यस्त वेळप्रसंगी करुण हलाखीचे असू शकते याची जाणीव कलावतांची आत्मचरित्रे वाचकांना करून देतात. या आत्मचरित्रातून कलावंताच्या व्यक्तिमत्वाचा विविधांगी परिचय आपल्याला करून घेता येतो.

अभिनेत्रींना मिळालेले यश, किर्ती व वैभव कसे प्राप्त झाले याविषयी सामान्य वाचकांना कुतूहल असते हे कुतूहल त्यांच्या कलाजीवनाविषयी तसेच खाजगी जीवनाविषयी अधिक असते. घरची आर्थिक परिस्थिती, या आर्थिक अडचणीतून मार्ग काढण्यासाठी पालकांची इच्छा म्हणून कलाक्षेत्राची निवड इत्यादी कारणांमुळे बऱ्याच अभिनेत्रींनी अभिनय क्षेत्राची निवड केल्याचे दिसते याविषयी डॉ. तारा भवाळकर म्हणतात, ''शाळा, कॉलेजात असताना हौस म्हणून कोणी नृत्य – नाट्यात सहभागी झाल्या असतील, कोणी थोडी फार नृत्य, संगीत

E-ISSN : 2348-7143
July- 2021

शिकल्या असतील पण हे आपल्या आयुष्यभराचे सार्थकतेचे क्षेत्र म्हणून जाणीवपूर्वक कोणी इकडे वळलेल्या नाहीत" यावरून आर्थिक गरज आणि हौस म्हणून सिने कलावंत या क्षेत्राकडी वळलेल्या दिसतात.

'आता कशाला उद्याची बात' हे 'माणूस' या गाजलेल्या मराठी चित्रपटामुळे लोकप्रिय झालेल्या शांता हुबळीकर या सिने अभिनेत्रीचे आत्मचरित्र आहे. नावलौकिक व वैभव प्राप्त करूनही उतारवयात वृद्धाश्रमामध्ये जीवन घालविण्याची वेळ त्यांच्यावर आली शांताबाईच्या भरकटलेल्या जीवनाची दुर्देवी कहानी शशिकला उपाध्ये यांनी शब्दांकित केलेली आहे. कौटुंबिक आणि कलाजीवनात आलेले अनुभव शांताबाई हुबळीकर यांनी "कशाला उद्याची बात" या आत्मचरित्रात सांगितले आहेत.त्या काळात सिनेमात काम करणाऱ्या मुलीला लोकप्रियता, वैभव मिळाले तरीही तिच्याशी लग्न करायला कोणी तयार नसत या समाजवास्तवाचे चित्रण ही शांताबाई हुबळीकरांनी आपल्या आत्मचरित्रात केले आहे.

अदरगुंची ते सिनेक्षेत्रात पदार्पण होई पर्यंतचा त्यांच्या जीवनाचा टप्पा रंगविताना शांताबाईनी आपले बालपण, दुष्काळ, रूढी व परंपरा, अंधश्रद्धा, तत्कालीन समाजजीवन, जनतेच्या मनातील श्रद्धा ,कलाजीवन प्रवास, संसारातील सुख–दु:खाचे प्रसंग, हिंदी चित्रपटसृष्टीतील भूमिका, कानडी चित्रपटातील भूमिका, स्वत:च्या घराचे स्वप्न, मुलगा प्रदीपचे वर्तन, आश्रमातील दिवस व अज्ञात वासातून बाहेर पडणे अशा विविध भागांमध्ये त्यांनी आपले अनुभव सांगितले आहेत. एक स्त्री म्हणून आत्मचरित्राचा विचार करता त्याकाळातली स्त्रियांची सामाजिक परिस्थिती ,शांताबाई हुबळीकरांना करावी लागलेली तडजोड एक स्त्री म्हणून त्यांना सिनेक्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांकडे त्याकाळात समाज कोणत्या दृष्टीने बघायचा या सर्व बाबी या आत्मचरित्रात स्त्रीवादाच्या अंगाने महत्वाच्या ठरतात. १९३० मध्ये 'गुब्बी' नाटक कंपनीत त्यांचे पदार्पण अगदी अपघाताने झाले. "त्यावेळी नाटकात काम करायला प्रतिष्ठित घरातल्या मुली फारश्या व्हायच्या नाहीत, मालक लोक गावोगावी हिंडून देखण्या, गाणाऱ्या मुली मिळवून आणायचे. पैशाच्या आशेने या मुलीच्या घरचे लोक त्यांना नाटक कंपनीत पाठवायचे" म्हणजे केवळ गरीब परिस्थितीमुळे व सिनेमात मिळणाऱ्या पैशामुळे मुलींना या क्षेत्रात जाऊ दिल्या गेले. बहुतेक स्त्रिया घरच्या लोकांनी पाठविल्यामुळेच या क्षेत्रात आलेल्या दिसतात. शांताबाई हुबळीकरांना मात्र घर सोडावे लागले. या क्षेत्रात पैसा प्रसिद्धी भरपूर मिळते. अभिनेत्रींची लग्ने यशस्वी होतातच असे नाही. लग्नाच्या बाबतीत शांता हुबळीकर म्हणतात, सिनेमातल्या मुलींशी त्यावेळी कोणी लग्न करायचे नाही. त्यांना लोकप्रियता मिळाली पैसा आणि वैभव मिळाले तरी प्रतिष्ठा नव्हती". या क्षेत्रात काम कुरणाऱ्या स्त्रियांच्या मनस्थितीचा विचार करता, असे दिसते की, त्या स्वखुशीने आलेल्या नाहीत कारण हे क्षेत्र यशाचे, किर्तीचे आणि क्षणभंगुरतेचे आहे जो पर्यंत सौंदर्य आहे तोपर्यंत या क्षेत्रात काम मिळते तसेच सतत नव – नवीन कलाकार या क्षेत्रात दाखल होत असल्यामुळे जुने कलाकार मागे पडतात किंवा त्यांचे चित्रपट अयशस्वी झाले की त्या मागे पडण्याची भीती त्यांना वाटते आपल्याला कोणी विचारणार नाही ही जाणीवही जीवघेणी वाटत असते असे शांताबाई हुबळीकर म्हणतात, "सिनेमाची सृष्टी तशी अजबच आज एखाद्याला डोक्यावर घेईल, उद्या त्या जागी दुसरा कोणी आला की लगेच पहिल्याला विसरून जाईल. त्यामुळेच त्या सृष्टीत सतत चढउतार चालू असतात" अशी प्रतिक्रिया या क्षेत्राविषयी त्या व्यक्त करतात.

**शांताबाई हुबळीकर यांच्या आत्मचरित्रातून व्यक्त होणारी स्त्री जाणीव :**

ज्याकाळात शांताबाई हुबळीकर सिनेक्षेत्रात दाखल झाल्या तो काळ स्त्रियांचा स्वत:चा व्यक्ती म्हणून विचार करण्याचा काळ नव्हता. त्याकाळात मुलींच्या शिक्षणाला किंमत नव्हती त्यातही चित्रपट सृष्टीत काम करणाऱ्या स्त्रियांशी सर्वसाधारण घरातील पुरुष लग्न करायला तयार होत नसे शांताबाई सिनेक्षेत्रात काम करायच्या त्यामुळे लग्नाच्या वयात लग्न न झाल्यामुळे गिते सारख्या विवाहित पुरुषांशी त्यांना विवाह करावा लागला. आत्मनिर्भर असूनही त्याकाळातली सामाजिक परिस्थिती जी होती त्यापरिस्थितीशी त्यांना जुळवून घ्यावे लागते. कारण मुळात सोशिक स्वभाव असल्यामुळे प्रचलित समाजव्यवस्थे विरुद्ध बंड करण्याचे साहस त्यांच्यात नाही. जे परंपरेने चालत आलेले आहे आणि आपणही त्या जीवनाचाच एक भाग म्हणून त्यांनी त्या वातावरणात स्वत:ला जुळवून घेतले आहे. त्याकाळी मुलींचे कमी वयात लग्न होत असे शिक्षणाला लग्नाच्या बाजारात किंमत शून्य होती. शिकलेल्या मुलींचे लग्न जमणे अवघड होते. डॉक्टर व इंजिनिअर्सना अडाणी मुली चालत

E-ISSN : 2348-7143
July- 2021

असत. शिकलेल्या मुलीविषयी पूर्वग्रहदूषित दृष्टिकोण असे की, "वाचायला येणारी मुलगी वाचतच बसेल" तेव्हा बालविवाह प्रथा अस्तित्वात होती. एखादी स्त्री विधवा झाली तर तिचा पुनर्विवाह होत नसे. ज्या काळात शांताबाई चित्रपटसृष्टीत आल्या त्या काळात स्त्रियांची सामाजिक परिस्थिती पाहता समाजाच्या प्रथा परंपरेतच टिकून राहण्याची लेखिकेची वृत्ती दिसते.

शांताबाईच्या जीवनसंघर्षात त्यांचे व्यक्तीमत्त्वच असे घडत गेले की, त्यांचे आत्मकथन वाचताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला वेगळेपणा जाणवतो. सिनेसृष्टी आणि वास्तविक जग यातील तफावत वरून हे जग आकर्षक वाटत असले तरी किती फसवे आहे याची प्रचिती त्यांच्या लिखाणातून येते.

शांताबाई हुबळीकर यांच्या "आता कशाला उद्याची बात" यामध्ये ज्या स्त्री व्यक्तिरेखा आलेल्या आहेत त्या त्याकाळातील स्त्रीचे प्रतिनिधीत्व करताना दिसतात. त्याकाळात बालपणीच विवाह होत असे. शांताबाईचे शिक्षण एस.एस.सी. पर्यंत झाले होते. चित्रपट सृष्टीत आल्यानंतरही स्त्री म्हणून त्यांचे प्रश्न सुटलेले नव्हते. सिनेक्षेत्रात काम करणाऱ्या मुलींशी त्या काळात विवाह करणे शिष्ट संमत मानले जात नसे. त्यामुळे त्यांच्या लग्नाचा प्रश्न अधिक बिकट झाला होता त्याचे आर्थिक व्यवहार सांभाळणे कठीण झाल्यामुळे त्यांना एका पुरुषाची विवाहासाठी गरज भासू लागली. त्यासंदर्भात शांताबाई म्हणतात, "कोणाच्या तरी आधाराची गरज वाटायला लागली. एकटीला सगळा वाढता व्याप आवरणेही अवघड जात होते कोणीतरी सोबत असावं असं फार वाटू लागलं होत. जीवनाला स्थिरता येणं ही माझी गरज होती. मी ऐन पंचविशीत होते. लग्नाचा विचार करायचाच असला तर आणखी उशीर करून चालणार नव्हत. या सगळ्या गर्दीत राहण्यासाठी पुरुषाच्या आधाराची कवचाची गरज तीव्रतेने वाटायला लागली" एकूणच तो काळ सनातनी वृत्तीचा असल्याने लग्न हेच स्त्रीचे अंतिम ध्येय मानले जाई. गिते सारख्या विवाहित पुरुषाशी विवाह केल्यानंतर त्यांच्या पहिल्या पत्नी 'अरुणची आई' ही एक अत्यंत गरीब स्त्री होती. धुणी – भांडी करून तर मुले पेपर आणि आले पाक विकून उदरनिर्वाह करीत. पतीने शांताबाईशी दुसरा विवाह केल्याने ती लेखिकेशी भांडत असे तेव्हा शांताबाई तिला "तुझ्या घरी असेल तेव्हा तुझा नवरा व माझ्या घरी असेल तेव्हा माझा – – – इथं येऊन तू भांडायचं नाही" अशा प्रसंगाना तोंड देत – देत शांताबाई समन्वयवादी जीवन जगताना दिसतात. शांताबाईंनी आंधळेपणाने सर्व व्यवहार गितेवर सोपविलेले असतात. गितेपासून झालेला प्रदीप नावाचा मूलगा हा सुद्धा वडिलांच्याच पावलावर पाऊले टाकून शेवटपर्यंत आईला लुबाडण्याचेच काम करतो. "बापाने तरुणपणी लुटले, दुसरा म्हातारपणी लुटत होता" असे शांताबाई खेदाने म्हणतात. मुलाचाही अनुभव विदारकच होता. वास्तविक पैसा, प्रसिद्धी सगळे काही असताना त्या स्वतंत्र जीवन जगू शकल्या असत्या परंतु प्रथेनुसार विवाह करतात या विवाहाने त्यांच्या आयुष्याची माती झालेली होती. त्यांच्या सोशिक, संस्कारी स्वभावामुळे त्या विवाह बंधनाचे पाश झुगारून न देता त्यात त्या अडकून राहिल्या व स्वतःचे आयुष्य जाळत राहिल्या. त्यांच्या आयुष्यातील अतिशय कटू अनुभव म्हणजे त्यांचा विवाह ज्यामुळे त्यांचे संपूर्ण जीवन उद्धवस्त झालेले दिसते. शेवटी त्यांना वृद्धाश्रमाचा रस्ता धरावा लागला. लेखिकेच्या आयुष्याच्या अधोगतीला त्यांचे पती जबाबदार असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. "हळुहळु माझ्या लक्षात यायला लागले की त्यांचा माझ्यावर विश्वास नाही, सिनेमा नटीशी लग्न केल्यामुळे मला "धाडसी" वाटणारा हा पुरुष किती "संशयी" आहे हे समजायला लागलं". अशाप्रकारे शांताबाईच्या संपूर्ण आयुष्याची वाताहत त्यांच्या पती व मुलामुळे झालेली दिसून येते. सिनेक्षेत्रात काम करताना ज्या ज्या पुरु ाशी अप्रत्यक्ष संबंध आला ज्यांच्याकडून काही नवीन शिकायला मिळाले त्यापैकी बाबुराव पेंढारकर वगैरे इ. मंडळी बद्दल आदरार्थी भावही शांताबाईंनी प्रकट केले आहे या क्षेत्रातील स्त्री – पुरुष संबंधाना अधिक महत्व दिले गेल्याचे दिसून येते. या संदर्भात तारा भवाळकर म्हणतात. "अन्य क्षेत्रातील स्त्रीपेक्षा याक्षेत्रातील स्त्री पुरुष नाती अधिक घनिष्ट होऊ शकतात. स्थले–काल–परिस्थितीनुसार त्यात बदलेही होत असतो हे सर्व खरे असले तरी त्यांची कलाक्षेत्रातली कामगिरी आणि कलावंत म्हणून अंतर्मुख होऊन गेलेला आत्मशोध महत्वाचा असतो" अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

शांताबाई शिकलेल्या आहेत पण स्वतंत्र विचार करण्याची कुवत त्यांच्यामध्ये नसल्याने आयुष्यभर त्यांना पैसा, प्रसिद्धी असूनही दुसऱ्यावर कायम विसंबून राहिल्या. स्वतःचा एक व्यक्ती म्हणून त्यांनी कधी

विचारच केलेला नाही, दुसऱ्यावर आंधळा विश्वास ठेवणे जे भोग वाट्याला आहे ते निमुटपणे सहन करणे या वृत्तीमुळे एक स्त्री म्हणून स्वतंत्रपणे त्या जगू शकल्या नाहीत.

शांताबाई हुबळीकर यांच्या आत्मकथनात स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंड दोन्हींचे चित्रण आलेले आहे. 'अदरकुंची' सारख्या गावात त्यांचे बालपण गेले. बालपणी त्यांच्यावर झालेले संस्कार आणि सिनेक्षेत्रात काम करतानाचे अनुभव त्यांनी कथन केलेले आहे. त्याचे हे आत्मकथन १९ व्या शतकातले त्यामुळे सिनेक्षेत्राकडे अगोदर समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोण आणि नंतरचा दृष्टीकोणही त्यांनी सांगितला आहे. पूर्वी सिनेसृष्टीत काम करणाऱ्या स्त्रियांकडे फारसे चांगल्या नजरेने पाहिले जात नव्हते. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही आता या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांनाही मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे असे अभिमानाने त्या सांगतात. त्यामुळे एका विशिष्ट मर्यादित राहून आपण आपले काम करावे तर आपला मान आपल्याला आपोआप मिळतो असे त्यांना सुचवायचे आहे.

अभिनेत्रींना मिळालेले यश, किर्ती व वैभव कसे प्राप्त झाले याविषयी सामान्य वाचकांना कुतूहल असते. कलावंताचे जीवन हे सरळमार्गी नसते. त्यांचे खाजगी व सिनेसृष्टीतले जीवन यात तफावत दिसून येते. स्त्रीची कौटुंबीक, सांस्कृतिक, सामाजिक जडणघडण तिला तेवढी मोकळीक देत नाही. त्यामुळे खाजगी जीवन व कलाक्षेत्र यात ताळमेळ बसवताना त्यांची ओढाताण होताना दिसते.

एक कलावंत म्हणून शांताबाई हुबळीकरांच्या आत्मचरित्रात ज्या स्त्री व्यक्तिरेखा आलेल्या आहेत त्यांचा आणि शांताबाईचा परस्पर संबंध पाहता त्यांच्याशी वेगवेगळया नात्याने बांधल्या गेलेल्या या स्त्रिया त्यांच्याशी शांताबाईचे संबंध कोणतीही कटुता मनात न ठेवता जोपासलेले दिसतात. त्यांच्या आजी, त्यांची दत्तक बहीण चनमा, मैत्रीण अंबु, गितेच्या पहिल्या पत्नी इ. स्त्रीयांशी असलेले संबंध अत्यंत समजुतदारपणे हाताळलेले आहे यावरून स्त्रीविषयी त्यांच्या मनात आत्म सन्मानाची भावना दिसून येते. एक स्त्री म्हणून त्या दुसऱ्या स्त्रीकडे तितक्याच आत्मियतेने बघताना दिसतात. त्या स्वतः ज्या परिस्थितीशी सामना करत नावारूपाला आल्या आणि हा सगळा प्रवास त्यांच्या एकटीचा असल्यामुळे त्यांच्या मनाचा कणखरपणाही दिसून येतो. त्याकाळचे वातावरण पाहता तो काळ स्त्री कडे उपभोगाची वस्तू म्हणून पाहिल्या जात म्हणून आपल्या सारख्याच इतर स्त्रियांचीही परवड त्या पाहतात. म्हणून त्यांच्या स्वभावगुण म्हणून त्या एक स्त्री म्हणून दुसऱ्या स्त्रीकडे आपुलकीच्या भावनेने पाहताना दिसतात. त्यांच्या सोशीक स्वभावामुळे त्यांच्या वाट्याला उपेक्षा, अवहेलनाच आली.

आत्मकथनाला स्त्रीवादी दृष्टिकोणातून लाभलेला वेगळेपणा म्हणजे शांताबाई या स्वतःहा आत्मनिर्भर होत्या केवळ कुणाची तरी सोबत म्हणून त्यांनी लग्न केले. सिनेसृष्टीत स्वतः चे वेगळे स्थान टिकवून ठेवले कोणत्याही आमिषाला त्या बळी पडलेल्या नाहीत. आयुष्यभर कितीही मानसिक त्रास झाले तरी त्या हताश झालेल्या नाहीत म्हणून आपले आत्मकथन त्या तटस्थपणे व प्रांजळपणे मांडू शकल्या व मानसन्मान समाजात मिळवू शकल्या.

**आत्मकथनाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये :—**

आत्मचरित्रातील भाषा ही आत्मचरित्रकाराचे वय, शिक्षण, जीवनानुभव आणि त्याचा परिसर यानुसार बदलणारी असते कलावंताच्या आत्मचरित्रातील भाषेवर, निवेदन शैलीवर, लेखनशैलीवर त्यांच्या स्वभाववृत्तीचाही परिणाम झालेला दिसून येतो.

जे निवेदन केले आहे त्यात साधेपणा, तत्कालीन समाज स्थितीचे वर्णन त्यांनी केले आहे कोठेही कटुता, बेदरकारपणा किंवा बेपर्वाई त्यांच्या निवेदनात दिसून येत नाही जे जीवन त्या जगल्या त्याचे सरळपणाने निवेदन त्यांनी केले आहे त्यात साधेपणा आणि सोज्वळता आहे. सिनेक्षेत्रातील अनुभव अत्यंत तटस्थपणे व प्रांजळपणे त्यांनी कथन केले आहे.

स्वतःचे स्वानुभव सांगणे, भावी पिढीला मार्गदर्शन करणे, आपल्या गतजीवनातील प्रसंगांना उजाळा देणे इ. आत्मचरित्राची वैशिष्ट्ये सिनेकलावंतांच्या आत्मचरित्रालाही लागू पडणारी आहे. आत्मचरित्रामध्ये रेखाटलेली व्यक्तिचित्रे, स्वभावचित्रे, आत्मनिवेदनातील प्रांजळपणा, आत्मचरित्राचे शीर्षक, भाषा या प्रमुख घटकांच्या आधारे त्यांच्या आत्मकथनामधील वाङ्मयीन वैशिष्ट्ये सांगता येतात. शब्दांकित आत्मचरित्राची वैशिष्ट्ये 'स्व' लिखीत

आत्मचरित्रापेक्षा वेगळी असलेली दिसतात. भाषाभान व वाङ्मयीन अवधान त्यात जास्त दिसून येते. शब्दांकित आत्मचरित्रामध्ये तांत्रिक तपशीलाच्या नोंदी माहितीचे संकलन करून केलेल्या असल्यामुळे त्याची भाषा तांत्रिक व कृत्रिम स्वरूपाची वाटते. शब्दांकित आत्मचरित्रावर शब्दांकन करणाऱ्या व्यक्तीच्या व्यवसायाचा, अभ्यासाचा व भाषेचा प्रभाव दिसून येतो

सारांश :–

शांताबाई हुबळीकर एक श्रेष्ठ दर्जाच्या अभिनेत्री होत्या. त्यांच्या आत्मचरित्रात त्यांच्या कला जीवनाविषयी फार कमी आशय असून चित्रपट सृष्टी बद्दलचे चिंतन, साकारलेल्या भूमिका इ. विषयी मोजकेच अनुभव त्यांनी सांगितले आहे. चित्रपटात अवखळ, तडफदार, अल्लड दिसणाऱ्या शांताबाई हुबळीकरांचे "आता कशाला उद्याची बात" मध्ये मात्र एक दुर्दैवी, निराधार, अगतिक व सहनशील स्त्री असे चित्र वाचकांसमोर उभी राहते. उत्तरार्धात यश, मान प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा त्यांना प्राप्त झाली परंतु आयुष्याच्या शेवटी त्यांनी स्वत:साठी काहीच तरतुद करून ठेवली नाही. त्यामुळे आयुष्याच्या शेवटी त्यांना परावलंबी व्हावे लागले. त्यांच्या ओढवलेल्या या सर्व प्रसंगांना त्याच जबाबदार असल्याचे दिसून येते. आयुष्यात इतके कटू अनुभव येऊनही त्यांनी अत्यंत तटस्थपणे हे निवेदन केले आहे . कदाचित आयुष्यभर त्यांच्या वाट्याला आलेले भोग भोगून त्यांची संवेदनशीलता गळून पडली असावी असे त्यांच्या संदर्भात म्हणता येते.

संदर्भ ग्रंथ :–

१. डॉ. देशपांडे सुनंदा - अभिनेत्या कलावंताची आत्मचरित्र"– ऋचा प्रकाशन, नागपूर, १९९७, पृ. १७८

२. बोव्हा सिमॉन द (अनुवाद - करुणा गोखले) - "द सेकंड सेक्स" – पदमगंधा प्रकाशन - पुणे, २०१२, दुसरी आवृत्ती, पृ. २५

३. हुबळीकर शांताबाई - "आता कशाला उद्याची बात" - श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९९०, पृ. मनोगत

४. डॉ. भवाळकर तारा - "तिसऱ्या बिंदूच्या शोधात" - सुगावा प्रकाशन, पुणे, २००१, पृ. ४१

५. हुबळीकर शांताबाई -"आता कशाला उद्याची बात" - श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९९०

६. तत्रैव

७. तत्रैव

८. तत्रैव

९. डॉ. भवाळकर तारा - "तिसऱ्या बिंदूच्या शोधात" - सुगावा प्रकाशन, पुणे, २००१,

Impact Factor-7.675 (SJIF)
ISSN-2278-9308
December-2021
ISSUE No- (CCCXXXIII) 333

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

# वैदर्भीय साहित्यधारा

## शोधनिबंध विशेषांक
## २०२१

- संपादक -

डॉ. अजय चिकाटे

डॉ. विजय राऊत

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

| | | |
|---|---|---|
| 20 | वैदर्भीय लोकजीवनात ग्रामगीतेचे महत्व डॉ. साधना जिचकार | 92 |
| 21 | अरूणा सबाने ह्यांच्या कादंबरी लेखनातील स्त्रीवादी दृष्टिकोन कु. करूणा वसंतराव डहाके | 95 |
| 22 | माधव सरकुंडे यांच्या 'वाडा' आदिवासी कादंबरीतील समाजवास्तव डॉ. रेखा जगनाळे–मोतेवार | 99 |
| 23 | दलित- आंबेडकरी साहित्य प्रवाह: एक आकलन डॉ.निता उदेभान मेश्राम | 104 |
| 24 | अरुणा सबाने यांच्या स्त्रीवादी कादंबरीलेखनाचे स्वरुप ; वैशिष्टये डॉ. मनीषा वसंतराव नलगे | 112 |
| 25 | ''ग्रामीणतेचे ज्वलंत वास्तवचित्रण रेखाटणारी कादंबरी : चारीमेरा'' प्रा. राजेंद्र बांगर | 115 |
| 26 | वैदर्भीय ग्रामीण कथासाहित्य डॉ. बादलशाहा डोमाजी चव्हाण | 122 |
| 27 | ग्रामगीतेतील 'ग्रामनिर्माण' पंचक: संस्कार आणि जडण घडण प्रा. डॉ. महेंद्र द. झलके | 125 |
| 28 | वैदर्भीय साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे : व्यक्ती आणि वाङ्मय प्रा. कमलाकर एन. माहुरे | 130 |
| 29 | वैदर्भीय स्त्रीमुक्तीवादी लेखिका कुमुद पावडे यांच्या आत्मकथनाचा 'अंत:स्फोट' प्रा. अजय वा. बारसागडे | 133 |
| 30 | 'माझ्यातला कवी मरत चाललाय': एक आकलन डॉ. संजय जीवनलाल सिंगनजुडे | 137 |
| 31 | अनिल यांची सामाजिक व वैचारिक स्वरूपाची कविता प्रा. डॉ. राकेश कभे | 143 |
| 32 | वैदर्भीय ऐतिहासिक नाटके डॉ. मीनाक्षी भोयर | 149 |
| 33 | अंतर्मनाचे पदर उलगडणारी 'हराळी' डॉ. विलास गुलाबराव गजबे | 153 |
| 34 | वैदर्भीय साहित्यधारा : डॉ.प्रतिमा इंगोले हयांचे काव्यसंग्रह संदर्भात (शेतकऱ्यांच्या नारी, बाईची कहाणी, भुलाई) डॉ.विजया जितेंद्र राऊत | 158 |
| 35 | वैदर्भीय सामाजिक कार्यकर्त्या सीमा साखरे यांच्या' संग्राम' आत्मचरित्राची स्त्रीवादी अंगाने चिकित्सा डॉ. अमृता डोरलीकर | 167 |
| 36 | झाडीपट्टी रंगभूमीचे वेगळेपण डॉ. माधव धोंडीबा कांडणगिरे | 171 |
| 37 | सण—उत्सवांकडे पाहण्याचा राष्ट्रसंताचा वैज्ञानिक दृष्टिकोन राहुल लक्ष्मणराव रक्षित | 175 |
| 38 | वैदर्भीय कांदबरी व कादंबरीकार प्रा. पराग मुरलीधर सपाटे | 182 |
| 39 | कुसुमावती देशपांडे : व्यक्ती आणि ललितवाङ्मय डॉ. संगीता खुरद | 188 |
| 40 | 'माणूस' या कादंबरीतील व्यक्तिरेखा : एक आस्वाद प्रा. डॉ. विनोद उत्तमराव भालेराव | 192 |
| 41 | अनिलांच्या कवितेतील प्रेमजाणिवा डॉ. अंजली मुकुंद पांडे – जोशी | 198 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 333 (CCCXXXIII)
ISSN : 2278-9308
December, 2021

# वैदर्भीय सामाजिक कार्यकर्त्या सीमा साखरे यांच्या' संग्राम' आत्मचरित्राची स्त्रीवादी अंगाने चिकित्सा

डॉ. अमृता डोरलीकर
सहायक प्राध्यापक पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर
भ्रमणध्वनी :९३२६२३४२८२ ,cmpamruta1234@gmail.com

सारांश :-

माणूस हा सामाजिक बांधिलकी मानणारा प्राणी आहे आणि ही बांधिलकी स्त्रियांनीही स्विकारलेली असल्यामुळे स्त्री समाजाच्या विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवू शकलेली आहे . समाजकार्यातही स्त्रिया मागे नाही समाज कार्याची आवड आणि समाजाचे हीत या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन स्त्रिया समाजकार्यासाठी चौकटीच्या बाहेर पडत आहे. समाजकार्यासाठी स्वतःला वाहून घेतलेल्या स्त्रियांपैकी सीमा साखरे या धडाडीच्या सामाजिक कार्यकर्त्या आहेत. सीमा साखरे यांचे संग्राम हे आत्मचरित्र समकालीन स्त्री चळवळीचे स्त्रियांच्या समस्यांचे आणि त्यांच्या न्यायासाठी घेतलेल्या भूमिकेचे चरित्र आहे सामाजिक चळवळीच्या अंगाने जाणारे हे आत्मकथन आहे. सामाजिक कार्यकर्त्या सीमा साखरे यांच्या सामाजिक कार्याचा संपूर्ण प्रवासच 'संग्राम' या आत्मचरित्रात चित्रीत झाला आहे. एका स्त्रीच्या स्वाभिमानाचा तिच्या संपूर्ण मानवी प्रतिष्ठेचा आणि तिला तिच्या कर्तृत्वाचा सर्जनाच्या सर्व वाटा मोकळया करणारा हा संग्राम आहे. हाच या आत्मचरित्रातील स्त्रीवादाचा आशय आहे असे म्हणता येते. स्त्रियांच्या प्रश्नांच्या निमित्ताने स्त्रियांवरील अत्याचार आणि त्यांचे अमानुष शोषण याविरुद्ध त्यांनी विद्रोह पुकारलेला दिसतो. त्यांच्या जीवनाचा मोठा भाग सामाजिक कार्याने व्यापलेला आहे त्यांनी केलेल्या संपूर्ण कार्याची माहिती त्यांच्या आत्मचरित्रातून वाचावयास मिळते. अन्यायाविरुद्ध तुटून पडणाऱ्या सीमा साखरे आपले काम अव्याहतपणे करताना दिसतात. माया आकोलकर ते सामाजिक कार्यकर्त्या सीमा साखरे होण्यापर्यंतचा हा प्रवास आहे.

प्रस्तावना :-

माणूस हा समाजशील आणि सामाजिक बांधिलकी मानणारा प्राणी आहे. आणि ही बांधिलकी स्त्रीयांनीही स्विकारलेली आहे. स्त्री शिक्षणामुळे स्त्री समाजाच्या विविध क्षेत्रात आपले पाउल उमटवू शकली. महात्मा गांधीनी सर्व स्त्री पुरुषांना समाजकार्य करण्याची प्रेरणा दिली. समाजातील पददलित, कामगार, आदिवासी अशा सर्व जाती जमातीसाठी स्त्रिया पुढे येऊन कार्य करू लागल्या. काही स्त्रियांनी आपले सगळे आयुष्य समाजकार्यासाठी खर्ची घातले. कामाची तळमळ आणि समाजकार्याची आवड असेल तर त्यातून सवडही मिळतेच समाजाचे हीत ही प्रेरणा समोर ठेऊन स्त्रिया कार्य करीत आहे . स्त्रियांनी समाजकार्यासाठी बाहेर पडणे ही एक प्रकारची क्रांतीच होय. कार्यकर्त्या स्त्रियांची आत्मचरित्रे संख्येने कमी आहेत कार्यकर्त्या स्त्रियांच्या आत्मचरित्रामध्ये आत्मचरित्रे संख्येने कमी आहेत. कार्यकर्त्या स्त्रियांच्या आत्मचरित्रामध्ये मृणालिनी देसाई यांचे ' निशीगंध', गोदावरी परुळेकर यांचे 'जेव्हा माणूस जागा होतो' , अनुताई वाघ यांचे' कोसबाडच्या टेकडीवरून', सिंधुताई सपकाळ यांचे ' मी वनवासी' , दुर्गा भागवत यांचे 'आमची कथा', अनुराधा लिमये यांचे 'आम्ही बी घडलो', सुमती सुकळीकर यांचे 'मी असता मजसंगे', उषा डांगे यांचे 'पण ऐकतं कोण', मेहरूनीसा दलवाई यांचे 'मी भरून पावले आहे' आणि सीमा साखरे यांचे 'संग्राम' इ. सामाजिक कार्यकर्त्या स्त्रियांच्या आत्मचरित्रांची नावे सांगता येतात. यासर्व सामाजिक कार्यकर्त्या स्त्री आत्मचरित्रापैकी विदर्भातील सामाजिक कार्यकर्त्या सीमा साखरे यांच्या 'संग्राम' या आत्मचरित्राची स्त्रीवादी अंगाने चिकित्सा प्रस्तूत शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

लेखिका सीमा साखरे आपल्या आत्मचरित्राविषयी सांगताना म्हणतात "माझं हे आत्मचरित्र मनोरंजनात्मक नाही त्याची बैठकच मुळात जे मी खडबडीत जगले त्याची आहे ते माझं आत्मचरित्र माझ्या समकालीन स्त्री चळवळीचं, स्त्रियांच्या समस्यांच आणि त्यांच्या न्यायासाठी मी घेतलेल्या भूमिकेचं चरित्र आहे".१ अशी प्रतिक्रिया त्या देतात. आत्मचरित्रात सीमा साखरे आणि स्त्री अत्याचार विरोधी चळवळ असे समीकरणच जुळून आलेले असल्यामुळे सामाजिक चळवळींच्या अंगाने जाणारे हे आत्मकथन आहे. "माझे संपूर्ण आयुष्यच एक मोठा 'संग्राम' आहे असे लेखिका म्हणतात. स्त्रियांच्या प्रश्नांच्या निमित्ताने स्त्रियांवरील अत्याचार आणि त्यांचे अमानुष शोषण याविरुद्ध त्यांनी विद्रोह पुकारलेला दिसतो. त्यांच्या जीवनाचा मोठा भाग सामाजिक कार्याने व्यापलेला आहे. त्यांनी केलेल्या संपूर्ण कार्याची माहिती त्यांच्या आत्मचरित्रातून वाचावयास मिळते. अन्यायाविरुद्ध तुटून पडणाऱ्या सीमा साखरे शेवटपर्यंत आपले काम अव्याहतपणे

करीत आहेत. त्याचे चित्रण त्यांच्या आत्मचरित्रातून वाचावयास मिळते. माया आकोलकर ते सामाजिक कार्यकर्त्या सीमा साखरे होण्यापर्यंतचा हा प्रवास आहे.

'संग्राम' या आत्मचरित्राच्या लेखिका सीमा साखरे यांचे बालपण यवतमाळ जिल्ह्यातील कळंब येथे गेले बालपणी त्यांना माया या नावाने संबोधले जात असे वडील व्यवसायाने शिक्षक होते. 'मुलीच्या जातीला शिक्षण काय कामाचे' म्हणून लेखिकेला शाळेत घातले जात नाही. घरी दही घुसळले की ताकाचा पिपा लहान माया च्या डोक्यावर देऊन ताक विकायला पाठवीत असे. गाडगेबाबा एकदा कळंबला आले असताना गाडगेबाबांनी "शाळेत जाय, शिक, मोठी हो," असे म्हणून हात धरून शाळेत नेले, झालेली घटना जेव्हा त्यांच्या आईला कळली तेव्हा ती लेखिकेला शाळेत जाण्याची परवानगी देते". "त्यांच्या या कृतीनेच मी त्यांचे ऋण फेडण्यासाठी संकटातील दुसऱ्या स्त्रियांचे भले करण्याचा विचार करू शकले माझ्या आजच्या जगण्यामागे त्यांच्याच प्रेरणा आहेत"[२] असे लेखिका अभिमानाने सांगतात.

लेखिका सीमा साखरे 'संग्राम' या आत्मचरित्राच्या सुरुवातीलाच जीवनातील घटना सांगण्यापेक्षा चाळीस वर्षांचा सामाजिक कारकिर्दीचा भाग त्यांच्या लिखाणातून येतो. आत्मचरित्रात त्यांनी आपल्या वैयक्तिक जीवनापेक्षा समाज जिवनाचे चित्रणच जास्त केलेले आहे. जवळपास १५,००० पेक्षा अधिक केसेसची नोंद त्यांच्याकडे झालेली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची इत्यंभूत माहिती त्यांच्या आत्मचरित्रातून येते. दलित महिलेच्या जीवघेण्या अत्याचाराला त्यांनी वाचा फोडली. हिंसाचाराविरुद्ध चळवळीकडे नेणाऱ्या घटना (मेरीपॉल), अन्नपूर्ण आजी सारख्या वयोवृद्ध स्त्रीवर झालेला बलात्कार, मथुरा बलात्कार प्रकरण, अत्याचारविरुद्ध चळवळ, अश्लिल नाटके आणि प्रसारमाध्यमांना विरोध, स्त्री अत्याचार विरोधी परिषद, हुंडाविरोधी चळवळीची पायाभरणी, अंधश्रद्धेविरुद्ध संघर्ष, सैलानी दर्गा, रुपकुँवर आंदोलन, इंद्रप्रभा जैन तसेच नैरोबी येथे भरलेल्या जागतिक महिला पातळीवरील चर्चेत सामील होण्याची संधी, पारिवारिक अत्याचारांचा पाठपुरावा, जळगाव वामनाकांड, स्त्रीरत्न पुरस्काराने गौरव, विदर्भ भूषण पुरस्कार, खैरलांजीतील क्रौर्य इ. घटनांचा उल्लेखही आत्मचरित्रात केलेला आहे. बाबासाहेबांचे धर्मांतर पाहिले त्यातून नकळत त्या मनाने, बुद्धीने बौद्ध झाल्या बालपणापासून त्यांचे मन स्त्रियांच्या दुःखात रुतलेले असल्यामुळे आणि आजुबाजुच्या स्त्रियांची अवस्था पाहिल्यानंतर या पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्री चे शोषणच होताना पाहिलेले होते.

सीमा साखरे सुरुवाती पासून बाणेदार स्वभावाच्या त्यांच्या आजूबाजूच्या स्त्रियांची स्थिती बघतात. तेव्हा त्यांचे मन पेटून उठते पुढे शिक्षण घेत असताना स्वतःच्या अधिकाराप्रती असलेली जाणीव स्त्रियांवर होणारे अन्याय त्या उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नाही. पुरुषप्रधानता आणि समाजाची मूल्यव्यवस्था प्रत्येक विवाहित स्त्री ला भिन्न भिन्न पद्धतीने अनुभवायला मिळते. फक्त त्याचे विश्लेषण स्त्रिया योग्यरितीने करु शकत नाही असे लेखिकेला वाटते. फुले - आंबेडकरी विचारांवर आधारित समता आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीत लेखिकेने अपार कष्ट घेतले जेव्हा कोणीच स्त्रियांच्या अत्याचाराबाबत बोलत नव्हते. तेव्हा कार्यकर्त्या सीमा साखरे यांनी प्रथम जाहीरपणे बोलायला सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी चळवळ उभारली आणि सतत त्या चळवळीतून स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली. लेखिका कधीही न हरणाऱ्या, रडत बसणाऱ्या नव्हत्या अडचणीवर मात करून प्रत्येक अन्यायाविरुद्धची लढाई जिंकणाऱ्या आहेत.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव लेखिकेवर आहे घटनेने स्त्री - पुरुष समानता आणि स्त्रियांचे अधिकार व हक्क मान्य केलेले आहेत तरी इथली कुटुंबरचना आणि स्त्रियांची मानसिकता यांच्यातून त्यांची भूमिका आणि दर्जा मर्यादित झालेला दिसतो. आपल्या रूढी प्रिय देशामध्ये स्त्रियांची मूळ भूमिका विवाह संस्थेपासूनच दुय्यम दर्जाची ठरत गेल्यामुळे कुटूंबात स्त्रियांना परंपरागत मूल्येच सांभाळावी लागतात. समाजात स्त्री पुरुष समानता आणायची असेल तर स्त्री ला सन्मानाने वागविले पाहिजे. तिचा व्यक्ती म्हणून विचार व्हावा कार्यकर्ती म्हणून स्त्रियांना न्याय, हक्क मिळवून देताना त्यांचा संघर्ष पुरुषी वर्चस्वाविरुद्ध होता. समाजाची मानसिकता जो पर्यत बदलत नाही तोपर्यंत स्त्रीपुरुष समानतेचा विचार होऊ शकत नाही असे लेखिकेला वाटते. स्त्रियांच्या जीवनातील वास्तवतेचा लेखिका जेव्हा अभ्यास करतात तेव्हा "मी जर लग्न केले नसते तर कदाचित मला स्त्रिया समजू शकल्या नसत्या हजार स्त्रियांमध्ये ज्यांचे संसार सुरळीत चालले आहेत अशा स्त्रिया फार कमी भेटल्या. इतर कोणताही प्रेमाचा धागा नसताना त्या संसार करीत होत्या आपल्या भविष्याचा विचार न करता वर्तमान जगत होत्या आणि त्यांचे वैवाहिक जीवन संसार मनापासून टिकवित होत्या"[३] हे जळजळीत वास्तव लेखिकेच्या समोर आले. त्यागात आणि समर्पणातच आयुष्याची मजा असते असे म्हणणाऱ्या मध्यमवर्गीय , उच्चवर्गीय स्त्रिया फार फसव्या वाटतात असेही लेखिका म्हणून जातात. घटनेने जरी स्त्री पुरुष समानता आणि स्त्रियांचे अधिकार व हक्क मान्य केलेले आहेत तरी इथली कुटूंबरचना आणि स्त्रियांची मानसिकता यांच्यातून त्यांची भूमिका व दर्जा मर्यादित झाला आहे असे लेखिकेला वाटते स्त्रिया स्वतःच्या स्वातंत्र्याबद्दल जागरुक झालेल्या असल्या तरी त्यांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या कल्पना स्पष्ट नाहीत. स्त्रियांसाठी काम

करताना आणि त्यांच्या न्यायासाठी संघर्ष करताना मातेच्या ममतेने स्त्रियांचे प्रश्न सोडवितात. महिलांचे दुःख त्या समजून घेतात. मनाचा एक हळवा कोपरा ही जपतात. न्यायालयीन लढाईसह संवेदनशीलतेने प्रश्न हाताळणाऱ्या लेखिका आज अनेक भगिनींच्या माता झालेल्या आहेत. स्त्रीला व्यक्ती आणि माणूस म्हणून जगता यावे यासाठीच तर माझा संघर्ष आहे असे लेखिका सांगतात. स्त्रियांच्या न्यायाबद्दलच्या भावना जेव्हा दाटून येतात, तेव्हा त्यांच्या आवाजात एक प्रकारची जरब निर्माण होते कोणत्याही स्त्री बद्दल कोणी अवाक्षर बोलले तर कडक शब्दात त्या कान उघडणी करतात. पुरुषाच्या नजरेला नजर भिडवून "काय म्हणणे आहे तुझे" असे दरडावून विचारतात. लेखिका कोणत्याही कर्मकांडात गुंतल्या नाहीत. भोवतालच्या स्त्रियांना फार अंधश्रध्दाळू आणि दैववादी झालेल्या पाहता होत्या. त्यांचा हा दैववाद संपविण्यासाठी त्यांच्या श्रध्देला धक्का न लावता कर्मकांडातील आणि पूजेअर्चेतील निरुपयोगिता लेखिकेने त्यांना समजावून सांगितली. तसेच ईश्वर वादातून आणि कर्मकांडातून अंधश्रध्देतून पूर्णपणे मोकळे करण्याचा प्रयत्न लेखिकेने केलेला दिसतो. स्त्रियांवरील अन्यायाच्या विरोधात सुरु असलेल्या संग्रामात सीमा साखरे यांनी सतत पुढाकार घेतला. स्त्री चे माणूसपण नाकारणाऱ्या स्त्रीचा श्वास शतकानुशतके गुदमरून टाकणाऱ्या या समाजरचनेची चौकट अनेकदा त्यांनी उधळून लावली. स्त्रीला दुय्यमत्व देणारी कोणतीच मूल्ये लेखिकेने मान्य केली नाही. म्हणून कुठेही अन्याय झाला की त्या पेटून उठतात . प्रसंगी प्रवास साधनांचा अभाव असतानाही बैलगाडीच नव्हे तर पायपीटही करीत त्या अन्यायग्रस्त स्त्रीपर्यंत पोहोचल्या. तिला न्याय मिळेपर्यंत स्वस्थ बसल्या नाहीत. संपूर्ण आयुष्य हे कार्य करीत असताना त्यांनी दिलेला संघर्ष, मिळवून दिलेला न्याय, प्रसंगी पुरुषप्रधान संस्कृतीविरुद्ध लढण्याची जिद्द यामुळे त्यांच्या आत्मचरित्राला 'संग्राम' हे नाव सार्थक वाटते

**समारोप**

सीमा साखरे यांनी हे आत्मचरित्र यु.के. त त्यांच्या मुलाच्या घरी वास्तव्याला असताना लिहिल आहे. आठवणीतून लिहिलेले हे आत्मकथन आहे. जुन्या स्मृती, विचारांचे पुनरावलोकन करून स्वतःचे आत्मपरिक्षण करून स्वतःच स्वतःला दोष देत तर एखादे कार्य फक्त आपणच करू शकलो याचे समाधानही आत्मकथनातून त्या व्यक्त करतात. शाळेपासून वंचित राहून गावभर ताक विकणाऱ्या मुलीपासून ते पीएच.डी पर्यत शिकून प्राध्यापक झाल्या स्त्रियांच्या चळवळीतील कार्यकर्त्या झाल्या इथपर्यंतचा प्रवास आत्मकथनात आलेला आहे. त्यांचे आत्मचरित्र मनोरंजनात्मक नसून समाजाच्या वास्तवतेचे चित्र त्यांनी रंगविलेले आहे. स्त्रियांच्या समस्यांचे चळवळीचे चित्रण त्यात आलेले आहे. केलेल्या प्रत्येक कार्याचे समर्थन सामाजिक कार्यकर्ती सीमा साखरे यांनी तटस्थपणे केलेले आहे एकंदरीत एका निर्भय, संवेदनशील आणि तटस्थ, बाणेदार वृत्तीच्या स्त्री चे हे आत्मचरित्र आहे असे म्हणता येते.

सीमा साखरे यांच्या आत्मचरित्रात वैचारिकता आहे समाजाचे केलेले परखड निरीक्षण त्यातून व्यक्त होते त्यांच्या आत्मचरित्रातून लिखाणाची धार तीक्ष्ण होताना दिसते त्यांचे लिखाण हे सामाजिक जाणीवेच्या अंगाने केलेले आहे. निवेदनात्मकता, वैचारिकता, स्पष्टवक्तेपणा हे त्यांच्या विचारांच्या अभिव्यक्तीचे दर्शन घडते तसेच स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सामाजिक परिस्थितीची कल्पनाही येते. सामाजिक कार्यकर्त्या म्हणूनही आत्मचरित्रातून त्या अभिव्यक होताना दिसतात. आपले विचार परखडपणे मांडत असतानाच कुठेही शब्दाची धार बोथट होत नाही, लिखाणाची भाषा कुठे घसरलेली दिसत नाही . कितीही कटू अनुभव आले तरी त्याचा सामना त्यांनी धिराने केला. त्यातून त्यांच्या कणखर स्वभावाचे दर्शन घडते. सरळ साधी भाषाशैली, अभिव्यक्त होण्याची त्यांची प्रजा त्यांचे अनुभवाचे बोल यावरून त्यांचे आत्मचरित्र एक वेगळ्याच पातळीवर गेल्याचे दिसून येते. स्त्री अत्याचार विरोधी लढा देत असतानाच लेखिकेला आत्मचरित्र लिहावे असे सांगणारे स्त्री पुरुष आग्रहपूर्वक त्यांना नेहमी भेटत राहिले. "तुमच्याजवळ खूप अनुभव आहे श्रमाची पराकाष्ठा आणि गौरव आहे, तुमची स्त्रियांच्या प्रश्नांत गुंतवणूक आहे तुमचे आयुष्य लोकांसमोर मांडायला हवे असे ते आग्रहपूर्वक सांगत होते म्हणून आत्मचरित्र लिहिण्याची इच्छा सुप्तपणे जोपासली जात होती".[४] स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी आणि न्यायासाठी केलेला संघर्ष यात आहे. प्रस्तावनेत शेवटी सीमा साखरे म्हणतात," आत्मचरित्र पूर्ण झाले म्हणजे जीवन संपले असे नाही तर ही सुरुवात आहे". अजून खूप काम करायचे आहे. पारंपारिक साच्यात स्वतःला जोखडून स्वतःची स्वतंत्र वाट लेखिका निर्माण करू शकल्या मनाचा निर्धार, काम करण्याची सचोटी, कामाप्रती समर्पण भावना ह्या सगळया गुणांमुळे त्यांचे आत्मचरित्र एका वेगळयाच उंच पातळीवर गेले आहे. लेखिकेच्या चळवळीचा' संग्राम' हा स्त्रीच्या स्वाभिमानाचा तिच्या संपूर्ण मानवी प्रतिष्ठेचा आणि तिला तिच्या कर्तत्वाचा, सर्जनाच्या सर्व वाटा मोकळया करणारा संग्राम आहे त्यांच्या स्त्रीवादाच हाच आशय आहे असे म्हणता येते. डॉ. यशवंत मनोहर त्यांच्या कार्याची पावती देताना म्हणतात "त्यांचे आयुष्य विश्रांती हरवलेल्या धवधब्यासारखे आहे. स्त्रियांसंबंधीच्या कामांनी त्यांच्या आयुष्याचा तलाव कायमच ओव्हरफ्लो झालेला आहे. स्त्रीमुक्तीचा ध्यास घेत कोणत्याही सीमांमध्ये मावणार नाही अशी "असीमा" ती होते".[५] सीमा साखरे नावाच्या चळवळीने कृती आणि उक्ती ही दोन्ही हत्यारे समर्थपणे वापरली असे त्यांच्या आत्मचरित्राच्या बाबतीत म्हणता येते.

संदर्भ :-

१) डॉ. भीमा साखरे - ' संग्राम'- प्रस्तावना - आकांक्षा प्रकाशन'- द्वितीयावृत्ती २००९., नागपूर.
२) तत्रैव - पृष्ठ ४
३) तत्रैव - पृष्ठ १३९
४) तत्रैव - प्रस्तावना
५) महाराष्ट्र टाईम्स अंक -२०१८